आपल्या देशासाठी चांगली शिक्षणपद्धती कशी असावी आणि येत्या दहा वर्षांत ती कशी निर्माण करता येईल, याचा विचार येथे करण्यात आलेला आहे. कारण त्यायोगेच, सर्वसामान्य जनतेला आपल्या अधिकारांची जाणीव होऊन ते संपादन करायला आणि आपल्या जीवनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या अर्थपूर्ण आणि आव्हानात्मक कार्यक्रमात सहभागी व्हायला ती तयार होईल.

थोडक्यात सांगायचे तर आपल्या सर्व लोकांना चांगले शिक्षण देता यावे आणि प्रत्येक व्यक्तीला आयुष्यभर अध्ययन करण्याची निश्चित संधी लाभेल अशी सामाजिक परिस्थिती निर्माण व्हावी, यासाठी काय केले पाहिजे याचे या पुस्तकात अत्यंत उत्कृष्ट विवेचन करण्यात आले आहे.

जयप्रकाश नारायण

# भारतीय जनतेचे शिक्षण



# भारतीय जनतेचे शिक्षण

येत्या दहा वर्षांमधील

( १९७८–८७ )

शैक्षणिक विकासाची धोरण–रूपरेषा

**प्रवर्तक**

जनतंत्र समाज

( सिटिझन्स फॉर डिमॉक्रसी )

नवी दिल्ली

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे

प्रकाशक
दे. अ. दाभोलकर
संचालक
इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन
१२८/२, नवकेतन सोसायटी,
पुणे ४११ ०२९.

०

प्रथमावृत्ती
जुलै १९७९

०

मुखपृष्ठ
मधु पाटील

०

मुद्रक
सर्जेराव घोरपडे
प्रिंटेक्स्ट
सदाशिव पेठ, टिळक रस्ता,
पुणे ४११ ०३०

INDIAN INSTITUTE OF EDUCATION
NO. 20512
PUNE

मूल्य ८ रुपये

## प्रास्ताविक

भारतात शोषणमुक्त आणि समताधिष्ठित समाजरचना निर्माण व्हावी, याचा एक विधायक मार्ग म्हणून श्री. जयप्रकाश नारायण यांनी लोकांसमोर संपूर्ण क्रांतीची संकल्पना ठेवली आहे. या संपूर्ण क्रांतीचा, समाजजीवनाच्या इतर क्षेत्रांप्रमाणे, शिक्षण हाही एक महत्त्वाचा घटक आहे. या संकल्पित शैक्षणिक परिवर्तनाची दिशा, स्वरूप आणि उद्दिष्ट काय असावे यासंबंधी एक सूत्रबद्ध आराखडा तयार करावा असे 'जनतंत्र समाजा'ने ठरविले आणि ते कार्य आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक यांच्याकडे सोपविले.

डॉ. जे. पी. नाईक यांनी तयार केलेल्या आराखड्याच्या आधारे देशात अनेक ठिकाणी शिक्षणतज्ज्ञांचे परिसंवाद आयोजित करण्यात आले. या परिसंवादांमध्ये करण्यात आलेल्या उपयुक्त सूचना अंतर्भूत करण्याच्या दृष्टीने मूळ आराखड्याचे पुनर्लेखन करण्यात आले. अशा रीतीने अनेक शिक्षणतज्ज्ञांच्या विचारमंथनातून तयार झालेली शैक्षणिक परिवर्तनाची रूपरेषा 'जनतंत्र समाजा'ने (सिटिझन्स फॉर डेमॉक्रसी) जनतेच्या विचारार्थ 'एज्युकेशन फॉर अवर पीपल' या नावाने प्रसिद्ध केली आहे. या रूपरेषेवर चाळीसांहून अधिक नामवंत शिक्षणतज्ज्ञांनी व समाजधुरीणांनी स्वाक्षरी केली आहे.

या आराखड्यात नमूद केलेले शैक्षणिक परिवर्तन, प्रभावी जनआंदोलन संघटित केल्यावाचून घडून येणे शक्य नसल्यामुळे सर्व भारतीय भाषांमध्ये हा आराखडा अनुवादित होण्याची गरज आहे. त्या दृष्टीनेच, आम्ही आमच्या विद्याभारती (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन) या संस्थेच्या वतीने 'भारतीय जनतेचे शिक्षण' या शीर्षकाखाली मराठी अनुवाद प्रसिद्ध करीत आहोत. हा अनुवाद श्री. वि. स. वाळिंबे यांनी केला आहे.

शैक्षणिक परिवर्तनासंबंधी आस्था बाळगणाऱ्या नागरिकांना आमचे हे प्रकाशन उपयुक्त वाटेल, असा विश्वास आहे.

**देवदत्त दाभोलकर**

# पुरस्कार

'भारतीय जनतेचे शिक्षण' या विषयासंबंधीची मौलिक रूपरेषा तयार केल्याबद्दल आणि विचारविनिमय नि कार्यवाही यासाठी ती देशासमोर ठेवल्याबद्दल मी न्या. व्ही. एम. तारकुंडे आणि त्यांचे सहकारी यांचा अतिशय ऋणी आहे.

शिक्षणामध्ये, वैयक्तिक विकास आणि सामाजिक परिवर्तन साध्य करण्याची क्षमता आहे असे मी मानतो. दुर्दैवाने आपण आपल्यासाठी निर्माण केलेली औपचारिक शिक्षणपद्धती या दोन्ही उद्दिष्टांच्या दृष्टीने अयशस्वी ठरली आहे. या शिक्षणपद्धतीचा लाभ घेणाऱ्या वरिष्ठ आणि मध्यमवर्गांना ती एक तर चुकीचे शिक्षण देते. त्याचप्रमाणे या शिक्षणपद्धतीने उपभोगप्रधान औद्योगिक संस्कृतीची मूल्ये आणि जीवनपद्धती स्वीकारलेली असल्यामुळे या पद्धतीने शिक्षित झालेले लोक आपल्या संस्कृतीपासून दूर जातात. शिक्षित समाजाचे एका विशिष्ट हितसंबंधी वर्गात रूपांतर करून ही शिक्षणपद्धती सर्वसामान्य जनतेचे दारिद्र्य कायम ठेवायला आणि वाढवायला मदत करते. दुसरे असे की या शिक्षणपद्धतीचा अवाढव्य विस्तार झालेला असला आणि तिच्यावर भरमसाट खर्च होत असला तरी सर्वसामान्य जनता या शालेय पद्धतीच्या बाहेरच राहिलेली आहे. त्यामुळे तिला केवळ शिक्षणापासूनच नव्हे तर जीवनातील इतर अनेक चांगल्या गोष्टींपासून वंचित राहावे लागत आहे. वैयक्तिक विकासाच्या दृष्टीनेही ही शिक्षणपद्धती निरर्थक ठरली आहे. तसेच समताधिष्ठित परिवर्तनाला साहाय्यभूत होण्याऐवजी तिने अडसरच निर्माण केला आहे.

आपल्या देशासाठी चांगली राष्ट्रीय शिक्षणपद्धती कशी असावी आणि येत्या दहा-एक वर्षांत ती कशी निर्माण करता येईल, या संबंधीचे विवेचन या पुस्तकात करण्यात आले आहे. सध्याची वर्गाभिमुख शिक्षणपद्धती बदलून जनतेचे शिक्षण या मध्यवर्ती उद्दिष्टाभोवती तिची पुनर्रचना केली पाहिजे, यावर येथे भर देण्यात आलेला आहे. त्यासाठी प्रौढशिक्षणाचा व्यापक कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. कारण त्यायोगेच सर्वसामान्य जनतेला आपल्या अधिकारांची जाणीव होऊन ते संपादन करायला आणि आपल्या जीवनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या अर्थपूर्ण आणि आव्हानात्मक

कार्यक्रमात सहभागी व्हायला ती तयार होईल. सर्व मुलांना चांगले प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे, या घटनात्मक तरतुदीची त्वरित परिपूर्तीही या नव्या शिक्षणपद्धतीला अभिप्रेत आहे. तसेच, सर्वसामान्य जनतेला माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेणे सुकर व्हावे, शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर भारतीय भाषांचा माध्यम म्हणून वापर व्हावा, बुद्धिमान मुलांचा शोध घेऊन त्यांच्या बुद्धिमत्तेचा विकास करावा, त्यासाठी बुद्धिमान मुलांचे शासनाने पालकत्व स्वीकारून त्या मुलांना आपली सर्व शक्ती विकसित करता यावी अशा अनेक सूचना या कार्यक्रमात करण्यात आलेल्या आहेत. हे साध्य करीत असताना वरिष्ठ आणि मध्यमवर्गांना सध्याच्या शिक्षणपद्धतीत जे फायदे आणि विशेषाधिकार लाभलेले आहेत ते कमी केले पाहिजेत, हे ओघानेच येते.

थोडक्यात सांगायचे तर आपल्या सर्व लोकांना चांगले शिक्षण देता यावे आणि प्रत्येक व्यक्तीला आयुष्यभर अध्ययन करण्याची व्यापक संधी लाभेल अशी सामाजिक परिस्थिती निर्माण व्हावी यासाठी काय केले पाहिजे, याचे या पुस्तकात अत्यंत उत्कृष्ट विवेचन करण्यात आलेले आहे. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट ही आहे, की हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी येथे एक सात कलमी कार्यक्रम देण्यात आलेला आहे.

१ व्यापक सामाजिक संदर्भातच शिक्षणाचे नियोजन करावयाचे असल्यामुळे सध्याची विषमताधिष्ठित सामाजिक आणि वेतनविषयक संरचना बदलली पाहिजे आणि परस्परपूरक सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांचा कार्यक्रम एकाच वेळी कार्यवाहीत आणला पाहिजे.

२ सध्याच्या शैक्षणिक संरचनेमध्ये बदल करून अध्यापनाऐवजी अध्ययनावर भर देणारी पद्धत अवलंबिण्याची निकडीची गरज आहे. सहज आणि अनौपचारिक शिक्षणप्रणाली विकसित करणे, शैक्षणिक प्रक्रियेबाबत सर्वस्वी व्यावसायिक शिक्षकांवर अवलंबून राहाण्याऐवजी संपूर्ण समाजाला त्यात सहभागी करून घेणे आणि शिक्षणपद्धती विकेंद्रित, विविध-स्वरूपी, लवचिक आणि गतिमान करणे या गोष्टींचे महत्त्व विशद करण्यात आले आहे.

३ शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्ते आणि सामाजिक-राजकीय कार्यकर्ते यांनी परस्परांच्या सहकार्याने मूलभूत शैक्षणिक सुधारणांसाठी शिक्षणपद्धतीत आणि शिक्षणपद्धतीबाहेर एकाच वेळी आंदोलन संघटित करावयास हवे.

४ शिक्षणपद्धतीचा संपूर्ण मोहराच बदलला पाहिजे, यावर या कार्यक्रमात भर देण्यात आलेला आहे. ज्ञान, परिपूर्णता आणि सामाजिक परिवर्तन हे शिक्षणपद्धतीचे अविभाज्य घटक होण्यासाठी सातत्यपूर्ण आणि समर्पित वृत्तीने प्रयत्न व्हावयास हवेत.

५ शिक्षणपद्धती हेतूपूर्ण आणि परिणामकारक होण्यासाठी काही कठोर राजकीय आणि शैक्षणिक निर्णय केले पाहिजेत.

६ तळपातळीवरील लोकांमध्ये कार्य करायला प्राधान्य दिले पाहिजे.

७ सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठी आणि तिला आपल्या अधिकारांची जाणीव करून देण्यासाठी जनआंदोलन उभारणे महत्त्वाचे आहे.

या अशा आंदोलनातूनच आवश्यक त्या सामाजिक आणि आर्थिक शक्ती जागृत होऊन सर्व लोकांना चांगले शिक्षण देणे शक्य होईल;. सामाजिक जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी सुरू करण्यात येणाऱ्या जन-आंदोलनाला शैक्षणिक प्रयत्न साहाय्यभूत होऊ शकेल. हा कार्यक्रम लोकांनी स्वीकारावा असे माझे आवाहन आहे. शिक्षणक्षेत्रातील आणि सामाजिक नि राजकीय क्षेत्रांतील कार्यकर्त्यांच्या घनिष्ठ सहकार्यावरच या कार्यक्रमाची यशस्विता अवलंबून राहणार आहे. त्याहीपेक्षा या उद्दिष्टांशी ज्यांची निष्ठा आहे आणि ही उद्दिष्टे प्रत्यक्षात आणण्यासाठी कार्य करण्याची ज्यांची तयारी आहे असे किती कार्यक्षम कार्यकर्ते पुढे येतात यावर बरेच काही अवलंबून राहील.

आपल्या देशाच्या इतिहासातील एका निर्णायक स्थानावर आपण उभे असताना हा कार्यक्रम केवळ शासनालाच नव्हे तर शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांनाही अभिमानास्पद आव्हान ठरणारा आहे. कारण लोकांच्या निर्भयतेमुळे आणि शहाणपणामुळे आपल्याला देशाचे भवितव्य घडविण्याची आणखी एक संधी लाभत आहे. या आव्हानाची तातडी आणि विशेषता ध्यानात घेऊन ते स्वीकारायला सर्व कार्यकर्त्यांनी पुढे आले पाहिजे, अशी माझी कळकळीची विनंती आहे.

पाटणा, २१ जानेवारी १९७८ — *जयप्रकाश नारायण*

# भूमिका

विद्यमान शिक्षणपद्धतीचा सत्तर टक्के भारतीय जनतेला ओझरता स्पर्शही झालेला नाही ही दुःखद वस्तुस्थिती आहे. परिणामी, सार्वत्रिक निधीतून प्रचंड पैसा खर्च होत असलेल्या या शिक्षणामुळे शिक्षित अभिजन आणि अशिक्षित बहुजन यांच्यातील सांस्कृतिक अंतर वाढत चालले आहे. म्हणून जयप्रकाश नारायण यांनी पुरस्कारिलेले संपूर्ण क्रांतीचे ध्येय साकार करण्यासाठी सामाजिक परिवर्तनाचे जे व्यापक समता आंदोलन उभारण्यात येणार आहे त्याचा, शैक्षणिक परिवर्तनाचे आंदोलन हा एक अविभाज्य घटक झाला पाहिजे.

अशा प्रकारच्या शैक्षणिक परिवर्तनामध्ये, ग्रामीण आणि निम्नशहरी भागांमध्ये राहाणाऱ्या बहुसंख्य लोकांच्या दृष्टीने शिक्षण अर्थपूर्ण व्हावे यासाठी सध्याची शिक्षणपद्धती आकार आणि आशय या दोन्ही बाबतीत बदलली पाहिजे, असे अभिप्रेत आहे. त्याचबरोबर लोकांना शिक्षणाचे मोल समजावे आणि आपण नि आपल्या मुलांनी शिक्षित होण्याची त्यांच्यात उत्कट इच्छा निर्माण व्हावी यासाठी समताधिष्ठित जन-आंदोलनही विकसित करणे आवश्यक ठरते.

अशा आंदोलनासाठी कोणत्या शैक्षणिक सुधारणा करणे आवश्यक आहे याचे दिग्दर्शन या पुस्तकात करण्यात आलेले आहे. शैक्षणिक सुधारणांबाबत अशी एक रूपरेषा तयार करावी ही कल्पना जयप्रकाश नारायण यांना पसंत पडली. त्यांच्या अध्यक्षतेखाली २१ जून १९७७ रोजी मुंबई येथे भरलेल्या, जयप्रकाश नारायण इन्स्टिट्यूट ऑफ ह्यूमन राईट्स संस्थेच्या विश्वस्तांच्या बैठकीत या प्रकल्पासाठी आर्थिक साहाय्य देण्याचा प्रस्ताव संमत करण्यात आला. शैक्षणिक सुधारणांची रूपरेषा जनतंत्र समाजाच्या वतीने तयार केली जावी आणि त्यासाठी

नेमावयाच्या समितीचे नेतृत्व भारतीय समाजविज्ञान अनुसंधान परिषदेचे सदस्य-सचिव डॉ. ज. पां नाईक यांनी स्वीकारावे अशी मी त्यांना विनंती करावी असेही ठरले. नंतर १३ ऑगस्ट १९७७ रोजी जनतंत्र समाजाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.

डॉ. ज. पां. नाईक यांनी आपल्या नेहमीच्या उत्साहाने हे कार्य हाती घेतले आणि १९७७ च्या सप्टेंबरमध्ये शैक्षणिक सुधारणांची रूपरेषा तयारही केली. अनेक गटबैठकांमध्ये या रूपरेषेवर चर्चा करण्यात आली. प्रत्येक गटबैठकीला पंधरा ते वीस शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. अशा रीतीने सर्व गटबैठकांमध्ये मिळून देशातील अडीचशे शिक्षणतज्ज्ञांनी या चर्चेत भाग घेतला. या चर्चेमध्ये करण्यात आलेल्या विधायक सूचनांचा अंतर्भाव करण्यासाठी मूळ मसुद्याचे पुनर्लेखन करण्यात आले. ही दुरुस्त रूपरेषा आता प्रसिद्ध करण्यात येत आहे. देशातील चाळीस प्रमुख शिक्षणतज्ज्ञांनी आणि समाजनेत्यांनी तिचा पुरस्कार केला आहे.

शासनाने नेमलेल्या अनेक समित्यांनी आणि आयोगांनी शैक्षणिक सुधारणांबाबत तयार केलेल्या अहवालांमध्ये आणखी एक भर घालावी असा ही रूपरेषा तयार करण्यामागचा मुळीच उद्देश नाही. ही रूपरेषा तयार करण्यामध्ये शासनाचा काहीही संबंध नाही. आम्ही ती लोकांना सादर करीत आहोत. केंद्र आणि राज्य शासनांना ती अप्रत्यक्षपणेच सादर होईल. देशाच्या वेगवेगळ्या भागांत आणि वेगवेगळ्या पातळ्यांवर होणाऱ्या परिसंवादांमध्ये या रूपरेषेवर आणखी चर्चा होईल अशी आशा आहे. अशी चर्चा या रूपरेषेत आणखी सुधारणा करण्यासाठी तर उपयुक्त होईलच; शिवाय त्यायोगे संपूर्ण क्रांतीच्या व्यापक आंदोलनाचा एक भाग म्हणून शिक्षणविषयक जन-आंदोलन उभे राहण्यासाठी अनुकूल वातावरणही निर्माण होऊ शकेल.
ही रूपरेषा तयार करण्यात पुढाकार घेतल्याबद्दल मी डॉ. ज. पां. नाईक यांचा अतिशय आभारी आहे. शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी सुरू करावयाच्या जन-आंदोलनाला ही रूपरेषा निश्चित उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

***व्ही. एम. तारकुंडे***
सरचिटणीस, जनतंत्र समाज

नवी दिल्ली, ३१ मार्च १९७८

## अनुक्रम


प्रमुख निष्कर्ष आणि शिफारशी यांचा सारांश — १

१. उपोद्घात — ५

२. सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तन — १०–२०

भारतीय समाज — १०
भारतीय शिक्षण — १२
शिक्षण आणि समाज — १६

३. शिक्षणाची नवी संकल्पना आणि संरचना — २१–२७

मूल्यविचार — २१
औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाची एकात्मिक सहभागनिष्ठ पद्धती — २२
आशयाचा संदर्भ आणि परिवर्तन — २२
दर्जा — २५
लवचिकता, विविधता आणि गतिशीलता — २६

४. कार्यक्रम — २८–७८

प्रौढशिक्षण — २८
शालाबाह्य युवक (१५–२१ वयोगट) — ३४
सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण — ३५
माध्यमिक शिक्षण : उपलब्धी, शुल्क, निवडक प्रवेश आणि विस्तार — ४५
माध्यमिक शिक्षण : दर्ज्यात सुधारणा आणि तांत्रिक शिक्षण — ५६
उच्च शिक्षण आणि संशोधन — ६१
भाषाविषयक राष्ट्रीय धोरण — ६९
प्रशासन आणि आर्थिक साहाय्य — ७३

५. कार्यवाही — ७९–९०

काही चुकीची आणि अपुरी उत्तरे — ७९
मूलभूत प्रश्न — ८२
नवा दृष्टिकोन — ८३
बदलाचे घटक — ८७
यशसिद्धीसाठी आवश्यक परिस्थिती — ८७

# प्रमुख निष्कर्ष आणि शिफारशी यांचा सारांश

## १. आव्हान

भारतात औपचारिक शिक्षणपद्धतीला आता अवाढव्य स्वरूप प्राप्त झालेले असून तीत सात लाख संस्था, पस्तीस लाख शिक्षक आणि दहा कोटी विद्यार्थी समाविष्ट झाले आहेत. या शिक्षणावर दरवर्षी अडीच हजार कोटी रुपये खर्च होत असतात. एवढा खर्च होऊनही या शिक्षणपद्धतीचा गरीब किंवा अत्यंत गरीब असलेल्या सामान्य जनतेला काहीच लाभ होत नाही. बहुसंख्य गरीब लोक अजूनही निरक्षर आहेत; त्यांची बरीचशी मुले शाळेत जात नाहीत आणि जी जातात ती लवकरच शाळा सोडून देतात. शिक्षण पूर्ण करणाऱ्या मुलांची संख्या फारच थोडी असते. त्यांना शिक्षणपद्धतीत सामावून घेण्यात येत असल्यामुळे ते तिच्याविरुद्ध बोलत नाहीत. औपचारिक शिक्षणपद्धतीचा अवास्तव भर माध्यमिक आणि उच्च शिक्षणावर असतो. एकूण शैक्षणिक खर्चापैकी साठ टक्के खर्च याच शिक्षणावर केला जातो. या शिक्षणपद्धतीचा खरा लाभ श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गांनाच होतो. एकूण लोकसंख्येत या वर्गाची संख्या फक्त तीस टक्के असताना, माध्यमिक शाळांमधील सत्तर टक्के जागा आणि विद्यापीठ शिक्षणातील ऐंशी टक्के जागा मात्र या वर्गांनीच व्यापलेल्या असतात. शिवाय ही शिक्षणपद्धती राष्ट्रीय गरजा आणि आकांक्षा यांच्याशी पुरेशी निगडित झालेली नाही. ती कमालीची अकार्यक्षम असून तिच्यात पैशाचा बराच अपव्यय होतो. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात तर ती निर्हेतुकही झालेली आहे. देशातील शैक्षणिक परिस्थिती दरवर्षी ढासळत चाललेली असल्यामुळे तिच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी व्यापक शैक्षणिक क्रांती घडवून आणल्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही.

## २. नवी कार्यपद्धती

या शैक्षणिक क्रांतीची रूपरेषा अनेक समित्यांनी आणि आयोगांनी विशद केलेली असली आणि स्वातंत्र्यप्राप्तीपासून या क्रांतीसंबंधी सतत बोलले जात

असले, तरी आतापर्यंत शिक्षणपद्धतीत फारच थोडे मूलभूत बदल करण्यात आलेले आहेत. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी येथे अमलात आणलेल्या पारंपरिक वसाहतवादी शिक्षणपद्धतीचा प्रचंड विस्तार करण्याचे कार्यच १९४७ पासून आतापर्यंत आपण पार पाडले आहे. शैक्षणिक क्रांती घडवून आणण्यात आपल्याला जे अपयश आले त्याला सामाजिक संरचना, शैक्षणिक संरचना आणि जनआंदोलाचा अभाव ही तीन कारणे आहेत. आतापर्यंतच्या अनुभवापासून शहाणपणा शिकून आपण आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी खाली निर्देशित केल्याप्रमाणे तिहेरी कार्यपद्धती अनुसरली पाहिजे.

(१) शिक्षणाचा अलगपणे विचार करताच येत नाही. समाजाची वैशिष्ट्ये शिक्षणात प्रतिबिंबित होत असतात. भारतीय समाज हा कमालीचा विघटित आणि विषम आहे. खरे म्हणजे दोन भिन्न गटात हा समाज चिरफळला गेला आहे. लोकसंख्येमध्ये अवघे तीस टक्के प्रमाण असलेल्या श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गाच्या हातात सारी आर्थिक आणि राजकीय सत्ता एकवटलेली आहे; याउलट बहुसंख्य जनता तुटपुंज्या उत्पन्नावर गुजराण करीत असून जीवनातील चांगल्या गोष्टी तिच्यापासून दूरच राहिलेल्या आहेत. शिक्षणपद्धतीने या 'द्विस्तरीय' समाजरचनेचेच अनुकरण केले आहे. चांगली सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी लाभलेल्या थोड्या व्यक्तींना या पद्धतीमुळे बरेचसे 'चांगले' शिक्षण मिळते. (याचा अर्थ असा की शिक्षणामुळे त्यांना उच्चभ्रू समाजामध्ये प्रवेश मिळतो.) बहुसंख्य जनतेला मात्र निकृष्ट प्रतीचे आणि तेही थोडेसेच शिक्षण मिळते. अनेकांना तर मुळीच शिक्षण लाभू शकत नाही. या अशा विषम समाजरचनेमध्ये शिक्षण समताधिष्ठित करणे अशक्य आहे. म्हणून समाजातील दारिद्र्य आणि विषमता कमी करीत असतानाच सर्व लोकांना चांगले शिक्षण मिळेल असा प्रयत्न करायला हवा. शैक्षणिक परिवर्तनाचे कार्यक्रम सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाच्या पूरक कार्यक्रमांबरोबरच अंगिकारावयास हवेत. या कार्यक्रमांचे परिणाम येत्या दहा वर्षांच्या आत दिसून यायला हवेत, असे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून त्यांची निर्धारपूर्वक आणि सुनियोजित कार्यवाही झाली पाहिजे.

(२) आपल्याला जर खरोखरच अर्थपूर्ण प्रगती करावयाची असेल तर औपचारिक शिक्षणपद्धतीच्या सध्याच्या संरचनेमध्ये मूलभूत बदल केलेच पाहिजेत. सहकार्याने आणि समूहभावनेने कार्य करण्याची वृत्ती, बौद्धिक आणि शारीरिक श्रमांची परस्परपोषकता, कौशल्याचा विकास आणि चारित्र्यनिर्मिती या सामाजिक उद्दिष्टांचा पुरस्कार करणारी मूल्यपद्धती शिक्षणाने विकसित केली पाहिजे. अध्यापनाऐवजी अध्ययनावर भर हवा; पूर्ण वेळेचे, अंश वेळेचे आणि सोयीच्या वेळेचे या तिन्ही अध्ययनप्रणालींना समान स्थान आणि दर्जा मिळाला पाहिजे;



शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या इयत्तांमध्ये प्रवेश घेण्याची मुभा असावयास हवी; अभ्यासक्रमाची निवड, आशय आणि कालावधी यात पुरेशी लवचिकता असली पाहिजे; आणि शिक्षणप्रसारासाठी सर्व सामाजिक यंत्रणांचा आणि सर्व अध्यापनसामग्रीचा वापर करावयास हवा. शिक्षणाच्या आशयातही मूलगामी बदल घडवून आणण्याची गरज आहे. तसेच त्याला विद्यमान सामाजिक परिस्थितीचा संदर्भही लाभला पाहिजे. बौद्धिक आणि शारीरिक श्रमांची संलग्नता, विकासाशी शिक्षणाचा अनुबंध, संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यावर भर, लोकशाही, सर्वधर्मसमभाव आणि समाजवाद या मूल्यांची जोपासना इत्यादी मार्गांनी हे बदल साध्य होऊ शकतील. शिक्षणाचा दर्जा सर्व पातळ्यांवर सुधारला पाहिजे आणि संपूर्ण शिक्षणपद्धती लवचिक, विविधस्वरूपी, कार्यक्षम आणि गतिशील करावयास हवी. तसे झाल्यास शासकीय शिक्षणखात्यांना, शाळांना आणि शिक्षकांना नवनवे प्रयोग करायला प्रोत्साहन मिळेल. मात्र नवनिर्मिती करताना मूलभूत राष्ट्रीय संकल्पना आणि सिद्धान्त यांच्याशी ती संबंधित राहील अशी दक्षता घेतली पाहिजे.

(३) जन-आंदोलनाचा पाठिंबा लाभल्याशिवाय अशा तऱ्हेचे मूलगामी सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तन घडून येणार नाही. गरीब लोकांचे दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठी आणि त्यांना किमान जीवनमान लाभण्यासाठी अशा आंदोलनाची नितांत आवश्यकता आहे. ( गरिबांनी आपल्या हक्कांसाठी लढावे याकरिता त्यांच्यात जागृती आणि संघटना घडवून आणली पाहिजे.) हे कार्य मूलतः राजकीय आहे हे खरे आहे, परंतु शिक्षण राजकारणापासून अलिप्त राहूच शकत नाही. अशा तऱ्हेचे जनआंदोलन उभे राहिले तर ते नव्या शैक्षणिक कार्यक्रमांच्या कार्यवाहीला निश्चितच उपयुक्त ठरेल. त्याचप्रमाणे शैक्षणिक परिवर्तनाच्या महान प्रयत्नांचा जनआंदोलनालाही लाभ होऊ शकेल.

## ३. प्रमुख कार्यक्रम

आपल्याला आवश्यक असलेले शैक्षणिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी जे प्रमुख कार्यक्रम विकसित करायला हवेत त्यांची रूपरेषा खालीलप्रमाणे आहे :

१) **प्रौढशिक्षण :** प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमाला सर्वात अधिक प्राधान्य मिळाले पाहिजे. या शिक्षणाला खर्चही कमी येतो आणि त्याचे परिणाम लवकर आणि भरपूर दिसून येतात. प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमात १५-२१ या वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या तरुणांच्या शिक्षणावर सर्वाधिक भर द्यावयास हवा. आम्ही कोणी तरी आहोत ही जाणीव गरिबांमध्ये निर्माण करणे हाच प्रौढशिक्षणाचा प्रधान हेतू आहे. त्यांच्यात ही जाणीव निर्माण झाली की ते आपले

अधिकार बजावू शकतील आणि भय, उपासमार आणि परावलंबन यांपासून आपण स्वतंत्र होऊ शकतो हेही त्यांना जाणवू लागेल. स्थानिक परिस्थिती आणि शिकणाऱ्यांच्या गरजा नि हितसंबंध यांच्याशी प्रौढशिक्षणाचा आशय निगडित असला पाहिजे. प्रौढशिक्षणात साक्षरतेला महत्त्व असले तरी तेवढ्या-पुरतीच ती मर्यादित राहाता कामा नये. प्रौढशिक्षणाचा विशाल आणि राष्ट्र-व्यापी कार्यक्रम हाती घेऊन त्यासाठी शालेय पद्धतीमधील आणि त्या पद्धती-बाहेरचीही सर्व साधनसामग्री पूर्णपणे वापरण्यात आली पाहिजे.

२) **सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण :** प्राथमिक शिक्षण (६-१४ वयोगट) सार्वत्रिक करावयास हवे. त्यासाठी येत्या पाच-दहा वर्षांमध्ये सघन आणि सतत प्रयत्न केले पाहिजेत. मुली आणि गरीब वर्गातील मुले यांना या शिक्षणात दाखल करून घेण्यावर विशेष भर दिला पाहिजे. वेगवेगळ्या इयत्तांत प्रवेश देण्याची पद्धत अंगिकारली पाहिजे. ज्यांना पूर्णवेळेच्या शाळेत जाणे शक्य नाही अशा सर्व मुलांसाठी शिक्षणाची सोय व्हावयास हवी. प्राथमिक शिक्षणाचा आशयही पूर्णपणे बदलला पाहिजे. मुख्य म्हणजे या शिक्षणात उत्पादक कार्य आणि समाज-सेवा यांचा अंतर्भाव व्हावयास हवा. तसेच या शिक्षणाचा आशय भोवतालच्या परिस्थितीशी संबंधित असला पाहिजे. आपण शाळेत जावे आणि शिकत राहावे असे मुलांना वाटण्यासाठी शिक्षणाचा दर्जाही सुधारावयास हवा. या कार्यक्रमाचे (आणि त्याचबरोबर प्रौढशिक्षणाचेही) प्रशासन पूर्णतया विकेंद्रित केले पाहिजे. प्रत्येक मुलावर कराव्या लागणाऱ्या खर्चात कपात व्हावयास हवी. ज्या राज्यांमध्ये शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या बरीच आहे आणि ज्यांच्यापाशी पुरेसा पैसा नाही अशा राज्यांना विशेष साहाय्य केले पाहिजे. समान दर्जाच्या शाळांची पद्धत सर्वत्र अनुसरावयास हवी.

३) **माध्यमिक शिक्षण :** प्राथमिकोत्तर शिक्षणाचा विकास करताना पुढील सूत्रे ध्यानात ठेवावयास हवीत :

(क) माध्यमिक शिक्षण हा प्रत्येकाचा अधिकार नव्हे.

(ख) एखाद्या व्यक्तीने किती शिक्षण घ्यावे याबाबत कोणताही निर्बंध नसला तरी हे शिक्षण घेणाऱ्यांनी शासकीय साहाय्याची अपेक्षा करता कामा नये. जे विद्यार्थी सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बळ वर्गातील आहेत त्यांनाच माध्य-मिक शिक्षणासाठी शासकीय निधीतून साहाय्य केले जावे.

(ग) आतापर्यंत प्राथमिकोत्तर शिक्षण ही मुख्यतः श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गांचीच मिरासदारी झालेली असल्यामुळे, गरीब मुलांना माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेता यावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची जरुरी आहे. त्यासाठी शुल्क-माफी, शिष्यवृत्त्या, वैयक्तिक मार्गदर्शन आदी उपाय योजता येतील. तसेच अनु



सूचित जाती-जमातींना सध्या ज्या सवलती आहेत त्या सामाजिक आणि आर्थिक-दृष्ट्या मागास अवस्थेत असलेल्या सर्व व्यक्तींना मिळावयास हव्यात. त्याबाबतीत जात, धर्म वा लिंग यावरून कोणताही भेद केला जाता कामा नये.

(घ) विशेष म्हणजे दुर्बळ घटकांमधील बुद्धिमान मुले निवडून काढण्यासाठी देशव्यापी आणि सघन प्रयत्न करायला हवा. शासनाने या मुलांचे पालकत्व स्वीकारून त्यांना हवे असेल ते शिक्षण घेण्यासंबंधी मदत केली पाहिजे.

(च) प्राथमिकोत्तर शिक्षणात शुल्कासंबंधी दुहेरी पद्धत असावी. गरीब मुलांना हे शिक्षण पूर्णतया मोफत मिळाले पाहिजे, तर सुखवस्तू वर्गातील पालकांना आपापल्या ऐपतीनुसार मुलांसाठी शुल्क द्यावे लागले पाहिजे.

(छ) विद्यानिकेतनांसारख्या (पब्लिक स्कूल) स्वतंत्र शाळा शक्यतोवर रद्द केल्या पाहिजेत. तसे करणे ताबडतोब शक्य होणार नसेल तर त्या शाळांनी आपल्या एकूण जागांपैकी पन्नास टक्के जागा सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बळ असलेल्या वर्गातील मुलांसाठी राखून ठेवल्या पाहिजेत, असे त्यांच्यावर बंधन घालावे.

(ज) शासकीय पाठिंब्यावर वा मदतीवर चालणाऱ्या पूर्णवेळच्या सर्व उच्च माध्यमिक शाळांमधील आणि महाविद्यालयांमधील प्रवेश निवडक पद्धतीने देण्यात यावा. अशा शिक्षणसंस्थांमधील उपलब्ध जागांपेक्षा अर्जदारांची संख्या अधिक असेल तर प्रवेशपात्र विद्यार्थ्यांसाठी काही निकष निश्चित केले जावेत. मात्र दुर्बळ घटकांतील विद्यार्थ्यांसाठी काही जागा राखून ठेवण्यात याव्यात. विद्यार्थ्यांच्या चाचणीचा दर्जाही सुधारला पाहिजे.

(झ) प्राथमिकोत्तर शिक्षणातील सर्व परीक्षांना बसण्याची खाजगी उमेदवारांना परवानगी असली पाहिजे. त्यासाठी सर्व भाषांमध्ये पत्रद्वारा अभ्यासक्रमाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

(ट) महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी सध्या होत असलेली गर्दी कमी करण्याच्या दृष्टीने उपाय योजिले पाहिजेत. त्याचा परिणाम पदवी आणि नोकरी यांचा संबंध तोडण्यात झाला पाहिजे.

(ठ) नव्या शिक्षणसंस्था स्थापन करण्याची प्रवृत्ती मर्यादित केली पाहिजे. नव्या शिक्षणसंस्था कोठे काढायच्या याचा काळजीपूर्वक विचार करावयास हवा. एखाद्या विभागाची गरज, विशिष्ट दर्जा राहील अशी ग्वाही आणि साधन-सामग्रीची उपलब्धी या गोष्टी नव्या शिक्षणसंस्था स्थापन करताना ध्यानात घेतल्या पाहिजेत.

(ड) विद्यमान शिक्षणसंस्था आणि अभ्यासक्रम यांची शक्य तेवढी पुनर्रचना केली पाहिजे. सहकारी अध्यापन आणि उपलब्ध साधनसामग्रीचा समान वापर

या गोष्टींना प्रोत्साहन द्यावयास हवे.

(४) **माध्यमिक शिक्षण :** माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता बऱ्याच प्रमाणात वाढण्याची आणि त्याच्या आशयात मूलभूत बदल करण्याची अत्यंत गरज आहे. प्राथमिक शिक्षणानंतर तसेच दहावीनंतर आणि बारावीनंतर तांत्रिक शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरू करण्याच्या प्रश्नाकडे तातडीने लक्ष दिले गेले पाहिजे. तांत्रिक शिक्षणासाठी नंतर निवड किंवा निर्णय करण्याची पद्धत अंमलात आली पाहिजे. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यावर आधारित तांत्रिक शिक्षण देण्याची सोय व्हावयास हवी.

(५) **विद्यापीठीय शिक्षण आणि संशोधन :** अध्यापन, संशोधन आणि विस्तार यांचे एकात्मिक कार्यक्रम सुरू करण्यामध्ये आणि त्यांना समान दर्जा देण्यामध्ये विद्यापीठे आणि महाविद्यालये यांनी पुढाकार घेतला पाहिजे. महाविद्यालयीन अभ्यासक्रमांची पुनर्रचना करून त्यांचा दर्जा उंचावण्यात आला पाहिजे. संलग्न महाविद्यालयांना अनुदान द्यावयाच्या पद्धतीत आणि तिच्या राज्यपातळीवरील प्रशासकीय यंत्रणेत बरीच सुधारणा करायला वाव आहे. पदव्युत्तर पातळीवरच्या शिक्षणातही सुधारणा अपेक्षित आहे. पदव्युत्तर अध्यापनाची गुणवत्ता वाढणे आवश्यक असून मूलभूत आणि उपयोजित संशोधनास चालना द्यावयास हवी. विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि बदलत्या गरजा यांच्याशी सुसंवादी ठरेल अशा पद्धतीने उच्च शिक्षणाची विविधस्वरूपी संरचना केली पाहिजे. नवीन आंतरविद्याशाखीय क्षेत्रे लक्षात घेऊन अभ्यासक्रमात विविधता यावयास हवी. विद्यार्थ्यांना विषयांची निवड करायला अधिक वाव असला पाहिजे. सत्रपद्धतीचा स्वीकार करायला हवा. संपूर्ण विद्यापीठीय पद्धतीचे विकेंद्रीकरण करण्यात आले पाहिजे. विद्यापीठांकडून विद्यापीठीय विभागांकडे आणि महाविद्यालयांकडे आणि त्यांच्याकडून शिक्षक आणि विद्यार्थी यांच्याकडे स्वायत्तता संक्रमित झाली पाहिजे. ( शासनाने या स्वायत्ततेचा आदर राखला पाहिजे आणि समाजाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यासाठी शिक्षणशास्त्रज्ञांनी या स्वायत्ततेचा वाढता वापर केला पाहिजे. ) विद्यापीठीय शिक्षण सध्या अतिशय निर्हेतुक झालेले असून ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि राष्ट्रीय गरजा नि आकांक्षा यांच्याशी उच्च शिक्षण निगडित करण्यासाठी कठोर राजकीय निर्णय आणि निर्धारी कृती करण्याची गरज आहे.

(६) **भाषाविषयक राष्ट्रीय धोरण :** भाषाविषयक राष्ट्रीय धोरण निश्चित करून ते निग्रहपूर्वक कार्यवाहीत आणले पाहिजे. भारतीय भाषांचा आणखी विकास करून महाविद्यालयीन शिक्षणातही त्यांचा माध्यम म्हणून वापर करावयास हवा. तसे केल्याने इंग्रजीचा चांगला अभ्यास करण्याची गरज कमी होण्याऐवजी वाढेल. इंग्रजी शिकविण्यासाठी लवचिक, गतिशील, आधुनिक पद्धती अवलंबल्या पाहिजेत. एकंदरीने भाषाविषयक धोरण काळजीपूर्वक हाताळले पाहिजे. हिंदीचा विकास



आणि प्रसार करण्याची गरज असली तरी केंद्रीय कारभारात आणि राष्ट्रीय पातळीवर हिंदीबरोबर इंग्रजीही दीर्घ काळ चालू राहील हे मान्य करावयास हवे.

(७) **प्रशासन :** शिक्षणामध्ये सर्व समाज सहभागी झालेला असतो. सर्व व्यक्ती आणि सर्व सामाजिक संस्था शिक्षणाशी संबंधित असतात. म्हणून वेगवेगळ्या पातळीवरील शिक्षणसंस्थांनी स्वतंत्रपणे कार्य करीत बसण्याऐवजी एकत्र येऊन परस्पर–सहकार्याचा कार्यक्रम अंगिकारिला पाहिजे. भारतासारख्या विशाल आणि विविधतापूर्ण समाजामध्ये शैक्षणिक प्रशासन केंद्रीभूत असून चालणार नाही. केंद्र सरकारने शिक्षणप्रसाराच्या बाबतीत प्रोत्साहक नेतृत्व पुरविले पाहिजे; पण त्याने राज्यांवर कोणताही दबाव आणता कामा नये. राज्य शासनांनी विद्यापीठांच्या स्वायत्ततेचा योग्य तो मान राखला पाहिजे. तसेच विद्यापीठांनी या स्वायत्ततेमध्ये आपल्या विभागांना आणि संलग्न महाविद्यालयांना सहभागी करून घेतले पाहिजे. शालेय शिक्षणासाठी जिल्हा ( किंवा गट ) पातळीवर योग्य अशा यंत्रणा स्थापन करून प्रत्येक स्थानिक लोकसमूहाला आपापल्या विभागातील शाळेच्या कार्यामध्ये भाग घेता आला पाहिजे. असे करताना अधिकार आणि जबाबदारी यांच्या विकेंद्रीकरणासमवेत साधनसामग्रीचेही पुरेसे विकेंद्रीकरण होईल अशी काळजी घ्यावयास हवी. त्याचप्रमाणे नवनवीन प्रयोग करण्यासाठी शाळांना आणि शिक्षकांना अधिकाधिक स्वातंत्र्य मिळायला हवे. प्रायोगिक शाळांच्या कल्पनेचा जास्तीत जास्त प्रसार केला पाहिजे.

८) **अर्थकारण :** येत्या दहा वर्षांमध्ये शिक्षणावरील खर्चात दुप्पट वाढ केली पाहिजे.या पैशाचा परिणामकारक वापर होण्यासाठी विकासविषयक आणि विकासेतर खर्चांचा एकत्र विचार व्हावयास हवा. प्रत्येक विद्यार्थ्यामागे कराव्या लागणाऱ्या खर्चात कपात होणे आणि खर्च होणाऱ्या प्रत्येक रुपयाचा जास्तीत जास्त लाभ मिळणे या दृष्टीने पराकाष्ठेचे प्रयत्न केले पाहिजेत. शिक्षणासाठी आणखी पैशाची गरज लागणार असली तरी सुयोग्य नियोजन, मानवी प्रयत्न आणि सतत समर्पित वृत्तीने परिश्रम करायला प्रोत्साहक वातावरण आदी गोष्टी पैशापेक्षाही महत्त्वाच्या आहेत.

## ४. कार्यवाही

शैक्षणिक पुनर्घटनेचे हे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आपल्याला विकासाची नवी कार्यपद्धती अवलंबावी लागणार आहे. आतापर्यंत अनेक कारणांमुळे प्रगतीत अडथळे आलेले असले, तरी पैसा कमी पडला म्हणून प्रगतीला वेग आला नाही हे कारण तितकेसे खरे नाही, हे आपण विसरता कामा नये. केंद्र शासन, राज्य शासने, राजकीय नेते, शिक्षक, विद्यार्थी आणि जनता हा समाजातील प्रत्येक

घटक कमीअधिक प्रमाणामध्ये या अपयशाला जबाबदार आहे. यापैकी प्रत्येक घटक दुसऱ्याला जबाबदार धरून स्वतः मोकळा होण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु त्यामुळे मूळ प्रश्न सुटत नाही. केवळ शिक्षणशास्त्रात सुधारणा करून ही समस्या सोडविता येणार नाही. शैक्षणिक विकासातील मुख्य अडथळे पुढीलप्रमाणे आहेत : (१) औपचारिक शिक्षणपद्धतीच्या परंपरागत पद्धतीचे वर्चस्व, (२) शैक्षणिक संरचनांची एकरूपता, गतिहीनता आणि साचेबंदपणा; (३) सूक्ष्म पातळीवरील शिक्षणकक्षांची उपेक्षा, (४) शासकीय यंत्रणेवर पूर्णपणे अवलंबन आणि लोकांच्या सहभागाचा अभाव; (५) आवश्यक कठोर निर्णय करण्यात राजकीय आणि शैक्षणिक नेतृत्वाला आलेले अपयश; (६) चुकीचे अग्रक्रम; आणि (७) आवश्यक अशा सामाजिक आणि राजकीय शक्ती विकसित करण्यातील अपयश. या सर्व प्रश्नांकडे पुरेसे लक्ष दिल्याशिवाय, कोणतीही लक्षणीय प्रगती होणार नाही.

शासकीय यंत्रणेवर अवलंबून राहाणारा आणि निवडक नि मर्यादित प्रवेशावर भर देणारा जुना दृष्टिकोन टाकून देऊन, आपले प्रश्न अल्पावधीत सोडविण्यासाठी प्रचंड कार्यक्रम संघटित करणे अत्यावश्यक आहे. लोकांच्या शिक्षणातील आपली योग्य भूमिका पार पाडण्यासाठी सरकारवर दडपण आणण्याकरिता जनआंदोलन उभारणे जरूरीचे आहे. शिक्षणपद्धतीत आणि त्या पद्धतीबाहेरही विराट सुधारणा मोहिम प्रवर्तित करायला हवी. त्याचप्रमाणे शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्ते आणि सामाजिक नि राजकीय कार्यकर्ते सहभागी होऊ शकतील असा नियोजनबद्ध नि सुसूत्र कार्यक्रम विकसित करणेही अगत्याचे आहे. समर्पित भावनेने सतत परिश्रम करायला उद्युक्त करणारे वातावरण निर्माण होण्यासाठी शिक्षणपद्धतीचा मूलभूत दृष्टिकोन बदलला पाहिजे. या सर्व कार्यक्रमात सर्वात खालच्या पातळीवरील कार्य सर्वात महत्त्वाचे आहे. लोकांमध्ये जी जागृती दिसून येत आहे तिचा पुरेपूर लाभ घेऊन जनशिक्षण आणि जनसंघटन साध्य करण्यासाठी एक व्यापक आंदोलन उभारण्याची नितांत आवश्यकता आहे. हे कार्य करण्यासाठी असंख्य सेवाभावी कार्यकर्ते पुढे आले पाहिजे. असे किती कार्यकर्ते आपण तयार करतो यावरच या कार्यक्रमाचे यश अवलंबून राहाणार आहे.





# उपोद्घात

१·०१ शैक्षणिक पुनर्रचना या विषयासंबंधी भारतात आजवर बरेच विचार-मंथन झालेले असल्यामुळे त्यासंबंधी खरोखरच नवे काही तरी सांगणे कठीण आहे. मात्र आपल्याकडे सामाजिक परिवर्तनासंबंधी आवश्यक तेवढी चर्चा झालेली नाही. त्यातून सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तनाच्या परस्परसंबंधांबाबत तर फारच थोडा विचार झालेला दिसतो. कारण ही दोन्ही परिवर्तने मूलगामी असावयास हवीत. त्याचप्रमाणे काय केले पाहिजे (परिवर्तनाचा आशय आणि कार्यक्रम) यासंबंधी बरेच काही सांगण्यात आले तरी हे बदल घडून आणण्याचे पूर्वीचे प्रयत्न का यशस्वी झाले नाहीत (निदान), यापुढे ते यशस्वी होतील यासाठी कोणते उपाय योजिले पाहिजेत (कार्यपद्धती), हे बदल प्रत्यक्षात कसे येतील (प्रक्रिया) आणि या सुधारणा घडवून आणण्याचे नेतृत्व कोण करील (परिवर्तनाचे घटक) यासंबंधी फारसे लिहिले गेलेले नाही. म्हणून आतापर्यंत अलक्षित राहिलेल्या या प्रश्नांचा उहापोह करणे आणि आपल्याला किमान कोणते शैक्षणिक नि सामाजिक बदल घडवून आणणे आवश्यक आहे आणि सरकारी धोरणावर नि लोकांच्या कृतीवर त्यांचे काय परिणाम होतील याचे शक्य तितक्या निःसंदिग्ध शब्दात विवेचन करणे, हा या पुस्तकाचा प्रमुख उद्देश आहे. हे करताना आम्ही शिक्षण आयोगाचा (१९६४–६६) अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतरच्या गेल्या बारा वर्षांतील घटनाच नव्हे, तर भारतातील आणि परदेशातील अगदी अलीकडील शैक्षणिक विचारांचाही मागोवा घेतला आहे.

प्रकरण दुसरे

# सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तन

२·०१ शिक्षणाचा विचार करताना प्रथम लक्षात घ्यावयाचा मुद्दा हा की एकंदर सामाजिक प्रक्रियेचा शिक्षण हा एक उपविभाग आहे आणि सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय प्रक्रियांबरोबर त्याची गुंफण झालेली आहे. शिक्षणासंबंधीचे विवेचन अर्थपूर्ण व्हावयाचे असेल तर त्याच्या पार्श्वभूमीची चार अंगोपांगे नजरेसमोर ठेवायला हवीत : (१) प्रचलित सामाजिक परिस्थितीमध्ये कोणत्या त्रुटी आहेत याविषयीचे मार्मिक विवेचन, (२) 'इष्ट' वाटणाऱ्या समाजाची संकल्पना, (३) सद्यस्थितीकडून इष्ट स्थितीकडे जाताना, सामाजिक परिवर्तनाच्या कोणकोणत्या प्रक्रियेतून जावे लागेल याचा अंदाज, आणि (४) सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यामधील शिक्षणाची भूमिका.

२·०२ **भारतीय समाज** : अपेक्षित वा इष्ट समाजरचनेसंबंधीचा महात्मा गांधींनी प्रवर्तित केलेला राष्ट्रीय विचारविनिमय गेल्या अनेक वर्षांपासून बंद पडलेला आहे, आणि आपल्या देशात कोणत्या प्रकारचा समाज निर्माण करायचा आहे याची स्पष्ट प्रतिमा निर्माण करणे अजूनही आपल्याला जमलेले नाही, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. म्हणून या कार्याला अग्रक्रम देण्याचे आम्ही ठरविले आहे. याबाबतीत सैद्धान्तिक वा अन्य प्रकारचे कितीही मतभेद असले तरी विषमता आणि दारिद्र्य हे आपल्या समाजाचे गर्हणीय विशेष झालेले आहेत याबद्दल सर्वत्र एकमत आढळते. गेल्या कित्येक शतकांपासून हा समाज दुभंगलेला आणि अत्यंत विषम स्वरूपाचा झालेला आहे. थोड्या वरिष्ठ जातींच्या आणि वर्गांच्या हातात सर्व आर्थिक, राजकीय आणि ज्ञानविषयक शक्ती केंद्रित झालेली आहे; तर फार मोठ्या समाजाला शिक्षणापासून वंचित राहावे लागले आहे. राजकीय सत्तेमध्ये त्याला कधी भागीदारी मिळाली नाही. तसेच सदैव अत्यंत गरिबीमध्ये, मानवी जीवनाच्या अत्यंत खालल्या पातळीवर आयुष्य व्यतीत करावे लागले आहे. गेल्या पावणेदोनशे वर्षांमध्ये एकूण सामाजिक परिस्थितीत बरेच बदल घडून आले. संस्थानिक आणि जमीनदार इतिहासजमा झालेले असले तरी



राजकीय आणि आर्थिक अशा दोन्ही क्षेत्रांत अजूनही सरंजामशाहीतील मूल्ये आणि जीवनपद्धती यांचा पगडा कायम असल्याचे दिसून येते. सत्ताधारी वर्ग पहिल्यापेक्षा व्यापक झालेला आहे. अनेक मध्यम जातींना आणि ग्रामीण भागातील धनवंतांना त्यात स्थान मिळालेले आहे. वरिष्ठ आणि मध्यम जाती यांचा एकत्रित विचार केला तर सर्वांत अधिक उत्पन्न मिळविणाऱ्यांमध्ये त्यांचे प्रमाण तीस टक्के आहे. त्यामुळे जवळजवळ सर्व आर्थिक आणि राजकीय सत्ता त्यांच्याच हातात एकवटली असून शिक्षणाच्या आधुनिक पद्धतीचा सर्वांत अधिक लाभ त्यांनाच झालेला आहे. त्याचबरोबर गरीब लोकांची संख्या बरीच वाढली असून त्यांच्या उत्पन्नात वाढ झालेली नाही. आर्थिक साधनसंपत्तीवर त्यांचे काहीच नियंत्रण नसल्यामुळे त्यांना अत्यंत निकृष्ट आणि दरिद्री जीवन जगावे लागत आहे. त्यांच्यापैकी फारच थोड्या जणांना औपचारिक शिक्षण-पद्धतीचा लाभ मिळत आहे. त्यांचे शिक्षण पारंपरिक स्वरूपाच्या अनौपचारिक आणि सहज शिक्षणपद्धतीनीच होते. जसजसा काळ जात आहे तसतसे हे पारंपरिक शिक्षण निरुपयोगी ठरत आहे. सर्व प्रौढांना मताधिकार मिळालेला असला तरी गरिबांना राजकीय सत्तेमध्ये वाटा मिळालेला नाही. कारण एक तर त्यांच्यापाशी आर्थिक वा ज्ञानात्मक सत्ता नाही. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे कारण हे आहे आहे की ते विभागलेले आणि असंघटित आहेत. त्यामुळे त्यांना सरंजामशाहीच्या, अर्धसरंजामशाहीच्या किंवा अगदी प्राथमिक अवस्थेतील परिस्थितीत राहावे लागते. जीवनातील चांगल्या गोष्टी त्यांच्यापासून दूरच राहिलेल्या आहेत. स्वातंत्र्य, न्याय, समता आणि व्यक्तिप्रतिष्ठा या तत्त्वांवर आधारलेली नवी समाजरचना निर्माण करण्याचे उद्दिष्ट आपण पत्करले असले तरी अजूनही भारतीय समाज अनेक पातळ्यांवर विभागला गेलेला आणि असमान राहिलेला आहे. मूठभर श्रीमंत आणि सुखवस्तू लोक नि गरीब आणि अत्यंत गरीब असलेला फार मोठा समाज यांच्यात जीवनमान आणि जीवनपद्धती यांबाबत फार मोठे अंतर पडलेले आहे. म्हणून, समताधिष्ठित समाज निर्माण करणे हा आपल्या सामाजिक परिवर्तनाचा प्रमुख घटक ठरला पाहिजे. आपल्या समाजातील विशाल जनसमूह जागृत आणि संघटित होईल, त्याला चांगले जीवनमान लाभेल, त्याच्यापाशी पुरेशी राजकीय सत्ता असेल, राष्ट्रीय आणि सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांमधील निर्णयांमध्ये तो सहभागी होईल आणि आपला सांस्कृतिक नि शैक्षणिक विकास करून घेण्यासाठी त्याला आवश्यक त्या सर्व सोयी उपलब्ध होतील अशी या समताधिष्ठित समाजामागील कल्पना आहे. हे परिवर्तन घडून येण्यासाठी लोकांना जागृत आणि संघटित करणे हे अत्यंत महत्त्वाचे आणि आवश्यक पाऊल उचलले पाहिजे. 'आहे रे' वर्ग कोणता दृष्टिकोन स्वीकारतो यावर हे

परिवर्तन शांततामय मार्गाने होणार आहे किंवा नाही हे अवलंबून राहील. लोकांना जागृत आणि संघटित करण्याच्या कार्यात त्याने अडथळा आणला किंवा ते दडपून टाकण्याचा प्रयत्न केला तर हिंसा अपरिहार्य ठरेल. काळाची हाक ओळखण्याचा समजूतदारपणा या वर्गाने दाखविला आणि जे अपरिहार्य आहे त्याच्याशी जुळवून घेण्याची तयारी दर्शविली तरच हिंसाचार टाळणे शक्य होईल.

२·०३ **भारतीय शिक्षण :** एके काळी भारत शिक्षणाच्या बाबतीत जगात आघाडीवर होता. मानवाचे ज्ञान आणि संस्कृती यांच्या विकासात भारताने महत्त्वपूर्ण भर घातली. त्या काळी जगाच्या इतर भागातील हुशार विद्यार्थी उच्च अध्ययनासाठी भारतातील अध्ययन केंद्रांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये येत असत. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतात आधुनिक शिक्षणपद्धतीचा पाया घातला गेला त्या वेळी हे प्राचीन वैभव जवळजवळ लुप्त झालेले होते. तरीदेखील पारंपरिक शिक्षणपद्धतीचे जे काही अवशेष त्या वेळी उरलेले होते ते इतर देशातील तत्कालीन परिस्थितीच्या तुलनेने खूपच चांगले होते. मात्र आधुनिक निकष लावले तर ते अवशेष निश्चितच असमाधानकारक होते. त्या वेळी उच्च शिक्षणाचा अधिकार ही अल्पसंख्य उच्च समाजाची म्हणजेच वरिष्ठ वर्णांची मिरास झालेली होती. त्यावेळी शिक्षण अभिजात भाषेत देण्यात येत असे. ती लोकभाषा नव्हती. तसेच त्या शिक्षणाचा भर धर्म आणि कर्मकांड यांच्यावरच होता. केवळ श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गातील आणि वरिष्ठ जातीतील मुलांनीच औपचारिक प्राथमिक शिक्षण घेतले पाहिजे असे मानले जात असे. मुली आणि सर्वसामान्य नागरिकांची मुले यांची संख्या अत्यल्पच असायची. शिवाय मुलांनी आणि तरुणांनी शिक्षण घेतले पाहिजे, प्रौढांना त्याची जरूरी नाही असेही गृहीत धरले गेले होते. त्यामुळे साहजिकच आयुष्यभर अध्ययन करण्याचा लाभ अत्यंत थोड्या व्यक्तींना मिळत असे.

२·०४ या पारंपरिक शिक्षणपद्धतीचा विचार करून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी नवी शिक्षणपद्धती भारतात उभारली असती तर ते व्यापक देशहिताच्या दृष्टीने इष्ट झाले असते. परंतु एक तर त्यांनी पारंपरिक शिक्षणपद्धतीकडे दुर्लक्ष केले किंवा हेतुतः तिच्यातील बरेवाईट, सगळेच नष्ट केले. त्यांनी इंग्लंडमधील शिक्षणपद्धतीच्या धर्तीवर येथे नवी शिक्षणपद्धती निर्माण केली. तसे करण्यामागचा त्यांचा उद्देश स्पष्ट होता. इंग्रजी भाषा जाणणारा शिक्षित वर्ग निर्माण करणे, या वर्गाला इंग्रजी भाषेच्या माध्यमामार्फत पाश्चात्त्य ज्ञानाची ओळख करून देणे आणि या वर्गाने सत्ताधारी आणि जनता यांच्या दरम्यान दुभाषाचे आणि मध्यस्थाचे काम करावे या अपेक्षेतूनच ही नवी शिक्षणपद्धती साकार झाली होती. त्याबरोबरच ब्रिटिश राज्यकर्त्यांनी मुली आणि सर्वसामान्य लोक यांच्यात शिक्षणप्रसार व्हावा या



दृष्टीनेही प्रयत्न केले. त्यात अनुसूचित जाती आणि जमाती यांचाही समावेश होता. मात्र हे करताना ब्रिटिश राज्यकर्त्यांनी प्रशासकीय आणि आर्थिक कारणे पुढे करून लोकांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घ्यायला सतत नकार दिला. त्यांच्या दृष्टीने प्रशासकीय आणि आर्थिक कारणांना निर्णायक महत्त्व होते. त्यांचा 'शिक्षण अधोगामी होण्याच्या' सिद्धांतावर विश्वास होता. म्हणजे असे की शिक्षण आणि संस्कृती यांचा प्रवाह अपरिहार्यपणे वरिष्ठ वर्गाकडून जनसामान्यांकडे झिरपत जातो. म्हणून आपण प्रथम शिक्षित वर्ग निर्माण करीत आहेत आणि कालांतराने या वर्गाने जनतेच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारावी असा राज्यकर्त्यांकडून युक्तिवाद केला जाई. हे मर्यादित उद्दिष्ट साध्य करण्यात त्यांना यश लाभले, आणि त्यामुळे १९४७ मध्ये त्यांची राजवट संपुष्टात आली तेव्हा वरिष्ठ आणि मध्यम वर्गांना लाभदायी झालेली, औपचारिक शिक्षणाच्या नव्या पद्धतीची निर्मिती हा त्यांचा शैक्षणिक वारसा ठरला. त्यावेळी गरीब लोक मात्र या शिक्षणपद्धतीपासून दूरच राहिलेले होते. त्यांची मुले शाळेत जात नव्हती. जी मुले शाळेत नाव दाखल करीत होती त्यांपैकी बरीचशी मुले लवकरच शाळा सोडून देत होती. त्यामुळे देशातील १४ टक्के लोकच साक्षर झालेले होते.

२·०५ औपचारिक शिक्षणपद्धती ब्रिटिश प्रशासनच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे या पद्धतीबाहेर राष्ट्रीय विद्यालये आणि विद्यापीठे यांचे देशभर जाळे निर्माण करण्याचा, १९०० ते १९४७ या काळात राष्ट्रीय स्वातंत्र्य-आंदोलनाचा एक भाग म्हणून प्रयत्न करण्यात आला. परंतु या शिक्षणसंस्थांचे कार्य अत्यंत मर्यादित राहिले. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी १९२१ मध्ये शिक्षण भारतीय नियंत्रणाखाली दिले. तेव्हापासून प्रांतिक शिक्षणमंत्र्यांनी प्रौढ आणि सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या कार्यक्रमांना चालना देण्याचे धोरण अनुसरले. परंतु त्यांच्यावर राजकीय आणि आर्थिक बंधने असल्यामुळे प्रांतिक शिक्षण मंत्र्यांच्या प्रयत्नांना फारसे यश आले नाही. त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये, स्वतःला साहाय्यभूत होणे एवढे एकच शैक्षणिक कार्य शिक्षित वर्गांनी पार पाडले. याचा अर्थ असा की, या वर्गांनी शाळा आणि महाविद्यालये काढून वरिष्ठ आणि मध्यम वर्गांमध्ये शिक्षणप्रसार केला. हे करताना ते असे सांगत असत की, एकदा ब्रिटिश राजवटीचा अडसर दूर झाला की लोकांमध्ये शिक्षणप्रसार व्हावा यासाठी आपण सत्वर आणि अत्यंत परिणामकारक उपाय योजू. म्हणूनच गोखले म्हणत असत, "देशाला स्वातंत्र्य मिळाले की शिक्षित लोकांना मोठी कामगिरी पार पाडावी लागेल."

२·०६ लोकांना स्वातंत्र्यपूर्व काळात दिलेल्या आश्वासनांचा, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विसर पडला ही खेदाची गोष्ट आहे. लोकांना साक्षर करण्याचा विराट कार्यक्रम हाती घेतला जाईल अशी जी अपेक्षा होती ती सिद्धीला गेली नाही.

त्याऐवजी ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या औपचारिक शिक्षणपद्धतीचा व्यापक प्रमाणावर विस्तार करण्यात आला. आपण १९४८ मध्ये विद्यापीठ शिक्षण आयोगाची, १९४९ मध्ये वरिष्ठ पातळीवरील तांत्रिक मनुष्यशक्ती समितीची आणि १९५२ मध्ये माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना केली. या सर्व समित्यांमुळे उच्च वर्गांना शिक्षण देणारी ब्रिटिश पद्धत अधिकच बळकट झाली आणि माध्यमिक नि विद्यापीठीय शिक्षणाला अवास्तव महत्त्व प्राप्त झाले. आपल्या सध्याच्या एकूण शैक्षणिक खर्चापैकी जवळजवळ ६० टक्के रक्कम माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षणावरच खर्च होत आहे. उलट, या काळात एकही प्राथमिक शिक्षण आयोग स्थापन करण्यात आला नाही. हे खरे आहे की आपल्या राज्यघटनेच्या ४५ व्या कलमात असे म्हटले आहे की सर्व मुलांना, ती चौदा वर्षांची होईपर्यंत, सक्तीचे आणि मोफत शिक्षण मिळेल अशी व्यवस्था १९६० पर्यंत निर्माण होण्याच्या दृष्टीने सरकार प्रयत्न करील. परंतु त्या आश्वासनाला कायदेशीर बंधन नव्हते आणि म्हणून ते अद्याप प्रत्यक्षात उतरलेले नाही. प्रौढशिक्षणाची तर जवळजवळ पूर्ण उपेक्षाच झालेली आहे. शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चापैकी एक टक्कादेखील रक्कम प्रौढशिक्षणासाठी वापरली जात नाही. राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या संस्था नवा मार्ग अनुसरतील ही आशाही नष्ट झालेली आहे. कारण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेच त्यांनी औपचारिक शिक्षणपद्धतीचा स्वीकार केला. त्यामुळे औपचारिक शिक्षणपद्धती ही आता एक अवाढव्य संरचना झालेली असून तिने सात लाख शिक्षणसंस्था, दहा कोटी विद्यार्थी आणि पस्तीस लाख शिक्षक यांना सामावून घेतले आहे. या शिक्षणपद्धतीवर २५०० कोटी रुपये खर्च केले जातात. संरक्षणाच्या खालोखाल औपचारिक शिक्षणावरच खर्च होत आहे. औपचारिक शिक्षणावर एवढा प्रचंड खर्च होत असताना आणि त्याच्यात बरेच बदल घडवून आणलेले असतानादेखील या शिक्षणपद्धतीचे फायदे वरिष्ठ आणि मध्यम वर्गांनाच मिळत आहेत. ही पद्धती मुळात या वर्गासाठीच अंगिकारण्यात आली होती. लोकांचे शिक्षण करण्याच्या दृष्टीने आणि विशेषतः संख्यात्मक नि गुणात्मक दृष्टीने तिचा लाभ घेण्याची ज्यांच्यापाशी अत्यंत मर्यादित क्षमता आहे अशा गरीब लोकांना शिक्षण देण्याच्या दृष्टीने औपचारिक शिक्षणपद्धतीने फारसे काही साधलेलेच नाही. या शिक्षणपद्धतीकडून होणारा अन्याय आणि गरिबांसंबंधीची तिची अक्षम्य अनास्था खालील निर्विवाद गोष्टींनी सिद्ध होत आहे.

१. (दहा वर्षे वयाचे आणि त्यावरील वयाचे) सुमारे साठ टक्के लोक अजून निरक्षर आहेत, आणि या अवाढव्य शिक्षणपद्धतीपासून त्यांचा कोणताही लाभ झालेला नाही.

२. समाजातील अत्यंत कनिष्ठ वर्गांमधील सुमारे २० टक्के मुले शाळेत कधीच



जात नाहीत. तो गरीब म्हणून जन्मतात आणि गरीब म्हणून सारे जीवन व्यतीत करतात. औपचारिक शिक्षणपद्धती त्यांच्याकडे ढुंकूनही पाहत नाही.

३. त्यांच्यापैकी जी मुले शाळेत जातात त्यातील निम्मी मुले पाचव्या इयत्तेपूर्वीच शाळा सोडून जातात. ७५ टक्के मुले आठवीपर्यंत पोहोचू शकत नाहीत. अवघी १५ टक्के मुलेच बारावीपर्यंत पोहोचतात आणि एक टक्क्यापेक्षाही कमी मुलांना किमान एक पदवी मिळविणे शक्य होते.

४. वर निर्देश केल्याप्रमाणे ही शिक्षणपद्धती प्रौढशिक्षण, सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण किंवा सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः गरिबांना उपयुक्त ठरू शकणारे अनौपचारिक शिक्षण यांसारख्या कार्यक्रमाना सर्वात खालचे स्थान देते. उलटपक्षी, ही पद्धती माध्यमिक आणि उच्च शिक्षणाला सर्वात वरचे स्थान देते आणि आपल्याजवळची सारी साधनसंपत्ती याच शिक्षणावर खर्च करते. या शिक्षणपद्धतीचा लाभ वरिष्ठ पातळीवरच्या अवघ्या ३० टक्के लोकसंख्येलाच होतो.

५. या शिक्षणपद्धतीकडून गरीब कुटुंबातील मुलांना सहसा चांगली वागणूक दिली जात नाही. कारण तिचा मोहरा वरिष्ठ आणि मध्यम जातींच्या गरजा आणि आकांक्षा यांच्याकडेच वळलेला आहे. म्हणून ही शिक्षणपद्धती अजूनही उच्च शिक्षणामध्ये माध्यम म्हणून इंग्रजी भाषेचाच वापर करते. त्यामुळे शालेय पातळीवरही इंग्रजी हेच माध्यम असले पाहिजे या प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळते.

२·७ या सर्व कारणांमुळे सध्याच्या शिक्षणपद्धतीला लोकांच्या शिक्षणाचे साधन समजणे चुकीचे ठरणार आहे. किंबहुना लोकांना शिक्षित न करण्यासाठीच तिची उभारणी करण्यात आली आहे, हेच वर दिलेल्या पुराव्यावरून सिद्ध होते. लोकांमध्ये शिक्षणप्रसार करणे हे या पद्धतीचे मूलभूत उद्दिष्ट नव्हेच. प्रस्थापित समाजगटात राहू इच्छिणाऱ्या किंवा त्यात नव्याने प्रवेश करू इच्छिणाऱ्या लोकांची निवड करणारी कार्यक्षम आणि निष्ठुर यंत्रणा म्हणून कार्य करीत रहावे हाच तिचा उद्देश आहे. हे कार्यही ती निष्पक्षपातीपणे करीत नाही. जे प्रस्थापित वर्गात आहेत त्यांना त्या वर्गात राहणे सुकर जावे आणि जे अर्धविकसित वर्गात आहेत त्यांना शिक्षणाच्या महाद्वारातून प्रस्थापित वर्गात प्रवेश करणे निर्बंधित व्हावे अशा पक्षपाती वृत्तीनेच तिचे कार्य चाललेले आहे. गुणवत्तेपेक्षा योगायोगावरच ती अधिकाधिक अवलंबी होत चाललेली आहे. म्हणून सर्वसामान्य लोकांच्या मुलांना गळालेले किंवा अयशस्वी ठरविण्यात आणि त्यांना कायम दारिद्र्याच्या गर्तेत ठेवण्यात या शिक्षणपद्धतीला सार्थक वाटू लागले आहे. या लोकांच्या दारिद्र्याला आणि निकृष्ट जीवनाला जगात दुसरीकडे किंवा आपल्या यापूर्वीच्या इतिहासातही तुलना सापडणे अशक्य आहे.

२·०८ आपल्या राज्यघटनेने जिला अंतिम सार्वभौम अधिकार प्रधान केला

आहे त्या भारतीय जनतेची ही उपेक्षा केवळ सामान्य माणसाच्या दृष्टीनेच नव्हे तर संपूर्ण देशाचे आरोग्य आणि विकास या दृष्टीनेही अत्यंत घातक आहे. उपजत बुद्धिमत्ता सर्व लोकांत विभागली गेलेली असते हे लक्षात घेतले तर जगातील एकूण सुप्त बुद्धिमत्तेपैकी एकसप्तमांश बुद्धिमत्ता आपल्या देशात आहे. आणि तरीही प्रत्येक क्षेत्रातील आपले कर्तृत्व नगण्य आहे, असे आढळून येते. याचे साधे कारण असे आहे की आपल्यापाशी बुद्धिमत्तेचा जो प्रचंड साठा आहे तो आपण ध्यानातच घेतलेला नाही आणि त्याची मशागतही केलेली नाही. संपूर्ण देशाच्या भवितव्यावर याचा अनिष्ट परिणाम होणार असल्यामुळे त्याची झळ वरिष्ठ आणि मध्यम वर्गीयांनाही परिणामी सहन करावी लागेल. म्हणून, अगदी संकुचित स्वार्थाच्या दृष्टीने विचार केला तरीदेखील शिक्षणापासून आणि जीवनातील इतर चांगल्या गोष्टींपासून भारतातील सामान्य माणसाला सतत वंचित ठेवून आपण आपलेच नुकसान करून घेत आहोत आणि देशाचा विकास रोखून ठेवीत आहोत ही गोष्ट सत्ताधारी वर्गांनी ओळखली पाहिजे.

२·०९ **शिक्षण आणि समाज :** आपली शैक्षणिक आणि सामाजिक पद्धती परस्परांना पूरक आहेत, हे दिसून येते. या दोन्ही पद्धती कमालीच्या अन्याय्य आणि विषम आहेत. या दोन्ही पद्धतींचे फायदे फक्त वरिष्ठ आणि मध्यम वर्गांनाच मिळत असतात. सर्वसामान्य माणसाला त्यांच्यापासून फारच थोडा लाभ होतो. आपल्या औपचारिक शिक्षणपद्धतीची (आपण सर्वस्वी तिच्यावरच भर देत आहोत) आहे ती परिस्थिती कायम ठेवण्याकडे आणि श्रीमंत नि सुखवस्तू लोक आणि गरीब लोक यांच्यातील भयानक विषमता अबाधित राखण्याकडे जी अंगभूत प्रवृत्ती दिसून येते ती तर अत्यंत घातक आहे. आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये चांगल्या दर्जाच्या आणि प्रतिष्ठाप्राप्त शाळांची (यात विद्यानिकेतने आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा यांचा समावेश होतो) संख्या अत्यल्प आहे आणि त्यात श्रीमंत नि सुखवस्तू वर्गातील मुलांनाच प्रवेश मिळतो हे सर्वपरिचित आहे. या उलट सरकारमार्फत वा अन्य सार्वजनिक संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळांची संख्या बरीच असली तरी त्यांचा शैक्षणिक दर्जा असमाधानकारक आहे. गरिबांच्या मुलांना याच शाळांमध्ये प्रवेश घ्यावा लागतो. साहजिकच श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गातील मुले चांगल्या दर्जाच्या शाळांमध्ये दाखल होतात आणि तेथील शिक्षणाचा लाभ घेऊन नंतरच्या जीवनामध्ये महत्त्वाची आणि प्रतिष्ठित पदे भूषवितात. उलटपक्षी, गरीब लोकांची बरीच मुले एक तर शालेय पद्धतीत प्रवेशच करू शकत नाहीत किंवा निकृष्ट दर्जाच्या शाळेमध्ये प्रवेश करतात. त्यांच्यापैकी अनेकांवर मध्येच शाळा सोडून देण्याची पाळी येते. फार थोड्या मुलांना प्रस्थापितांच्या वर्गामध्ये प्रवेश मिळविणे शक्य होते. इतरांना मात्र ते ज्या उपेक्षित वर्गातून



आलेले असतात त्याच वर्गाकडे पुन्हा वळावे लागते. याशिवाय, सुखवस्तू वर्गातील मुले या शिक्षणपद्धतीमध्ये लहान वयातच प्रवेश करतात, चांगल्या वातावरणात शिकतात आणि या शिक्षणाचा अधिक काळ लाभ घेऊ शकतात. त्यामुळे यांपैकी एकही सुविधा उपलब्ध नसलेल्या गरीब सामाजिक वर्गातील मुलांपेक्षा त्या मुलांना आपोआपच श्रेष्ठत्व प्राप्त होते आणि त्यायोगे त्यांना प्रस्थापित वर्गात कायम राहणे सुलभ जाते. गरीब सामाजिक वर्गातील एखाद्या मुलाने प्रस्थापित वर्गातील मुलाइतकेच प्रावीण्य संपादन केले (आणि त्यासाठी त्याला खरोखरच बरेच परिश्रम करावे लागतात.) तरीदेखील सुखवस्तू वर्गातील मुलांच्या तुलनेने त्याची परिस्थिती खडतर असते. कारण प्रस्थापित वर्गामध्ये कोण कोणाच्या ओळखीचा आहे यालाही महत्त्व असते. या सर्व घटकांचा संकलित परिणाम हा होतो की आपली विषमतेवर आणि उच्चनीचतेवर आधारलेली शिक्षणपद्धती विषमताधिष्ठित आणि उच्चनीचता मानणारी समाजरचना बळकट करते. विषमताधिष्ठित समाजरचनेमुळे प्रथम विषमताधिष्ठित शिक्षणपद्धती अस्तित्वात आली आणि नंतर ती शिक्षणपद्धती विषमताधिष्ठित समाजरचनेला पूरक ठरली.

२·१० या पद्धतीमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची क्षमताच नाही, असा याचा अर्थ होत नाही. वस्तुतः शिक्षण आणि समाज या दोन्हींमध्ये समताधिष्ठित परिवर्तन घडवून आणण्याचा अन्तःप्रवाह वाहत असतो. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या हुशार मुलांसाठी शिष्यवृत्त्या, मुलींमध्ये शिक्षणप्रसार होण्यासाठी करण्यात येणारे विशेष प्रयत्न किंवा अनुसूचित जाती-जमातींसाठी विशेष मदतीच्या योजना आदी कार्यक्रम या परिवर्तनाचेच द्योतक आहेत. दुर्दैवाने या सर्व महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये कृतीपेक्षा घोषणांचाच आवाज निनादत आहे. त्यामुळे वंचित समाजघटकांपैकी फारच थोड्या भाग्यवान व्यक्तींना वरिष्ठ वर्गात प्रवेश करण्याची संधी लाभली आहे. त्या थोड्या व्यक्तींना लगेच वरिष्ठ वर्गामध्ये सामावून घेण्यात येत असल्यामुळे विद्यमान समाजरचना सर्वसामान्य माणसावर गंभीर अन्याय करीत असतानाही, ती स्वतःला सुरक्षित ठेवू शकते.

२·११ शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे नेमके नाते काय आहे ? या अनुबंधाला आकर्षक रूप देणे हा एक सर्वपरिचित दृष्टिकोन आहे. हा दृष्टिकोन बाळगणारे लोक असा युक्तिवाद करतात की आपण प्रथम शिक्षणात मूलगामी परिवर्तन घडवून आणले पाहिजे. कारण त्यायोगे आपोआपच सामाजिक परिवर्तन घडून येईल. उलटपक्षी, शिक्षणपद्धतीत समाजरचनेचे प्रतिबिंब पडत असल्यामुळे प्रथम सामाजिक क्रांती घडवून आणल्याशिवाय शैक्षणिक सुधारणा करता येणार नाही असे म्हणणारेही काही लोक आहेत. प्रत्यक्षामध्ये सत्य इतके साधेही नाही

आणि सोपेही नाही. समाजरचनेचे चिकित्सक विश्लेषण करणे, तिच्यातील अंतर्विरोधावर लक्ष केंद्रित करणे, घोषणा आणि कृती यांच्यातील अंतरंगावर प्रकाशझोत टाकणे, शिक्षणपद्धतीसह जेथे जेथे आवश्यक असेल तेथे तेथे रचनात्मक स्वरूपाचे कोणते बदल घडवून आणणे जरूरीचे आहे इकडे लक्ष वळविणे हे शिक्षणपद्धतीचे कार्य आहे. म्हणून मूलभूत सामाजिक बदलाची जाणीव जागृत करायला चालना देण्यामध्ये आणि या बदलाचे स्वरूप आणि पद्धत ठरविण्यामध्ये शिक्षण अत्यंत उपयुक्त भूमिका बजावू शकते. हिंसाचाराच्या किंवा मतपेटीच्या राजकीय माध्यमामार्फत कार्यवाहीत आणलेला सामाजिक बदल पूर्ण आणि बळकट करण्यासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे. शैक्षणिक घटकांमुळे ज्या सामाजिक त्रुटी निर्माण होतात त्याही शिक्षण दूर करू शकते. मात्र अन्य क्षेत्रात उद्‌भवणाऱ्या सामाजिक त्रुटींबाबत शिक्षणाला फारसे करता येणार नाही. उदाहरणार्थ, आर्थिक वा राजकीय उपपद्धतीमुळे ज्या सामाजिक त्रुटी निर्माण होतात त्याबाबत शिक्षण परिणामकारक ठरू शकणार नाही. आपण हेही ध्यानात ठेवले पाहिजे की विद्यमान समाजरचनेला पोषक ठरणाऱ्या शैक्षणिक सुधारणा अमलात आणणे सोपे असले तरी विद्यमान समाजरचनेला आव्हान देणाऱ्या किंवा तिच्या उद्दिष्टांशी प्रतिकूल असलेल्या मूलभूत शैक्षणिक सुधारणांची कार्यवाही करणे अशक्य नसले तरी अत्यंत अवघड आहे. विषमताधिष्ठित समाजरचना विषमताधिष्ठित शिक्षणपद्धती निर्माण करीत असे आणि विषमताधिष्ठित शिक्षणपद्धतीमुळे विषमताधिष्ठित समाजरचना बळकट होत जाते, या दुष्टचक्राचा भेद करायचा असेल तर आपल्याला एकाच वेळी सामाजिक आणि शैक्षणिक आघाड्यांवर जोरदार चढाई सुरू करावी लागेल असा सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर निष्कर्ष निघतो.

२·१२ सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे सांगता येतील :

( १ ) वरिष्ठ नि मध्यम वर्गातील लोक आणि सर्वसामान्य माणसे यांच्या जीवनपद्धती आणि जीवनमान यांच्यामध्ये सध्या जी प्रचंड विषमता आहे ती कमीत कमी करणे हा सामाजिक परिवर्तनाचा किमान मूलभूत उद्देश असला पाहिजे. त्यासाठी पुढील उपाय योजायला हवेत :

शोषणाच्या सर्व प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रकारांचे निर्मूलन किंवा किमानपक्षी संकुचन;

श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गातील लोकांच्या खर्चावर मर्यादा वा बंधने घालणे. त्यासाठी सध्याच्या विषम वेतनश्रेणीमध्ये दुरुस्ती करावयास हवी, शिवाय तत्संबंधित अन्य उपाय योजावयास हवेत;

लोकांना किमान जीवनमान लाभेल अशी तरतूद करणे.



त्यासाठी

( अ ) सर्वसामान्य माणसाला आवश्यक असणाऱ्या वस्तू आणि सेवा यांच्या उत्पादनवाढीला चालना देणे;

( ब ) काम करायला तयार असलेल्या सर्व सुदृढ प्रकृतीच्या व्यक्तींना वाजवी वेतन मिळेल अशी ग्वाही देणाऱ्या रोजगारांची व्यवस्था करणे, आणि

( क ) अन्नधान्ये आणि इतर जीवनावश्यक वस्तू यांच्या सार्वजनिक वितरणाची कार्यक्षम आणि देशव्यापी संघटना उभारणे.

नागरी आणि ग्रामीण विभागातील सध्याची रुंद दरी कमी करणे आणि जनतेचे नि विशेषतः शेतमजूर आणि छोटे शेतकरी यांचे जीवनमान सुधारणे हे या धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे.

( २ ) वरिष्ठ आणि मध्यम वर्गाऐवजी सर्वसामान्य नागरिकांना शिक्षणपद्धतीचा अधिक लाभ होईल एवढा तरी शिक्षणामध्ये किमान मूलभूत बदल घडवून येणे आवश्यक आहे. त्यासाठी इतर अनेक गोष्टींबरोबर खालील गोष्टी करावयास हव्यात :

—सर्वसाधारण लोकांच्या शिक्षणविषयक कार्यक्रमांना सर्वोच्च प्राधान्य देणे. त्यात निरक्षरतानिर्मूलनासह प्रौढशिक्षण, शालाबाह्य युवकांसाठी अनौपचारिक शिक्षण आणि समान शालेय पद्धतीसह प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण यांचा समावेश व्हावा.

—शिक्षणासाठी जी अतिरिक्त साधनसामग्री उपलब्ध होईल तिचा सामान्य लोकांच्या शिक्षणासाठी वापर करणे. त्यामुळे एकूण शैक्षणिक खर्चातील मोठा भाग माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी खर्च न होता लोकांच्या शिक्षणासाठी खर्च करता येईल.

शिक्षणपद्धतीमधील मूलभूत मूल्यांमध्ये परिवर्तन घडवून आणणे. या मूल्यांचा मोहरा वरिष्ठ आणि मध्यम वर्गाऐवजी सामान्य लोकांकडे वळला पाहिजे

शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर प्रादेशिक भाषांचा माध्यम म्हणून वापर झाला पाहिजे.

—श्रम आणि उत्पादन यांना प्रतिष्ठा लाभेल आणि राष्ट्रीय विकासाच्या उद्दिष्टांशी सुसंगत ठरेल अशा रीतीने शैक्षणिक आशयात बदल घडवून आणणे.

—आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेणे सुलभ करणे; त्यांना आपली गुणवत्ता वाढविता यावी यासाठी उचित उपाय योजणे.

—सध्या वरिष्ठ आणि मध्यम वर्गांना माध्यमिक आणि उच्च शिक्षणामध्ये जे आर्थिक साहाय्य लाभत आहे ते थांबविणे किंवा कमी करणे.

—वंचित सामाजिक गटातील लायक विद्यार्थ्यांना दिल्या जात असलेल्या आर्थिक साहाय्यामध्ये वाढ करणे.

—निर्णय घेणाऱ्या अधिकारयंत्रणेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी सध्याच्या शैक्षणिक प्रशासनाची पुनर्रचना करणे. त्यायोगे सर्वसामान्य माणसे आपल्या स्वतःच्या शैक्षणिक कार्यक्रमांच्या नियोजनात आणि कार्यवाहीत सक्रिय रीतीने सहभागी होऊ शकतील.

सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तनातील घनिष्ठ अनुबंध आणि दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी प्रयत्न करण्याची गरज या गोष्टींकडे आपण पूर्वी दुर्लक्ष केल्यामुळे शिक्षणपद्धतीच्या मूलगामी परिवर्तनामध्ये आपल्याला आतापर्यंत अपयश आले आहे. म्हणून सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणेचा मूलगामी, एकसमयावर्ती आणि परस्परपूरक कार्यक्रम आखून त्याची कार्यवाही करणे हा आपल्या शैक्षणिक विकासाच्या आगामी कार्यपद्धतीतील महत्त्वाचा विशेष ठरला पाहिजे.



प्रकरण तिसरे

# शिक्षणाची नवी संकल्पना आणि संरचना

३·०१ आपल्याला कोणत्या शैक्षणिक परिवर्तनाची आवश्यकता आहे, यासंबंधी येथे मुख्यतः ऊहापोह करावयाचा असल्यामुळे एकसमयावच्छेदेकरून करावयाच्या सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तनामधील सामाजिक परिवर्तनासंबंधी येथे तपशीलवार विचार करणे अप्रस्तुत ठरेल. मूल्यपद्धती, प्रक्रिया आणि जिच्या निर्मितीसाठी आपण दीडशे वर्षे राबलो त्या औपचारिक शिक्षणपद्धतीची संघटना यामध्ये मूलगामी सुधारणा घडवून आणणे हा शैक्षणिक परिवर्तनामधील प्रमुख कार्यक्रम झाला पाहिजे. कारण औपचारिक शिक्षणपद्धतीचा प्रचंड विस्तार झालेला असला तरी तिने गरीब लोकांना दूरच ठेवलेले आहे. तसेच ही शिक्षणपद्धती बहुसंख्य विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण द्यायला असमर्थ ठरल्यामुळे आपल्याला अभिप्रेत असलेल्या सामाजिक परिवर्तनामध्ये ती अडथळाच निर्माण करीत आहे. म्हणून शैक्षणिक परिवर्तनामधील या प्रमुख कार्यक्रमाला सर्वोच्च अग्रक्रम मिळायला हवा. या कार्यक्रमाच्या कार्यवाहीला दिरंगाई झाली तर मध्यंतरीच्या काळात औपचारिक शिक्षणपद्धतीचा व्याप आणि स्थितिशीलता अधिकच वाढेल आणि मग तिच्यात सुधारणा घडवून आणताना आणखी पैसा आणि शक्ती खर्च करावी लागेल.

३·०२ **मूल्यविचार :** सध्याची शिक्षणपद्धती व्यक्तिनिष्ठा, स्पर्धा, मौखिक प्रावीण्य किंवा भाषाप्रभुत्व आणि केवळ माहितीचा साठा करणे यावर अधिक भर देते. त्यापेक्षाही घातक बाब ही आहे की सध्याच्या शिक्षणपद्धतीचा मोहरा कमालीचा एककेंद्रित आहे. या अशा शिक्षणपद्धतीमुळे समानता, सत्यप्रियता किंवा आत्मपरीक्षणाची जाणीव ही मूल्ये निर्माणच होऊ शकत नाहीत. शिक्षणाच्या नव्या संकल्पनेमध्ये आपण सामाजिक उद्दिष्टे, सहकार्याची वृत्ती आणि समूहभावना, बौद्धिक आणि शारीरिक श्रमांची परस्परपूरकता, कौशल्यांची वाढ आणि चारित्र्यनिर्मिती यांचे महत्त्व जाणून घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे, जीवनाविषयीचा शास्त्रीय दृष्टिकोन विकसित करण्यावर आणि सत्यपालन, समता, स्वातंत्र्य, न्याय आणि व्यक्तिप्रतिष्ठा या मूलभूत मूल्यांची जाणीव वृद्धिंगत करण्यावर विशेष भर दिला पाहिजे.

३·०३ **औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणाची एकात्मिक सहभागनिष्ठ पद्धती :** सध्याच्या शिक्षणपद्धतीचा सारा भर औपचारिक शिक्षणावर आणि अध्ययनापेक्षा अध्यापनावर आहे. नव्या शिक्षणपद्धतीमध्ये अध्ययनाला अधिक महत्त्व दिले गेले पाहिजे. तसेच अनौपचारिक आणि सहज शिक्षणप्रणालींना औपचारिक शिक्षणप्रणालीपेक्षा वरचे नाही तरी किमान समान स्थान मिळावयास हवे. औपचारिक, अनौपचारिक आणि सहज शिक्षणप्रणालींचा समवाय साधून एकात्मिक पद्धती निर्माण होणे जरुरीचे आहे. सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये पूर्ण वेळच्या उपस्थितीसाठी फक्त एकच शिक्षणप्रणाली उपलब्ध आहे. नव्या पद्धतीमध्ये पूर्णवेळेच्या, अंशवेळेच्या आणि शिकणाऱ्याला सोयीस्कर वाटणाऱ्या वेळेच्या शिक्षणासाठी तिन्ही प्रणालींचा मुक्त वापर व्हावयास हवा. त्याचप्रमाणे त्यांचा दर्जाही एकसारखा असला पाहिजे. तसे झाले तरच विद्यार्थ्याला आपल्या गरजेनुसार एका प्रणालीकडून दुसऱ्या प्रणालीकडे जायला मोकळीक राहील. एकाच इयत्तेमध्ये प्रवेश, नंतर वार्षिक बढती आणि जवळजवळ कोठेही खंड न पडता शिक्षणाचा सतत विस्तार असे सध्याच्या शिक्षणपद्धतीचे स्वरूप आहे. नव्या पद्धतीमध्ये पुनरावृत्त ( recurrent ) शिक्षण विकसित आणि वृद्धिंगत करावयाचे आहे. तसेच अनेक इयत्तांमध्ये प्रवेश मिळण्याची सोय व्हावयास हवी. सर्व पातळ्यांवरील शिक्षणक्रमांचा कालावधी कमी करण्याची वा वाढविण्याची लवचिकताही त्यात अभिप्रेत आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला केव्हाही वा त्याच्या गरजेनुसार शिक्षणपद्धतीत प्रविष्ट होता येईल किंवा बाहेर पडता येईल. आपल्या अध्ययनाची गतीही तो निश्चित करू शकेल. सध्याची शिक्षणपद्धती सर्वस्वी पूर्ण वेळेच्या व्यावसायिक शिक्षकांवर आणि एकमेव शिक्षणसंस्था म्हणून शाळांवर अवलंबून आहे. नव्या पद्धतीमध्ये समाजामध्ये उपलब्ध असलेली अध्यापनाची सर्व सामग्री वापरण्यात येईल. त्याचप्रमाणे सर्व सामाजिक यंत्रणांचा शिक्षणकार्यासाठी उपयोग करून घेण्यात येईल. वस्तुतः प्रत्येक व्यक्तिमात्राच्या निरंतर शिक्षणासंबंधीच्या सर्व गरजा भागविण्याइतकी नवी शिक्षणपद्धती अत्यंत लवचिक असली पाहिजे. शिक्षक ( जे प्रत्यक्षात वरिष्ठ विद्यार्थी असतात ) आणि विद्यार्थी ( जे प्रत्यक्षात कनिष्ठ शिक्षक असतात ) यांच्यातील भिन्नताही नव्या शिक्षणपद्धतीने काढून टाकावयास हवी. कारण प्रत्येक व्यक्ती आपापल्या आवडीच्या विषयासंबंधी इतरांकडून शिकत असते आणि त्याच वेळी तिच्यापाशी जे ज्ञान असते ते ज्यांना हवे असते त्यांना देत असते. म्हणून, लोकांचे, लोकांकरिता आणि लोकांनी केलेले शिक्षण असे नव्या शिक्षणपद्धतीचे यथायोग्य वर्णन केले पाहिजे.

३·०४ **आशयाचा संदर्भ आणि परिवर्तन :** आपण जे काही शिकवतो त्यापैकी बऱ्याचशा भागाचा, शिक्षणपद्धतीबाहेर असलेल्या गरीब लोकांच्या दृष्टीनेच नव्हे



तर या पद्धतीत समाविष्ट झालेल्या वरिष्ठ आणि मध्यम वर्गांच्या दृष्टीनेही संदर्भ नसतो, हा सध्याच्या पद्धतीतील एक सर्वांत मोठा दोष आहे. संदर्भ नाहीसा होण्याची काही कारणे खालीप्रमाणे आहेत :

—केवळ माहिती संकलित करण्यावर अवास्तव भर.

—चढत्या श्रेणीचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून अभ्यासक्रम आखण्याची सर्वसामान्य पद्धत. उदाहरणार्थ, विद्यार्थ्याला माध्यमिक शाळेत प्रवेश मिळावा या दृष्टीने प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रम तयार करण्यात आलेला असतो, तर माध्यमिक शाळा विद्यार्थ्याला महाविद्यालयीन प्रवेशासाठी तयार करते. मात्र, याशिवाय अन्य कोणतीही गोष्ट करायला विद्यार्थी पात्र होत नाही. बी. ए. ची पदवी विद्यार्थ्याला एम. ए. चा अभ्यास करायला किंवा चांगल्या पगाराची पण सर्वसामान्यतः कारकुनी स्वरूपाची नोकरी मिळवायला पात्र करते. साहजिकच अशा तऱ्हेचा अभ्यासक्रम ज्यांना पुढच्या पातळीवरील शिक्षण घ्यायचे नाही (आणि अशांचीच संख्या बरीच असते) किंवा ज्यांना नोकरी मिळत नाही त्यांच्या दृष्टीने संदर्भशून्य ठरतो. अभ्यासक्रमाची रचना सर्वसाधारणपणे मध्यमवर्गीयांच्या मूल्यांवरच करण्यात आलेली असल्यामुळे त्याला व्यापक स्वरूप लाभत नाही आणि त्यामुळे बहुसंख्य लोकांच्या जीवनाशी आणि गरजांशी त्याचा मेळ साधला जात नाही. अभ्यासक्रमाची केंद्रीभूत रचना करण्याची पद्धत आणि विविधतेपेक्षा एकरूपतेवर गैरवाजवी भर देण्याचा आग्रह या दोन कारणांमुळे स्थानिक वातावरणाशी किंवा वैयक्तिक आवडीनिवडीशी वा क्षमतेशी शिक्षणाचा अनुबंध जोडणे अशक्य होत नसले तरी निश्चितच अवघड ठरते. शिक्षणपद्धती स्थितिशील असल्यामुळे तिला अभ्यासाचा आशय बदलत्या सामाजिक किंवा राष्ट्रीय गरजांशी जोडता येत नाही.

३·५ शिक्षण संदर्भविरहित झाल्यामुळे ते हळूहळू शिक्षित समूहाची सर्वसामान्य लोकांपासून फारकत करते. समाजाचे मूलभूत प्रश्नही त्यांना कळू शकत नाहीत. म्हणून शिक्षणातील आशयाची ही संदर्भशून्यता ज्या कारणांमुळे निर्माण होते ती कारणे नाहीशी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे अपरिहार्य झालेले आहे. मात्र एवढे करूनच भागणार नाही. सामाजिक परिवर्तन किंवा राष्ट्रीय विकास यांच्याशी शिक्षणाचा आशय जोडून घेण्यासाठी आपल्याला अनेक विधायक उपाय योजावयास हवेत. त्यांपैकी खाली दिलेल्या काही उपायांवर विशेष भर देण्याची गरज आहे :

(१) शिक्षणाच्या सांस्कृतिक विशेषांकडे सध्या सर्वसामान्यपणे दुर्लक्ष केले जाते. त्यांचे रास्त महत्त्व ध्यानात घेतले पाहिजे. भारत 'शोधून काढण्यासाठी' विद्यार्थ्यांना मदत केली पाहिजे. त्यांनी देशभक्त व्हावे, आपल्या देशाच्या

सांस्कृतिक वारशाचा त्यांना अभिमान वाटला पाहिजे आणि त्याचबरोबर नव्या कल्पनांचा आणि मूल्यांचा स्वीकार करण्याइतके त्यांनी प्रगल्भ व्हावे या दृष्टीने प्रयत्न व्हावयास हवा.

(२) महात्मा गांधींनी आपल्या सामाजिक दुखण्याचे अचूक निदान केले होते. बौद्धिक श्रमांचा बढेजाव माजविण्याच्या आणि शारीरिक कष्टांना तुच्छ लेखण्याच्या परंपरागत मध्यमवर्गीय मूल्यांमुळे समाजावर अतिशय घातक परिणाम झाले आहेत, असे ते म्हणत असत. (हीच मूल्ये आपल्या शिक्षणपद्धतीतही शिरली आणि त्यामुळे श्रम नि शिक्षण यांच्यात कायमची फारकत झाली.) आपला नागरिक हा चांगला उत्पादक कामगार आणि त्याचबरोबर सुशिक्षित नि सुसंस्कृत व्यक्ती असली पाहिजे हीच निकोप, समताप्रधान आणि शोषणरहित समाजाची खरीखुरी गरज असते. म्हणून 'चांगल्या शिक्षणाने श्रम आणि शिक्षण यांची सांगड घातली पाहिजे,' असे गांधीजींचे सांगणे होते. तसे केल्याने वरिष्ठ आणि मध्यम वर्गातील व्यक्ती चांगले नागरिक होऊ शकतात. कारण सामाजिक-दृष्ट्या उपयुक्त असलेल्या उत्पादन-कार्यामध्ये सहभागी झाल्यामुळे केवळ व्यक्तीचे कौशल्य वाढते असे नव्हे, तर तिच्यात बुद्धी आणि मूल्ये यांचीही मुरवण होते. असे शिक्षण घेणारी जनता कार्यक्षम होऊन, संघटित प्रयत्नांमार्फत करण्यात येणाऱ्या शोषणाला रोखण्याइतकी सामर्थ्यशाली बनते.

(३) भारतासारख्या गरीब देशाच्या दृष्टीने विकास अत्यंत महत्त्वाचा आणि तातडीचा झालेला आहे. येत्या दहा-पंधरा वर्षांमध्ये आपण प्रत्येक व्यक्तीला विकासासंबंधी जागृत करून त्या कार्यात सर्व शक्तीनिशी भाग घ्यायला प्रवृत्त करावयास हवे.

वर निर्देशित केलेल्या कारणांमुळे हे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करायला सध्याची शिक्षणपद्धती मुळीच पुरी पडू शकणार नाही. कारण एकूण लोकसंख्येपैकी अवघे सोळा टक्के नागरिकच तिने सामावून घेतले आहेत. राष्ट्रीय उत्पन्नापैकी जवळ-जवळ चार टक्के रक्कम शिक्षणावर खर्च होत असली तरी हे शिक्षण नागरिकांना विकासविषयक कार्यक्रमात सहभागी व्हायला उद्युक्त करू शकलेले नाही. किंबहुना त्याने नेमके विरुद्धच कार्य केलेले आहे. शिक्षण आणि विकास या दोन स्वतंत्र आणि समांतर (आणि काहीशा परस्परविरोधी) पद्धती चालू ठेवणे आपल्याला परवडण्यासारखे नाही. एक पद्धत दुसऱ्याला साहाय्यभूत ठरेल अशा रीतीने त्या परस्परपूरक झाल्या तरच ते अधिक परिणामकारक आणि काटकसरीचे ठरणार आहे. शारीरिक श्रमांप्रमाणे विकास हेही शिक्षणाचे माध्यम झाले तरच हे घडून येणार आहे. त्यासाठी शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर विकासाच्या यथायोग्य कार्यक्रमांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना सहभागी करून घेतले पाहिजे.



(४) शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर विज्ञानाच्या आणि आवश्यक अशा तंत्र-विज्ञानाच्या योग्य अध्यापनाची व्यवस्था करण्यावर भर दिला जाणे आवश्यक आहे. अंधश्रद्धा, दैववाद आणि अकारण भय यांच्या पकडीतून आपल्या परंपरा-पूजक समाजाला बाहेर काढण्याचे आणि आधुनिक समाजाला आवश्यक असलेली बुद्धिनिष्ठा रुजविण्याचे कार्य विज्ञानच करू शकेल. तसेच उचित तंत्रज्ञानामुळे आपण लोकांचे दारिद्र्य आणि अनारोग्य दूर करून त्यांचे जीवनमान सुधारू शकू. म्हणून विज्ञान आणि तंत्रविज्ञान यांच्या सामर्थ्याची प्रत्येक नागरिकाला जाणीव व्हायला हवी आणि त्यांचा वापर करण्याचे पुरेसे ज्ञान त्याने संपादन केले पाहिजे.

(५) आपल्याला लोकसत्ताक, समाजवादी आणि सर्वधर्मसमभावी समाज निर्माण करावयाचा असल्यामुळे त्या दृष्टीने वातावरण निर्माण करण्यावर भर द्यावयास हवा. त्यासाठी, जमातवाद, जातीयता, स्त्रीपुरुषांमधील विषमता आणि सरंजामशाही नि भांडवलशाही पद्धतीच्या जीवनपद्धती यांसारखी नवसमाज-निर्मितीमध्ये अडसर ठरणारी पारंपरिक मूल्ये आणि प्रथा यांच्या विरुद्ध लढा दिला पाहिजे. या नकारात्मक कार्यक्रमाबरोबर सहिष्णुता, आत्मसंयम, इतरांबद्दल कळवळा, मूलभूत मानवी मूल्यांवर निष्ठा, आवश्यक पडेल तेव्हा या मूल्यांच्या संरक्षणासाठी लढा देण्याची आणि त्याग करण्याची तयारी, समान उद्दिष्ट असलेल्या कार्यक्रमांमध्ये इतर व्यक्तींसमवेत आणि गटांसमवेत कार्य करण्याची क्षमता, विचारविनिमयाच्या, देवाणघेवाणीच्या आणि अन्य शांततामय मार्गांनी संघर्ष सोडविण्याची प्रवृत्ती आणि क्षमता हे विधायक कार्यही अंगिकारिले पाहिजे.

३·०६ दर्जा : शिक्षण हे दुधारी शस्त्र आहे. शिक्षण जर चांगल्या दर्जाचे असेल तर ते वैयक्तिक विकासाला, सामाजिक परिवर्तनाला आणि प्रगतीला साहाय्यभूत होते. पण जर शिक्षणाचा व्यवस्थित दर्जा सांभाळण्यात आला नाही तर वैयक्तिक विनाश आणि सामाजिक विघटना यांनाही ते कारणीभूत होऊ शकते. म्हणून, शिक्षणाची गुणवत्ता कायम राखणे हे सर्वोच्च महत्त्वाचे कार्य होय. आशयाचा संदर्भ महत्त्वाचा असला तरी तो या प्रश्नाचा एक भाग आहे. यंत्रणा, शिक्षक आणि उपकरणे यांची पुरेशी उपलब्धी हा या प्रश्नाचा दुसरा भाग आहे. शिक्षक आणि विद्यार्थी यांनी सातत्यपूर्ण आणि समर्पित भावनेने कार्य करावे यासाठी योग्य वातावरणनिर्मिती करणे हा तिसरा भाग होय. कारण शिक्षण ही मूलतः सतत चालणारी प्रक्रिया आहे. मात्र येथे हे ध्यानात ठेवले पाहिजे की विद्यार्थ्यांनी किती माहिती संग्रहित केली किंवा त्यांनी भाषांवर आणि विशेषतः इंग्रजीवर कितपत प्रभुत्व संपादन केले यावरच शिक्षणाची गुणवत्ता अजमाविण्याची सध्याची जी पद्धत आहे ती अनुसरता कामा नये. विद्यार्थ्यांचा

एकंदर व्यक्तित्वविकास आणि विद्यार्थी, शिक्षण नि शिक्षणसंस्था यांची सामाजिक जाणीव आणि सहभाग यांवरच स्थूलमानाने वैयक्तिक आणि सामाजिक दृष्टीनी शिक्षणाची गुणवत्ता मोजली पाहिजे.

३·०७सध्याच्या शिक्षणपद्धतीनुसार फारच थोड्या संस्थांमध्ये शिक्षणाचा चांगला दर्जा सांभाळण्यात येतो. वर सांगितल्याप्रमाणे या शाळांचा लाभ श्रीमंत, सुखवस्तु वर्गातील लोकांनाच होतो. एकूण समाजामध्ये अशा लोकांचे प्रमाण अत्यल्प आहे. याउलट ज्या शाळांमध्ये फार मोठ्या समाजातील मुले शिक्षण घेत असतात अशा शिक्षणसंस्थांपैकी बहुसंख्या संस्थांमधील शैक्षणिक दर्जा निकृष्ट आणि खेदजनक असतो. नव्या शिक्षणपद्धतीमध्ये अशा द्विदल रचनेला स्थान राहणार नाही. मात्र याचा अर्थ असा नव्हे की कसलाही विचार न करता सर्व शिक्षण-संस्थांना एकाच पातळीवर आणण्यात येईल. विशेषतः माध्यमिक आणि उच्च शिक्षणामध्ये, प्रत्येक विभागात काही चांगल्या गुणवत्तेच्या आणि गतिशील असलेल्या शिक्षणसंस्था निश्चितच राहातील. परंतु सध्याच्या परिस्थितीच्या तुलनेने नव्या शिक्षणपद्धतीमध्ये दोन प्रमुख बदल घडून येतील. एक हा की सध्या ज्याप्रमाणे चांगल्या दर्जाच्या शिक्षणसंस्थांमध्ये केवळ वरिष्ठ वर्गातील मुलांनाच प्रवेश मिळतो तशी परिस्थिती राहाणार नाही. त्याऐवजी वंचित सामाजिक वर्गामधील हुषार मुलांना या शिक्षणसंस्थांचा लाभ घेता यावा म्हणून बुद्धिमत्तेचा विकास, शिष्यवृत्त्या आणि स्थलनिश्चिती यांसाठी सुनियोजित कार्यक्रम आखण्यात येईल. दुसरा हा की सध्या ज्या बहुसंख्य शाळांमधील शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे तो सुधारला जाईल आणि विशिष्ट निर्धारित पातळीच्या खाली कोणतीही शिक्षणसंस्था राहणार नाही अशी काळजी घेतली जाईल.

३·०८ **लवचिकता, विविधता आणि गतिशीलता :** केंद्रीकरण आणि एक-रूपता यांवर सध्याच्या शिक्षणपद्धतीने अवास्तव भर दिलेला असून त्याचा परि-णाम ही शिक्षणपद्धती साचेबंद आणि बंदिस्त होण्यात झालेला आहे. सर्वजण प्रगती करतील किंवा कोणीच प्रगती करणार नाही या तऱ्हेच्या धोरणामुळे सगळेच जण गतिहीन होऊन जातात. भारतीय समाजासारख्या विशाल आणि वैविध्यपूर्ण समाजामध्ये एकस्वरूपीय आणि साचेबंद शिक्षणपद्धती निर्माण करण्याचा प्रयत्न कधीच यशस्वी होऊ शकणार नाही. कारण अशा तऱ्हेचा कोणताही प्रयत्न चांगल्या शाळांना आत्मसात करता येणार नाही. कारण त्यांना अशा प्रयत्नांमध्ये आपल्या सामर्थ्याचा पूर्ण वापर करता येणे अशक्य ठरेल. तसेच हा प्रयत्न कमी दर्जाच्या शाळांच्या कक्षेबाहेरचा राहणार असल्यामुळे त्यांची अकार्यक्षमता अधिकच वाढेल. विविधतेत एकता हे भारताचे सूत्र आहे; म्हणून मूलभूत उद्दिष्टां-संबंधी राष्ट्रीय पातळीवर एकता निर्माण करून नंतर राज्यांना, शाळांना आणि



शिक्षकांना विविधता, प्रयोगशीलता आणि नवनिर्मिती यांसाठी पुरेसा वाव देणारी पूर्णतया विकेंद्रित, लवचिक आणि गतिशील शिक्षणपद्धती आपण निर्माण केली पाहिजे.

प्रकरण चौथे

# कार्यक्रम

४·०१ आपल्या सर्व लोकांना चांगले शिक्षण देता यावे आणि लोकांच्या गरजा आणि आकांक्षा भागविणारी राष्ट्रीय शिक्षणपद्धती निर्माण करता यावी यासाठी येत्या दहा–एक वर्षामध्ये जे कार्यक्रम सर्वोच्च प्राधान्य देऊन विकसित करावयाचे आहेत, त्यासंबंधी या प्रकरणात आपण ऊहापोह करू या.

## अ. प्रौढशिक्षण

४·०२ **महत्त्व आणि अग्रक्रम :** आपण प्रौढशिक्षणापासून चर्चेला प्रारंभ करू. कारण आमच्या दृष्टीने हा सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम आहे. (आपल्या राज्यघटनेने एकवीस वर्षावरील वयाचा व्यक्तीला प्रौढ मानले आहे.) आम्ही असे मानतो की निरक्षरता आणि 'योग्य' प्रौढशिक्षणाचा अभाव यामुळे केवळ संबंधित व्यक्तींच्या विकासातच नव्हे तर देशाच्या एकूण सामाजिक-आर्थिक विकासामध्येही मोठा अडथळा निर्माण होतो. प्रौढशिक्षणावर आणि विशेषतः निरक्षर गरिबांच्या शिक्षणावर जो पैसा खर्च करण्यात येईल तो द्रुतगतीने सामाजिक–आर्थिक प्रगती करण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरेल आणि खर्चाच्या मानाने किती तरी अधिक प्रमाणामध्ये लाभदायकही ठरेल असेही आमचे मत आहे. आम्ही पूर्ण विचारांती याही निष्कर्षाप्रत आलेलो आहोत की आपण स्वतंत्र होताच अग्रक्रम देऊन प्रौढशिक्षणाचा प्रचंड कार्यक्रम हाती घ्यावयास हवा होता आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या काही वर्षांमध्येच निरक्षरतेचे निर्मूलन करायला हवे होते. परंतु दुर्दैवाने प्रौढशिक्षणाला हे प्राधान्य देण्यात आले नाही. राज्यघटनेने सर्व प्रौढांना मताधिकार दिला; परंतु प्रौढशिक्षणाची मात्र काहीच तरतूद केली नाही. तशी तरतूद करण्यात आली असती तर प्रौढ मताधिकार अधिक अर्थपूर्ण झाला असता. उलटपक्षी, मुलांना अल्पावधीत (१९५०–६०) सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण द्यावे आणि त्यातून कालांतराने प्रौढशिक्षणाचा प्रश्न सोडविला जाईल असा राज्यघटनेने पारंपरिक दृष्टिकोन स्वीकारला. त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या



काळात प्रौढशिक्षणाकडे दुर्लक्ष झाले आणि त्याचबरोबर प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम अंमलात आणायला विलंब झाला. त्यामुळे निरक्षरतेचा प्रश्न सुटू शकला नाही. १९४७ मध्ये साक्षरतेचे प्रमाण १४ टक्के होते ते १९७१ मध्ये फक्त ३० टक्क्यांपर्यंतच वाढू शकले. त्यापेक्षाही अधिक अनिष्ट गोष्ट घडली ती ही की विकासाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी व्हायला लोकांना कार्यक्षम आणि संघटित करण्यात आले नाही. त्यामुळे राष्ट्रीय विकासाला अपेक्षित चालना मिळू शकली नाही. ही चुकीची धोरणे सोडून देण्याबाबत आता तरी उशीर होता कामा नये. नवी समाजरचना निर्माण करण्यासाठी लोकांना शिक्षित आणि संघटित करण्याचा कार्यक्रम प्रौढशिक्षणावाचून कार्यवाहीत आणताच येणार नाही हे आपण ओळखले पाहिजे.

४·०३ **उद्दिष्टे आणि आशय :** नवी समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या कार्यामध्ये गरीब आणि पददलित लोकांनी स्वतः पुढाकार घेतला पाहिजे असे आम्ही मानतो. त्यांना जर त्यांच्यातील अंगभूत सामर्थ्याची आणि भोवतालच्या शोषणात्मक सामाजिक वास्तवाची जाणीव करून दिली तर ते लोक हे कार्य परिणामकारक रीतीने करू शकतील. त्याचप्रमाणे या लोकांना सामाजिक दृष्ट्या उपयुक्त अशा उत्पादक कार्यामध्ये सहभागी करून घेतले पाहिजे; (याचा अर्थ असा की त्यांना उपयुक्त रोजगाराची हमी मिळाली पाहिजे.) नि त्यांच्यात आत्मनिर्भरतेची जाणीव निर्माण व्हावी आणि जीवनमान सुधारण्याची त्यांच्यात क्षमता यावी यासाठी आवश्यक असणाऱ्या यंत्रणा उभारण्यात त्यांना साहाय्य केले पाहिजे, आणि सर्व प्रकारच्या शोषणाचा प्रतिकार करण्याइतके ते निर्भय आणि संघटित झाले पाहिजेत. म्हणून, गरिबांना आपले अधिकार वैयक्तिक रीतीने आणि सामुहिक रीतीने बजावता यावेत आणि भीती, भूक आणि असहाय्यता यांपासून आपण मुक्त झालेलो आहेत याबद्दल त्यांची खात्री पटावी यासाठी त्यांच्यात 'मी' आणि 'आमचे' या जाणिवा निर्माण करणे हे प्रौढशिक्षणाचे उद्दिष्ट ठरते. गरिबांना त्यांच्या सध्याच्या तुटपंज्या दर्जाइतपत शिक्षित करण्यासाठी किंवा पलायनवादी प्रवृत्ती जोपासण्यासाठी प्रौढशिक्षणाचा साधन म्हणून वापर करण्याचा सतत अस्तित्वात असलेला धोका कटाक्षाने टाळला पाहिजे. गरिबांची राजकीय संघटना उभारणे असा याचा अर्थ केला जाता कामा नये. ते राजकीय पक्षांचे काम आहे. परंतु त्याचबरोबर हेही ध्यानात ठेवले पाहिजे की गरिबांना अस्मिता प्राप्त व्हावी हा त्यांचा शिक्षणातील महत्त्वाचा राजकीय आशय झाला पाहिजे.

४·०४ बहुसंख्य सामान्य लोक जवळजवळ निरक्षर असल्यामुळे त्यांना साक्षर करणे हा प्रौढशिक्षणाचा एक महत्त्वाचा आशय ठरतो. कारण हे लोक साक्षर

झाल्याशिवाय त्यांना जगातील वाढते ज्ञान स्वतः संपादन करता येणार नाही. परंतु साक्षरतेला अवास्तव महत्त्व देण्याचे कारण नाही. आपल्या मनाची कवाडे बंद करून घेणारा साक्षर माणूस आपल्या साक्षरतेचा उपयोग करून घेत नसतो. आपल्या ज्ञानात सतत भर न घालणारा माणूस निरक्षरापेक्षा वेगळा ठरत नाही. चांगले शिक्षण शाळेत होत नसते तर ते प्रत्यक्ष कार्यातून आणि जीवनप्रसंगातून लाभत असते, हेही लक्षात घेतले पाहिजे. कारण अध्ययन, दैनंदिन कार्य आणि जीवन अभिन्न असून यापैकी प्रत्येक गोष्ट जेव्हा इतर दोन गोष्टींशी पूर्णपणे निगडित होते तेव्हाच ती अर्थपूर्ण ठरते. प्रौढांच्या बाबतीत तर हे अधिकच खरे असते. त्यामुळे शिकणाऱ्यांच्या कार्यपद्धतीशी आणि जीवनपद्धतीशी किंवा भोवतालच्या परिस्थितीच्या आव्हानांशी आणि देशाच्या विकासविषयक गरजांशी साक्षरतेचा कार्यक्रम निगडित केला नाही तर तो प्रौढांना शिकायला उद्युक्त करणार नाही. तसेच या कार्यक्रमापासून म्हणावा असा वैयक्तिक वा सामाजिक लाभही होणार नाही. म्हणून निरक्षर लोकांना साक्षरता प्राप्त करून दिली पाहिजे या गोष्टीवर भर देताना प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये भोवतालची परिस्थिती, शिकणाऱ्यांच्या तातडीच्या गरजा, सामाजिक आणि आर्थिक दर्जा सुधारण्याच्या प्रयत्नांमध्ये त्यांना येणारी आव्हाने आणि त्यांनी निष्ठापूर्वक नि उत्साहाने सहभागी व्हावे अशी अपेक्षा असलेला राष्ट्रीय विकास यांच्याशी सुसंवादी ठरेल असा व्यापक आशय असला पाहिजे. विशेषतः अशा तऱ्हेच्या कार्यक्रमामध्ये वेगवेगळ्या व्यक्तींच्या आणि गटांच्या गरजांशी जुळणाऱ्या खालील घटकांचे यथायोग्य मिश्रण व्हावयास हवे :

(१) अर्थप्राप्तीची क्षमता वाढविण्यासाठी तांत्रिक कौशल्यांचा विकास;

(२) सर्वसाधारण शिक्षण (आरोग्यशिक्षण आणि कुटुंबनियोजन यांसह);

(३) नागरिकत्वाचे शिक्षण (अत्यावश्यक राजकीय शिक्षणासह);

(४) विकासविषयक अभ्यास किंवा लोकांच्या स्वतःच्या समस्या ज्यात गुंतलेल्या आहेत अशा विकासविषयक प्रश्नांचे, या समस्यांची सोडवणूक करण्यातील लोकांच्या भूमिकेचे आणि सामाजिक नि विकासविषयक कार्यक्रमातील त्यांच्या प्रत्यक्ष सहभागाचे ज्ञान;

(५) शारीरिक शिक्षण, खेळ आणि क्रीडा, मनोरंजन आणि सहभागावर आधारलेले सांस्कृतिक कार्य.

कालावधी, वेळ, स्थळ किंवा अध्ययनाची व्यवस्था याबाबतीत हा कार्यक्रम कमालीचा लवचिक आणि या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींच्या वा गटांच्या गरजा आणि क्षमता यांच्याइतका वैविध्यपूर्ण असला पाहिजे. त्यामुळे साहजिकच विशिष्ट व्यक्तींसाठी वा गटांसाठी आखावयाच्या अभ्यासक्रमातील



नेमका आशय ठरविण्याचे कार्य कधीच केंद्रिभूत करता येणार नाही. ते अभ्यासक्रम कमालीचे स्थानिक स्वरूपाचे आणि चर्चेमधून साकार झालेले असावेत. याचा अर्थ असा की, स्थानिक कार्यकर्त्याने तो ज्या लोकांत कार्य करीत आहे त्यांच्याशी विचारविनिमय करून, अत्यंत विकेंद्रित पद्धतीने हे अभ्यासक्रम ठरवावेत. मध्यवर्ती यंत्रणेने फक्त पुढील कार्ये करावीत : (१) चांगल्या आणि लोकसेवेच्या भावनेने भारलेल्या कार्यकर्त्यांचा संच निर्माण करणे, (२) या कार्यकर्त्यांना सामाजिक उद्दिष्टे, अभ्यासक्रम–रचना, आणि अध्यापन नि मूल्यमापन यांच्या योग्य पद्धती या संबंधी चांगले शिक्षण देणे, आणि (३) चांगल्या रीतीने निर्माण केलेले आणि तपासलेले, विविध प्रकारचे अध्यापन आणि अध्ययन साहित्य तयार करणे. यातून प्रत्येक कार्यकर्ता आपल्या गरजा चांगल्या प्रकारे भागवू शकणाऱ्या साहित्याची निवड करू शकेल. या प्रमुख भूमिकांचे निर्णायक महत्त्व सहज ध्यानात येण्यासारखे आहे.

४·०५ **उद्युक्तीकरण :** प्रौढांना बंदिस्त श्रोतृवर्ग समजून चालणार नाही. आपण शिकले पाहिजे अशी जाणीव त्यांच्यात जागृत करायला हवी. आपल्यासाठी आयोजित केलेले कार्यक्रम खरोखरच आपल्याला उपयोगी पडणारे आहेत अशी जर प्रौढांची खात्री पटली तरच ते अध्ययनाला उद्युक्त होतील. प्रौढांमध्ये जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करणे किंवा दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेणे हा त्यांना उद्युक्त करण्याचा सर्वोत चांगला मार्ग होय. त्यांना जीवनामध्ये अल्पस्वल्प का होईना सुधारणा घडवून आणण्यासाठी स्वतःच प्रयत्न करायला प्रवृत्त केले पाहिजे. लोकांशी सुसंवाद साधणारे चांगले कार्यकर्ते, शिकणाऱ्यांच्या गरजा आणि आवडीनिवडी यांना स्थान देणारे सुनियोजित कार्यक्रम, अध्ययन आनंददायी करणाऱ्या अध्यापनाच्या चांगल्या पद्धती, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात सहकार्याची वृत्ती यांची प्रौढांना उद्युक्त करण्यासाठी खूपच मदत होऊ शकेल. प्रौढशिक्षण जर विकास कार्यक्रमाचा किंवा सामाजिक आंदोलनाचा अविभाज्य घटक केला तर तेही लाभदायक ठरेल.

४·०६ **संघटना :** प्रौढशिक्षणाचे अत्यंत अवघड आणि गुंतागुंतीचे प्रश्न संघटनेशी निगडित आहेत. प्रौढांना अध्ययनाला प्रवृत्त करणे, कार्यकर्त्यांची निवड आणि प्रशिक्षण, अध्यापन आणि अध्ययन साहित्याची निर्मिती आणि या सर्वांपेक्षाही या प्रचंड कार्यक्रमाचा प्रत्यक्ष विकास हे ते प्रश्न आहेत. संघटनेचा प्रश्न केवळ पैशाच्या बळावर सोडविता येत नसल्यामुळे तो अधिक महत्त्वाचा ठरतो. एखाद्या योजनेमध्ये अन्य आवश्यक घटकांचा समावेश न करता किंवा पुरेशी तयारी न करता पैसा ओतण्यात आला तर भ्रष्टाचार आणि खोटी आकडेवारी यांच्यातच त्या योजनेची परिणती होते असा यापूर्वी बऱ्याच वेळा अनुभव

आलेला आहे. त्यामुळे पैशाव्यतिरिक्तचे घटकही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. आपल्याजवळ बारेमाप खर्च करण्याइतका पैसा नसल्यामुळे पैशाची बचत करण्याच्या दृष्टीने तर त्यांचा उपयोग आहेच, शिवाय या घटकांवाचून प्रौढशिक्षणाचे आंदोलन चालूच शकणार नाही. आणखी एका गोष्टीकडेही पुरेसे लक्ष देण्यात आले पाहिजे. राष्ट्रीय सेवाकार्यामध्ये सहभागी व्हायला युवकांना प्रवृत्त करण्यासाठी आणि त्यांच्या कार्यशक्तीला नि आदर्शवादाला उपयुक्त दिशा देऊन त्यांना विकासाभिमुख करण्यासाठीही प्रौढशिक्षण आंदोलन उपयुक्त ठरू शकेल. या शक्यतेच्या संपूर्ण क्षमतेचा शोध न घेणे किंवा वापर न करणे अत्यंत अनिष्ट ठरणार आहे.

४·०७ मागील अनुभव ध्यानात घेता, याबाबतीत तीन पर्यायी मार्ग उपलब्ध आहेत. जर संख्येऐवजी गुणवत्ता हेच प्रमुख उद्दिष्ट असेल तर हे आंदोलन निवडक पद्धतीने संघटित करता येईल. ज्या ज्या ठिकाणी समर्पित वृत्तीचे आणि कार्यक्षम कार्यकर्ते किंवा शिकण्याची इच्छा असलेले प्रौढ असतील त्या सर्व ठिकाणी संपूर्ण प्रोत्साहन देणे आणि आवश्यक सुविधा नि अर्थसाहाय्य उपलब्ध करणे, हा एक मार्ग होय. दुसरा पर्याय असा की जेथे परिस्थिती अनुकूल आहे अशा छोट्या निवडक क्षेत्रांमध्ये जनआंदोलन म्हणून प्रौढशिक्षणाची चळवळ संघटित केली तर गुणवत्ता कायम राखून, काही प्रमाणामध्ये संख्या वाढविणेही शक्य होईल. हे दोन्ही पर्याय महत्त्वाचे असले आणि चळवळीच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये त्यांचा व्यापक प्रमाणावर उपयोग करण्यात येणार असला तरी तिसरा पर्याय स्वीकारणे हेच आपले अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. चांगल्या दर्जाच्या प्रौढशिक्षणाचे राष्ट्रव्यापी आंदोलन उभारण्याचा कार्यक्रम विकसित करणे हेच ते उद्दिष्ट होय. हे अतिशय अवघड आव्हान असल्यामुळे जनआंदोलन म्हणून आणि या कार्यक्रमात समाविष्ट होण्याची क्षमता असलेल्या सर्व यंत्रणांचा आणि व्यक्तींचा प्रचंड सहभाग म्हणून संघटना उभारताना अत्यंत उच्च प्रतीचे कौशल्य आवश्यक ठरेल.

४·०८ साक्षरता आणि प्रौढशिक्षण यांच्या प्रसारासाठी सध्याच्या औपचारिक शिक्षणपद्धतीमधील शिक्षकांचा आणि विद्यार्थ्यांचा आपण किती प्रमाणामध्ये उपयोग करून घेऊ शकू ? या विचाराची कक्षा खरोखरच अत्यंत विस्तृत आहे. कारण या कार्यक्रमासाठी कार्यकर्ते म्हणून उपयोगी पडू शकतील असे एक कोटी साठ लाख विद्यार्थी (माध्यमिक शाळेपासून वरचे) आणि जवळजवळ चाळीस लाख शिक्षक नि प्रशासक उपलब्ध आहेत. याबाबतीत एक विचारप्रवाह असा आहे की, औपचारिक शिक्षणपद्धतीमधील गतिशून्यता, अकार्यक्षमता, तसेच शिक्षक आणि विद्यार्थी यांची शालेय वर्गावर अवलंबून राहण्याची वृत्ती यांमुळे



त्यांना ही योजना योग्य दृष्टिकोनातून राबविता येणार नाही. औपचारिक शिक्षणपद्धतीची पूर्णपणे उपेक्षा करणे चुकीचे ठरेल, असा दुसरा एक विचारप्रवाह आहे. त्या मताच्या लोकांना असे वाटते की या कार्यक्रमाच्या विकासामुळे खुद्द औपचारिक शिक्षणपद्धतीतच परिवर्तन व्हायची प्रक्रिया सुरू होईल. त्याचप्रमाणे, औपचारिक शिक्षणपद्धतीच्या अवाढव्य अन्तर्रचनेचा पूर्ण लाभ घेतल्याशिवाय प्रौढशिक्षणाचा प्रचंड कार्यक्रम विकसित करताच येणार नाही, असेही सांगितले जाते. म्हणून ‘ हे किंवा ते ’ असा हा प्रश्न आहे असे आम्ही मानत नाही. औपचारिक शिक्षणपद्धतीमधील विद्यार्थी, शिक्षक आणि संस्था यांची निवड करून त्यांना वाढत्या प्रमाणामध्ये सहभागी करून घेण्यावर आपण भर दिला पाहिजे. प्रौढशिक्षणाच्या कार्यक्रमामध्ये स्वयंस्फूर्तीने सहभागी होण्याची इच्छा ज्या शाळा वा शिक्षक वा विद्यार्थी व्यक्त करतील त्यांना या कार्यात सहभागी करून घ्यावयास हवे. शिक्षण संस्थांनी या कार्यक्रमामध्ये सहभागी व्हावे याकरिता त्यांना पुरेशी साधनेही उपलब्ध करून दिली पाहिजेत. उदाहरणार्थ हा कार्यक्रम अंगिकारणाऱ्या शिक्षण-संस्थांना इमारती, ग्रंथालये, प्रयोगशाळा इत्यादींसाठी विकासअनुदान मिळेल अशी तरतूद करावी. तसेच या कार्यक्रमामध्ये जे विद्यार्थी सहभागी होतील त्यांना स्वतःसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चापैकी काही भाग दिला जावा. इतकेच नव्हे तर सर्व शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना ( राष्ट्रीय सेवा योजनेचा एक भाग म्हणून) या कार्यक्रमात सहभागी होणे सक्तीचे करता येईल काय या शक्यतेचाही विचार व्हावा. त्या दृष्टीने या कार्यक्रमात समाविष्ट होऊ इच्छिणाऱ्या संस्थांपासून निश्चितच प्रारंभ करता येणे शक्य आहे. त्याचबरोबर आपण हेही ध्यानात घेतले पाहिजे की प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणामध्ये औपचारिक शिक्षणपद्धतीबाहेर सुरू करणेच अनेक दृष्टींनी हितकर ठरणार आहे. त्यासाठी समाजामध्ये वैयक्तिक आणि संस्थात्मक स्वरूपाची जी विशाल अध्यापन–सामग्री आहे आणि जिचा अजून मुळीच किंवा पुरेसा वापर करून घेण्यात आलेला नाही तिचा या कार्यक्रमामध्ये उपयोग करून घेतला पाहिजे. उदाहरणार्थ, ग्रामपंचायती, सहकारी संस्था, युवकमंडळे, महिलामंडळे यांसारख्या यंत्रणा आणि संघटना या कार्यक्रमामध्ये उपयुक्त भूमिका बजावू शकतील. त्याचप्रमाणे अशा असंख्य सुशिक्षित व्यक्ती आहेत की ज्या व्यावसायिक शिक्षक नाहीत, परंतु ज्यांच्यापाशी उत्साह आणि सामाजिक जाणीव आहे, अशांची निवड करून, त्यांना साक्षरतेचे आणि प्रौढशिक्षणाचे अन्य कार्यक्रम संघटित करण्यासाठी प्रशिक्षित करता येईल.

४·०९ सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर असे दिसून येते की आपण जर विविध पर्याय आणि तंत्रे यांचा योग्य समवाय केला तर अपेक्षित परिणाम साध्य करता येईल. कोणत्याही परिस्थितीमध्ये जनआंदोलनाची पार्श्वभूमी टाळता

येणार नाही. परंतु त्या पार्श्वभूमीवर आपण निवडक पद्धतीचा पर्याय आणि जनआंदोलनाचा पर्याय यांचा समन्वय केला पाहिजे. औपचारिक शिक्षणपद्धतीमधील शिक्षक आणि विद्यार्थी, त्याचप्रमाणे त्या शिक्षणपद्धतीबाहेरील उत्साही आणि प्रेरित व्यक्ती आणि विशेषतः गरीब समाजातील व्यक्ती यांच्यामधून आपण फार मोठ्या प्रमाणावर कार्यकर्त्यांची निवड केली पाहिजे. प्रमुख कार्यकर्ते म्हणून शिक्षणपद्धतीबाहेरील उत्साही आणि प्रेरित व्यक्ती यांचाच अधिक उपयोग होण्याची शक्यता आहे.

४·१० या कार्यक्रमाच्या विकासामध्ये स्वयंसेवी संघटनांना महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची आहे. समाजातील अनौपचारिक साधनसामग्रीला या कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेताना, सरकारला बराच संघटनात्मक प्रयत्न करावा लागणार आहे. या साधनसामग्रीला मदत करण्यासाठी खास योजना आखावयास हव्यात. तसेच तिची सारी क्षमता या कार्यक्रमासाठी उपयोगात आणली जावी म्हणून पुरेसा संघटनात्मक प्रयत्न व्हावयास हवा. ज्या संस्थांचा कार्यक्षमतेबाबत आणि सामाजिक जाणीवेसंबंधी लौकिक आहे त्यांना नवनिर्मिती आणि प्रयोग याबाबतीत जास्तीत जास्त स्वायत्तता दिली पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्या कामगारांना साक्षर करण्याचे उद्योगपतींवर कायदेशीर बंधन घातले पाहिजे. जेथे आवश्यक असेल तेथे त्यांना काही बाबतीत (उदाहरणार्थ, कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण) साहाय्य करावयास हवे. सरकारी प्रकल्पांवर किंवा विकासविषयक कामांवर नेमण्यात आलेल्या निरक्षर कामगारांसाठीही साक्षरतेचे आणि प्रौढशिक्षणाचे कार्यक्रम संघटित करण्यात आले पाहिजेत.

## ब. शालाबाह्य युवक (वयोगट १५–२१)

४·११ पंधरा ते एकवीस या वयोगटातील शालाबाह्य युवकांचे शिक्षण हा आमच्या मते जन-शिक्षण योजनेतील दुसरा महत्त्वाचा कार्यक्रम असल्यामुळे, प्रौढांच्या शिक्षणासंबंधी वर जे काही म्हटले आहे ते शालाबाह्य युवकांच्या शिक्षणाबाबतही लागू पडते. या वयोगटातील युवकांपैकी ८५ टक्के युवक शालाबाह्य अवस्थेत असल्यामुळे, या गटाला शिक्षित करण्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून त्याच्या शिक्षणावर केल्या जाणाऱ्या खर्चाचे भरपूर आणि त्वरित परिणाम दिसून येतील. कारण या गटामध्ये शिकण्याची उर्मी प्रभावी असते आणि त्याच्यापाशी शिक्षित होण्याची क्षमताही अधिक असते. गटअध्ययन अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे या वयोगटातील विद्यार्थ्यांना आणि इतर व्यक्तींना प्रशिक्षित करून, त्यांचा या कार्यक्रमाच्या विकासासाठी चांगला उपयोग करून घेता येईल. या वयोगटातील युवकांना रोजगाराची गरज भासत असल्यामुळे त्यांच्यासाठी तांत्रिक



शिक्षण उपयुक्त ठरेल. या युवकांचे औपचारिक शिक्षण अनेक कारणांमुळे खंडित झालेले असते. त्यांच्यापैकी ज्यांना हे अपुरे राहिलेले शिक्षण पुरे करून आपली व्यावसायिक क्षमता वाढविण्याची इच्छा असेल त्यांच्यासाठी आपल्याला औपचारिक शिक्षणाचीही सोय करावी लागेल.

४·१२ प्रौढशिक्षणाचे कार्यक्रम, मग ते १५ ते २१ या वयोगटातील शालाबाह्य युवकांसाठी आयोजित करावयाचे असोत किंवा २१ वर्षावरील प्रौढांसाठी संघटित करावयाचे असोत, या सर्व कार्यक्रमांसाठी अत्यंत चांगल्या प्रतीच्या आणि कल्पकतेचा वापर करून तयार केलेल्या अध्यापन आणि अध्ययन साहित्याची बऱ्याच मोठ्या प्रमाणावर निर्मिती करावी लागेल. कारण हे साहित्य केवळ त्यांना साक्षर करण्यासाठीच वापरायचे नसून या शिक्षितांच्या साक्षरताप्राप्तीनंतरच्या आणि अन्य पूरक शिक्षणासाठीही आवश्यक ठरणार आहे. त्यासाठी ग्रंथालये आणि वाचनालये यांचे मोठे जाळे उभारावे लागेल. भित्तीपत्रे आणि भित्तीपत्रिका यांचाही बऱ्याच प्रमाणावर वापर करणे इष्ट ठरेल. या अध्यापन अध्ययन साहित्याची निर्मिती, संशोधन, मूल्यमापन आणि कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण या कार्यात विद्यापीठांना महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागेल. आपण डोळ्यांसमोर ठेवलेल्या प्रौढशिक्षणाच्या प्रचंड कार्यक्रमांना गती देण्यासाठी वृत्तपत्रे, आकाशवाणी यांसारख्या जनसंपर्क माध्यमांना महत्त्वाचे कार्य पार पाडता येण्यासारखे असल्यामुळे आपण या माध्यमांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. ग्रामीण भागातील रहिवाशांसाठी आणि स्त्रियांसाठी हे कार्यक्रम संघटित करण्याकरिता विशेष प्रयत्न करावे लागतील. त्यामुळे कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्याचा प्रचंड कार्यक्रम आयोजित करणे आणि पर्यवेक्षण, मूल्यमापन नि सतत नियंत्रण करण्यासाठी सुनियोजित पद्धती विकसित करणे ओघानेच येते. हा प्रशिक्षण कार्यक्रम ताबडतोब सुरू केला पाहिजे. आपल्या देशातील शिक्षणाला एवढे मोठे अवघड कार्य यापूर्वी कधीच करावे लागले नव्हते.

## क. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण

४·१३ आता आपण लोकांच्या शिक्षणातील तिसऱ्या कार्यक्रमाच्या चर्चेकडे वळू. हा तिसरा कार्यक्रम म्हणजे सहा ते चौदा वयोगटातील मुलांच्या सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद. या कार्यक्रमाशी आपण शालापूर्व शिक्षणाचा प्रश्न निगडित करणार आहोत.

४·१४ **पूर्वीचे यश आणि अपयश :** १९४७ मधील परिस्थितीच्या तुलनेने आपण आता बरीच मजल मारली असली तरी राज्यघटनेच्या ४५ व्या कलमामध्ये ग्रथित केलेल्या उद्दिष्टापर्यंतचा उर्वरित प्रवास बराच प्रदीर्घ आणि अवघड ठरणार

आहे. या कार्यक्रमाच्या चार विशिष्ट उद्दिष्टांच्या संदर्भात आपण काय साध्य केले आहे हे पाहिल्यानंतर ही गोष्ट स्पष्ट होते : (अ) शैक्षणिक सुविधांची सार्वत्रिक उपलब्धी, (ब) सार्वत्रिक नावनोंदणी, (क) सार्वत्रिक उपस्थिती, आणि (ड) गुणवत्तेमध्ये सुधारणा अशी चार विशिष्ट उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवण्यात आलेली होती.

(१) प्रत्येक मुलाला त्याच्या परिसरात प्राथमिक शाळा उपलब्ध करून देणे हे या कार्यक्रमातील पहिले पाऊल आहे. सहा ते अकरा या वयोगटातील बहुसंख्य मुलांना आपल्या घरापासून पायी जाता येईल इतक्या अंतरावर प्राथमिक शाळा उपलब्ध करून देण्यात आतापर्यंत आपण यशस्वी झालेलो आहोत. तशाच तऱ्हेची सोय अकरा ते चौदा वयोगटातील साठ टक्के मुलांना माध्यमिक शाळेबाबतही करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रत्येक मुलाला आपल्या घरापासून चालत जाता येईल इतक्या अंतरावर प्राथमिक आणि माध्यमिक शाळा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट येत्या काही वर्षांमध्ये कोणतीही अडचण न येता गाठता येणे शक्य आहे.

(२) प्रत्येक मुलाने शाळेत आपले नाव दाखल केले आहे याची खात्री करून घेणे हे दुसरे पाऊल होय. १९७५–७६ मध्ये पहिलीपासून पाचवीपर्यंतच्या वर्गात ६ कोटी ६५ लाख मुलांची आणि सहावी ते आठवीपर्यंतच्या वर्गात १ कोटी ६५ लाख मुलांची नावे नोंदविलेली होती. या संख्येमध्ये बरीच खोटी नावनोंदणी असली पाहिजे हे उघडच आहे. मागास राज्यांमध्ये तर अशा खोट्या नावनोंदणीचे प्रमाण अधिक आहे. सहा ते चौदा या वयोगटातील सर्व मुलांनी येत्या दहा वर्षांमध्ये म्हणजे १९८५–८६ पर्यंत शाळेत नाव दाखल केले तर पहिली ते पाचवीच्या वर्गात ही संख्या साडेआठ कोटींनी आणि सहावी ते आठवीच्या वर्गात पाच कोटींनी वाढेल. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर येत्या दहा वर्षांत पाच कोटी वीस लाख मुले नव्याने शाळेत जाऊ लागतील. याचाच अर्थ असा की दरवर्षी बावन्न लाख मुले शाळेत प्रवेश मिळवतील. गेल्या तीस वर्षांमध्ये सरासरीने दरवर्षी चाळीस लाख मुले शाळेत नाव नोंदवित असत. चोवीस लाखांवरून बावन्न लाखांपर्यंत उपस्थिती वाढविण्याचे कार्य अवघड आहे. याचे कारण असे आहे की जी मुले सध्या शाळेत जात नाहीत ती शाळेपासून नेहमीच दूर राहिलेली आहेत. मुली आणि अनुसूचित जाती–जमातींमधील नि अन्य दुर्बळ समाजगटांमधील मुले यांचा यात समावेश होतो. त्यामुळे या मुलांना शाळेत दाखल होण्याच्या दृष्टीने व्यापक प्रयत्न करण्यात आला नाही तर सार्वत्रिक नावनोंदणीचे उद्दिष्ट गाठणे शक्य होणार नाही.

(३) सार्वत्रिक उपस्थितीची तरतूद करणे हे या कार्यक्रमातील तिसरे



पाऊल होय. सार्वत्रिक उपस्थितीचा अर्थ असा की शाळेत नाव दाखल केलेल्या प्रत्येक मुलाने प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत किंवा ते चौदा वर्षांचे होईपर्यंत शाळेतून आपले नाव काढून घेता कामा नये. प्राथमिक शाळेत दाखल झालेली बरीचशी मुले मध्येच शाळा सोडून जातात, हा सध्याच्या कार्यक्रमातील सर्वात मोठा दोष आहे. संदर्भविरहित आणि निकृष्ट प्रतीचे शिक्षण हे या गळतीचे एक कारण आहे. पण त्याहीपेक्षा पूर्णवेळच्या उपस्थितीचा आग्रहच मुख्यतः गळतीला कारणीभूत होतो. गरीब कुटुंबातील मुलांना अर्थार्जनासाठी काम करावे लागत असल्यामुळे त्यांना शाळेत पूर्णवेळ जाणे अशक्य असते. पहिली ते पाचवीच्या आणि पहिली ते आठवीच्या वर्गातील गळतीचे प्रमाण बरेच मोठे आहे हे स्पष्ट पुराव्यानिशी सिद्ध होते. पहिली ते पाचवीपर्यंत साठ टक्के आणि पहिली ते आठवीपर्यंत पंचाहत्तर टक्के एवढे हे प्रमाण आहे. गळतीच्या या प्रमाणामध्ये गेल्या तीस वर्षांत फरक पडलेला नाही. म्हणून सार्वत्रिक उपस्थितीचा प्रश्न सोडविणे अधिक कठीण जाणार आहे.

(४) शिक्षणविस्ताराच्या कार्यक्रमांबरोबरच शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीनेही प्रयत्न करणे आवश्यक ठरते. कारण राज्यघटनेतील ४५ व्या कलमामध्ये संख्येबरोबर गुणवत्ताही अभिप्रेत आहे. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा असमाधानकारक राहिल्यामुळे, या क्षेत्रात आपल्याला दारूण अपयश पत्करावे लागले ही खेदजनक वस्तुस्थिती मान्य करावीच लागते. शिक्षणप्रसाराच्या कार्यामध्ये शिक्षणाचा दर्जा हा महत्त्वाचा घटक असल्यामुळे हा प्रश्न हाताळण्यासाठी खास प्रयत्न करावे लागतील.

४·१५ **नवी कार्यपद्धती :** या अपयशाची कारणे जशी सामाजिक आहेत तशीच ती शैक्षणिकही आहेत. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जी राजकीय बांधिलकी आवश्यक असते तिचा आपल्या येथे अभाव होता. त्यामुळे या कार्यक्रमाला कधीही पुरेसा अग्रक्रम किंवा साधनसंपत्ती उपलब्ध होऊच शकली नाही. हा कार्यक्रम यशस्वी करावयाचा असेल तर जीवनमानात सुधारणा, सर्वांगीण विकास, प्रौढशिक्षणाचे प्रचंड कार्यक्रम आणि लोकांचा सक्रिय सहभाग या गोष्टी नितांत आवश्यक आहेत. परंतु यापैकी कोणत्याही गोष्टीकडे कधी लक्षच देण्यात आले नाही. अशा तऱ्हेच्या कार्यक्रमांची कार्यवाही द्रुतगतीने म्हणजे पाच ते दहा वर्षांत करावयाची असते. परंतु आपण हा दीर्घकालीन कार्यक्रम केल्यामुळे मूळ प्रश्न अधिकच बिकट झाला. लोकसंख्येतील वाढ, खर्चातील वाढ आणि गतिहीनता यांचा तो अपरिहार्य परिणाम होता. शिक्षणाचा आशय बव्हंशी संदर्भशून्य आणि शिक्षणाची गुणवत्ता निकृष्ट राहिल्यामुळे, मुलांना आपल्याकडे आकृष्ट करून घेण्यात आणि रोखून धरण्यात शाळांना यश आले नाही. आपण

जी औपचारिक शिक्षणपद्धती स्वीकारली आहे ती तर शिक्षणप्रसाराच्या दृष्टीने सर्वांत मोठा अडथळा ठरली. केवळ पूर्णवेळचे शिक्षकच सामावून घ्यायचे असे तिचे धोरण असल्यामुळे ती खर्चिक झाली. मुलांनी पूर्णवेळ हजर राहिले पाहिजे असा तिने आग्रह धरल्यामुळे ज्या गरीब कुटुंबातील मुलांना रोजगार करावा लागतो अशी कोट्यावधी मुले शाळा सोडून जाऊ लागली.

४·१६ पूर्वीच्या या अनुभवापासून धडा घेऊन येत्या काही वर्षांमध्ये हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपण नवी कार्यपद्धती अवलंबिली पाहिजे. या नव्या कार्यपद्धतीचे काही प्रमुख विशेष खालीलप्रमाणे आहेत :

(१) जास्तीत जास्त दहा वर्षांच्या कालावधीत हा प्रश्न सोडविलाच पाहिजे.

(२) सध्या एकाच इयत्तेमध्ये प्रवेश देण्याची पद्धत अवलंबिली जाते. वयाच्या सहाव्या वर्षी मुलाला पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश दिला जातो आणि दरवर्षी त्याने वरच्या वर्गात दाखल होत होत वयाच्या चौदाव्या वर्षी प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्याने शाळेत रहावे असे अपेक्षिले जाते. या कालावधीत अनेक मुले शाळा सोडून जात असल्यामुळे शिक्षणाची प्रगती अत्यंत संथ गतीने होते. ही कालबाह्य पद्धत आपली गरज भागवू शकत नसल्यामुळे आपण ती सोडून दिली पाहिजे. त्याऐवजी अनेक इयत्तांमध्ये प्रवेश देणारी आणि वैयक्तिक प्रगतीनुसार वरच्या वर्गात दाखल व्हायला मुभा देणारी लवचिक पद्धत आपण स्वीकारावयास हवी. तसे झाले तर शाळेत न जाणाऱ्या आणि वयाने अधिक असणाऱ्या मुलांनाही शिक्षण घेणे शक्य होईल. त्याचप्रमाणे पूर्णवेळच्या शिक्षणाबाबतचा आग्रहही आपण सोडून द्यायला हवा. ज्या मुलांना अर्थार्जनासाठी रोजगार करावा लागतो आणि त्यामुळे ज्यांना पूर्णवेळच्या शाळेत हजर राहणे शक्य होत नाही अशांसाठी अंशवेळच्या शिक्षणाची सोय केली पाहिजे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर वयाच्या सहाव्या वर्षी मुलाला पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश देणारी आणि दरवर्षी एकेक इयत्ता उत्तीर्ण होत त्याला वयाच्या चौदाव्या वर्षी आठव्या इयत्तेमध्ये नेणारी सध्याची पूर्णवेळची शिक्षणपद्धती चालू राहणार असली तरी मुलांना प्राथमिक शिक्षण देणारी तीच एकमेव पद्धती असता कामा नये. या प्रचलित पद्धतीला विविध गटातील विद्यार्थ्यांच्या गरजा भागविणाऱ्या अन्य तीन पद्धतींची जोड दिली गेली पाहिजे. या तीन पद्धती अशा :

(अ) सहा ते अकरा या वयोगटातील जी मुले पूर्णवेळच्या शाळेत जाऊ शकत नाहीत त्यांना कार्योपयोगी साक्षर होता यावे किंवा पाचवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी त्यांच्या अंशवेळच्या शिक्षणाची सोय करणे, (ब) अकरा ते चौदा या वयोगटातील जी मुले कधीही शाळेत गेलेली नाहीत किंवा ज्यांनी लवकर शाळा सोडली अशा मुलांना कार्योपयोगी साक्षर होता यावे किंवा



पाचवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी त्यांच्या अंशवेळच्या शिक्षणाची सोय करणे, आणि (क) ज्या मुलांनी पूर्णवेळचे किंवा अंशवेळचे शिक्षण घेऊन पाचवीपर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे, परंतु ज्यांना पुढचे पूर्णवेळचे शिक्षण घेणे शक्य झालेले नाही अशा सर्वांसाठी सहावी ते आठवीपर्यंतच्या अंशवेळच्या निरंतर शिक्षणाची सोय करणे. अशा रीतीने या चार भिन्न कार्यपद्धतींचा संकलित परिणाम असा होईल की सहा ते चौदा या वयोगटातील सर्व मुलांच्या शिक्षणविषयक गरजा भागू शकतील आणि त्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये सहभागी करून घेता येईल. तसेच विद्यार्थ्यांची गैरहजेरी किंवा गळती या प्रश्नांची सोडवणूक होऊन सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुलांना शिक्षण घेणे शक्य होईल. यापैकी ज्या मुलांना पूर्णवेळचे शिक्षण घेणे शक्य आहे ती ते शिक्षण घेतील आणि ज्यांना ते शिक्षण घेणे शक्य नाही त्यांच्या अंशवेळच्या शिक्षणाची सोय होईल. अंशवेळच्या शिक्षणासाठी आपण केवळ पूर्णवेळच्या व्यावसायिक शिक्षकांवर अवलंबून राहाण्याची गरज नाही हेही ध्यानात ठेवले पाहिजे. प्रौढशिक्षणाप्रमाणे प्राथमिक शिक्षणासाठीही समाजातील आतापर्यंत उपयोगात न आणल्या गेलेल्या अध्यापनसाधनांचा वापर करून घ्यावयास हवा.

(३) मुली आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती नि समाजातील इतर दुर्बळ घटक यांची मुले यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे.

(४) सामाजिक शिक्षणाच्या या कार्यक्रमाला प्रौढशिक्षणाचा प्रचंड कार्यक्रम खूपच उपयोगी पडेल. कारण पालकांचे शिक्षण झाले की ते आपल्या मुलांना शाळेत दाखल करायला आणि त्यांचे शिक्षण पूर्ण करायला प्रवृत्त होतील. हे असे केले जात असतानाच सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न करण्यात आला तर प्राथमिक शिक्षणाच्या कार्यक्रमाला अधिक प्रोत्साहन आणि आर्थिक पाठिंबा लाभू शकेल.

(५) हा कार्यक्रम विकेंद्रित पद्धतीने चालविण्यात आला तरच तो यशस्वी रीतीने हाताळता येईल हेही लक्षात घेतले पाहिजे. अखेरीस या कार्यक्रमामध्ये प्रत्येक मुलाच्या शिक्षणाचे नियोजन ( हे कार्य केवळ सामूहिक पातळीवरच करता येईल ) आणि प्रत्येक समूहाच्या शिक्षणाचे नियोजन ( हे कार्य गट किंवा जिल्हा पातळीवरच चांगल्या रीतीने करता येईल ) अभिप्रेत आहे. त्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत विकेंद्रित असला पाहिजे आणि त्याबरोबरच यापूर्वी कधीही नव्हती एवढी परिणामकारक प्रशासनयंत्रणा उभारण्यात आली पाहिजे. त्यादृष्टीने आपल्यापुढे विविध पद्धतीचे नमुने आहेत. शिवाय आपण नवे नमुनेही तयार करू शकतो. मुख्य गरज आहे ती नवीन तंत्रांच्या निर्मितीची आणि कार्यक्रमासंबंधीची निष्ठा, धैर्य आणि दृढ निर्धार यांची.

(६) आर्थिक टंचाई हा आतापर्यंत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या विस्तारामध्ये मोठाच अडथळा ठरलेला आहे. या अडचणीवर मात करायची असेल तर प्रत्येक मुलाच्या प्राथमिक शिक्षणावर करावा लागणारा खर्च गैरवाजवी होणार नाही अशी दक्षता घेतली पाहिजे. त्यासाठी वेतनश्रेणीची पुनर्रचना, अंशवेळच्या शिक्षणाचा स्वीकार आणि दोन पाळ्यांचा अवलंब करून विद्यार्थी-शिक्षक प्रमाणामध्ये वाढ हे उपाय अवलंबिता येतील. सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये पैसा फार मोठ्या प्रमाणावर वाया जाण्याची जी कारणे आहेत ती नाहीशी करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक शिक्षणाच्या कार्यक्रमाला आपण अधिक प्राधान्य दिले पाहिजे. म्हणजे मग या कार्यक्रमाला अधिक पैसा उपलब्ध होऊ शकेल.

(७) बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा आणि राजस्थान यांसारख्या राज्यांमध्ये वेगळीच समस्या आहे. तेथे अनुसूचित जाती आणि जमाती यांची लोकसंख्या बरीच आहे. मुलींनी शिक्षण घ्यायची जरूरी नाही असे तेथे एकंदरीने मानले जाते. या राज्यांमध्ये शाळेत न जाणाऱ्या मुलांचे प्रमाणही बरेच आहे. त्या मानाने त्यांच्यापाशी साधनसंपत्ती तुटपुंजी आहे. म्हणून विशेष प्रयत्न केल्याशिवाय आणि केंद्राने खास आर्थिक अनुदान दिल्याशिवाय या राज्यांना ही प्रचंड समस्या समाधानकारक रीतीने सोडविता येणार नाही. तसेच प्रत्येक राज्यानेही आपल्या कमी विकसित वा मागास विभागांसाठी अशाच तऱ्हेचे विशेष प्रयत्न करायला हवेत.

४·१७ **आशय आणि गुणवत्ता :** प्राथमिक शिक्षणाचा आशय नि गुणवत्ता आणि या शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण या दोन गोष्टी परस्परावलंबी आहेत. शिक्षणाचा आशय जर विद्यार्थ्यांच्या गरजांशी सुसंवादी असेल आणि त्याची गुणवत्ता चांगल्या प्रतीची असेल तर विद्यार्थ्यांना आकृष्ट करण्याची आणि आपल्याशी निगडित राखण्याची शाळांची क्षमता वाढते आणि त्यामुळे आपोआपच सार्वत्रिकीकरणाला चालना मिळते. जोपर्यंत विद्यार्थ्यांना शाळेसंबंधी असे आकर्षण आणि जवळीक वाटत नाही तोपर्यंत केवळ बाहेरच्या प्रयत्नांनी सार्वत्रिकीकरण साध्य होणार नाही. कदाचित हा बाहेरचा प्रयत्न यशस्वी झाला तरीदेखील निकृष्ट शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यात काहीच स्वारस्य नाही.

४·१८ उत्पादक स्वरूपाचे कार्य आणि समाजसेवेचे कार्यक्रम हे शैक्षणिक प्रक्रियेचा अविभाज्य घटक म्हणून अंतर्भूत करणे ही प्राथमिक शिक्षणातील आशयाच्या दृष्टीने मूलभूत सुधारणा होय. तसे केल्यास हात आणि मेंदू यांची सांगड बसेल. त्याचप्रमाणे शिक्षणाच्या वैयक्तिक उद्दिष्टांपेक्षा सामाजिक उद्दिष्टांवर भर दिला जाईल. या सुधारणेवर महात्मा गांधींनीही भर दिला होता. शिक्षणपद्धती सध्या जी मध्यमवर्गाभिमुख आहे ती जर जनताभिमुख करायची असेल तर तिच्यात हे परिवर्तन घडून आलेच पाहिजे, असे ते म्हणत असत. मात्र ही सुधारणा अंमलात आणणे सोपे नाही. केवळ शिक्षकांना प्रशिक्षित करून वा उपकरणे पुरवून हा बदल घडवून आणता येणार नाही. सामाजिक मूल्ये बदलण्याच्या मूलभूत समस्येशीच ही सुधारणा निगडित आहे आणि म्हणूनच जोपर्यंत समाजामध्ये श्रम आणि समाजसेवा यांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात नाही तोपर्यंत हा कार्यक्रम शालेय अभ्यासक्रमात अंतर्भूत करता येणार नाही. अर्थात ही सुधारणा मुख्यतः वरिष्ठ आणि मध्यम वर्गातच घडून येणे आवश्यक आहे हेही ध्यानात घेतले पाहिजे. कारण या वर्गांनी शिक्षण घेतलेले असले तरी ते स्वतःच्या हातांनी श्रम करीत नाहीत. इतकेच नव्हे तर शिक्षणात कार्यानुभव किंवा समाजसेवा याचा समावेश करणे म्हणजे आपल्या मुलांचा निरर्थक वेळ वाया घालविण्यासारखे आहे असे ते मानतात. याउलट, गरिबांच्या मुलांना स्वतःच्या हातांनी श्रम करावे लागतात, पण त्यांना शिक्षण घेता येत नाही. कारण त्यांच्यासाठी अंशवेळच्या शिक्षणाची होय नसते. म्हणून केवळ पूर्णवेळच्या औपचारिक शिक्षणामध्ये कार्यानुभवाचा अंतर्भाव करून चालणार नाही; तर श्रमाभोवती निगडित असलेल्या अंशवेळच्या शिक्षणाची पद्धती फार मोठ्या प्रमाणावर विकसित करावयास हवी.

४·१९ प्राथमिक शिक्षण स्थानिक परिस्थितीशी जास्तीत जास्त सुसंवादी करणे आणि केवळ माध्यमिक शिक्षणाची पूर्वतयारी म्हणून नव्हे तर ते स्वतंत्रपणेही संदर्भसंपन्न करणे ही प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमातील आणखी एक प्रमुख सुधारणा होय. सध्या आपल्याकडे अभ्यासक्रम-आखणीची केंद्रीभूत पद्धत आहे. राष्ट्रीय पातळीवर तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम हाच सर्वात उत्कृष्ट अभ्यासक्रम होय असे मानले जाते. राष्ट्रीय पातळीवर तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम राज्यांकडे येतो आणि प्रत्येक राज्य आपल्या प्रदेशातील सर्व शाळांसाठी हा एकच अभ्यासक्रम असला पाहिजे असा आग्रह धरते. अशा तऱ्हेने केंद्रीय पातळीवर तयार करण्यात आलेल्या अभ्यासक्रमामध्ये स्थानिक परिस्थितीची दखल घेणे शक्य नसते आणि त्यामुळे तो शिकणाऱ्यांच्या दृष्टीने प्रस्तुतता आणि आकर्षण हरवून बसतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची माध्यमिक शाळेत प्रवेश करण्याचा दृष्टीने तयारी व्हावी हा उद्देश डोळ्यांपुढे ठेवूनच प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करण्यात येत असतो. त्यामुळेही तो शिकणाऱ्यांच्या गरजांच्या दृष्टीने अर्थशून्य ठरतो. विशेषतः ज्या मुलांना प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर शिकायचे नसते त्यांना तर हा अभ्यासक्रम भावी जीवनासाठी मुळीच उपयुक्त वाटत नाही. ही परिस्थिती जर आपल्याला नाहीशी करायची असेल तर आपण शिक्षणाच्या

आशयाची आखणी अगदी वेगळ्या तऱ्हेने केली पाहिजे. हा अभ्यासक्रम स्वतः-पुरता स्वयंपूर्ण तर असलाच पाहिजे, शिवाय तो स्थानिक परिस्थितीशी सुसंगतही असायला हवा. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या सततच्या विचारविनिमयातून असा अभ्यासक्रम निश्चित करणे सहज शक्य आहे. हा अभ्यासक्रम केवळ विभागा-विभागानुसारच नव्हे तर, एकाच विभागामध्ये परिस्थितीनुसार वेगवेगळा राहील, हे सांगायची जरुरी नाही. म्हणून अभ्यासक्रम–आखणीची प्रक्रिया विकेंद्रित करण्याशिवाय आपल्याला पर्यायच उरत नाही. त्यासाठी आपण प्राथमिक शिक्षकांच्या हातात तयार अभ्यासक्रम देण्याऐवजी अभ्यासक्रमाची आखणी कशी करायची हे त्यांना समजावून सांगितले पाहिजे.

४·२० **समान शाळा** : विषमतेवर आधारलेल्या आपल्या समाजाने, श्रीमंत आणि गरीब यांना अलगअलग ठेवणारी विषमताधिष्ठित शिक्षणपद्धती अवलंबली आहे; हे आपण यापूर्वी पाहिलेलेच आहे. या पद्धतीमुळे श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गातील मुले 'चांगल्या' शाळांमध्ये प्रवेश मिळवू शकतात. अशा शाळांची संख्या बरीच कमी आहे. सर्व प्रतिष्ठाप्राप्त संस्था, शासकीय विद्यानिकेतने ( पब्लिक स्कूल्स ), इंग्रजी माध्यमाच्या शाळा आणि (ज्या मुख्यतः खाजगी मालकीच्या असतात अशा) दर्जेदार संस्था अशांचा या निवडक शिक्षणसंस्थांमध्ये समावेश होतो. या उलट सामान्य माणसांच्या मुलांना सरकारी पाठिंब्यावर चाललेल्या शाळांमध्येच प्रवेश मिळवावा लागतो. या शाळांमधील शिक्षण सामान्यतः निकृष्ट प्रतीचे असते. संपूर्ण शिक्षणपद्धतीमधील हा भेद ताबडतोब थांबला पाहिजे. विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवरील हा भेद नष्ट करण्यासाठी लगेचच पाऊल उचलले पाहिजे. तसे झाले तरच सहा ते चौदा या संवेदनाक्षम वयोगटा-तील सर्व मुले एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून शिकू आणि काम करू शकतील. त्यांच्या एकत्र येण्यामध्ये सामाजिक वर्गाचा किंवा जातीचा अडसर आडवा येता कामा नये. समता, सामाजिक अभिसरण आणि राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्याचा हा अतिशय परिणामकारक मार्ग ठरेल. म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर समान शाळांची पद्धती ताबडतोब निर्माण करावयास हवी, असे आम्ही आग्रहपूर्वक सुचवितो. हा अर्थातच मुख्यतः नागरी विभागातील प्रश्न आहे आणि त्यामुळे समाजातील आपला उच्च दर्जा टिकविण्यासाठी चांगल्या शाळांचा उपयोग करणाऱ्या वरिष्ठ हितसंबंधी वर्गाकडून या सूचनेला तीव्र विरोध होईल हे ध्यानात घेऊन, तो मोडून काढण्यासाठी कठोर राजकीय कृती करणे आवश्यक आहे.

४·२१ **शालापूर्व शिक्षण** : शालापूर्व शिक्षण ही सध्या नागरी आणि श्रीमंत वर्गाची मिरास झालेली आहे. हे शालापूर्वक शिक्षण ग्रामीण भागातील आणि गरीब कुटुंबातील मुलांना मिळण्याची सोय होणे ही आणखी एक शैक्षणिक



सुधारणा होणे आवश्यक आहे. शालापूर्व शिक्षणाच्या परंपरागत पद्धती खर्चिक असल्यामुळे त्यांचा या सुधारणेसाठी उपयोग होणार नाही. म्हणून उपलब्ध साधनसामग्रीमध्येच ज्यांचा विस्तार करता येईल अशा नव्या आणि कमी खर्चाच्या पद्धती शोधून काढल्या पाहिजेत. त्या दृष्टीने खालील काही पद्धतींचा विचार करणे युक्त होईल :

(१) महाराष्ट्रामध्ये प्राथमिक आणि प्राथमिकपूर्व शिक्षकांचे प्रशिक्षण एकत्रित करण्यात आलेले आहे. त्यामुळे दोन प्रमुख सुधारणा घडवून आणणे शक्य होईल :

(अ) पहिल्या आणि दुसऱ्या इयत्तांमध्ये खेळांमधून शिक्षण देण्याची पद्धत सुरू करता येऊ शकेल. त्या इयत्तांमध्ये अशा प्रकारच्या अध्यापनपद्धतीची विशेष गरज तर आहेच; शिवाय खर्च वाया जाण्याचे प्रमाणही बरेच कमी करता येईल; आणि (ब) प्राथमिक शाळांना जोडण्यात आलेली मुलांची क्रीडाकेंद्रे आपल्या कामाचा एक भाग म्हणून प्राथमिक शिक्षकही चालवू शकतील. जेथे दिवसातून तीन किंवा चार तासच शिक्षण देण्यात येते तेथे तर हे सुलभतेने अंमलात आणता येईल. तसे केल्याने बऱ्याच मुलांना काही प्रमाणात तरी शालापूर्व शिक्षण अगदी किरकोळ जादा खर्च करून देता येईल.

(२) प्राथमिकपूर्व शाळा चालविण्यासाठी त्या त्या विभागातील स्त्रियांची नेमणूक करण्याच्या तामिळनाडूमधील प्रयोगामुळे दरवर्षी प्रत्येक मुलावर करावा लागणारा खर्च बऱ्याच प्रमाणात वाचतो आणि त्यामुळे हा प्रयोग इतरत्रही चालू करावयास प्रत्यवाय नाही.

(३) बालसंगोपनाभोवती स्त्रियांच्या प्रौढशिक्षणाची गुंफण करणे अत्यंत फलप्रद ठरू शकेल. त्यायोगे प्राथमिकपूर्व वर्गातील मुलांच्या घरच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि योग्य रीतीने त्यांचे सामाजिकीकरण करणे शक्य होईल.

(४) सध्या संघटित क्षेत्रामध्ये नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या बरीच आहे. त्याचप्रमाणे सरकारी आणि बिनसरकारी यंत्रणांमार्फत विकासाचे जे अनेक कार्य-क्रम हाती घेण्यात आलेले आहेत तेथेही बऱ्याच स्त्रिया काम करीत असतात. तेथेच त्यांच्या लहान मुलांच्या संगोपनाची आणि शिक्षणाची व्यवस्था करावयास हवी. या बाबतीत फिरत्या पाळणाघरांच्या रूपाने कै. श्रीमती मीरा महादेवन यांनी केलेले उत्कृष्ट कार्य आदर्शभूत मानायला हवे.

(५) याहीपेक्षा ध्यानात ठेवण्याजोगी सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही आहे की प्राथमिक शाळा आणि पूर्वप्राथमिक शाळा यांच्यात साचेबंद विभागणी केली तर प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होणे अशक्य आहे. सध्या आपल्या प्राथमिक शाळांना पूर्वप्राथमिक विद्यालये किंवा पाळणाघरे जोडलेली नसतात. लहान मुलांची देखभाल करणे हे काम गरीब कुटुंबातील मुलींना करावे लागते.

मुलींमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा आणि त्यांची शाळांमधील उपस्थिती वाढावी यासाठी एकीकडे आपण प्रयत्न करीत असतानाच मुलींनी शाळेत आपल्याबरोबर लहान मुले आणू नयेत, ती मुले घरी ठेवूनच त्यांनी शाळेत आले पाहिजे असे आपण त्यांना बजावतो. गरीब कुटुंबातील मुलींना तसे करणे शक्य नसल्यामुळे, या नियमाचा एकच परिणाम होतो : आपण त्या मुलींना शाळेत प्रवेश करायला अप्रत्यक्षतः प्रतिबंध करतो. त्यामुळे सध्याच्या शिक्षणपद्धतीनुसार आपण गरीब कुटुंबातील मुलींना शिक्षणापासून दूर ठेवायला कारणीभूत ठरत आहोत. प्राथमिक शाळांना छोटी पाळणाघरे किंवा पूर्वप्राथमिक शाळा जोडून त्यांची देखभाल शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार प्राथमिक शाळांमधील मुलींनीच करावी या-दृष्टीने कै. श्रीमती ताराबाई मोडक यांनी उल्लेखनीय प्रयोग केले होते. या कार्यक्रमासाठी करावा लागलेला खर्च अगदीच नगण्य होता. परंतु गरीब कुटुंबा-तील मुलींची शाळेतील उपस्थिती वाढविण्याच्या दृष्टीने या प्रयोगाला खूपच यश लाभले. म्हणून या प्रयोगाचा व्यापक प्रसार होणे अगत्याचे आहे.

## जन-आंदोलन हवे

४·२२ या विषयावरील चर्चा संपविण्यापूर्वी आम्हाला एका अत्यंत महत्त्वाच्या मुद्याचा उहापोह करणे आवश्यक वाटते. लोकशिक्षणासाठी एक प्रभावी राष्ट्रव्यापी चळवळ उभारून लोकांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न केल्याशिवाय प्रौढशिक्षण, शालाबाह्य युवकांचे शिक्षण आणि सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण या लोकशिक्षणाच्या तीन कार्यक्रमांपैकी एकदेखील यशस्वी होऊ शकणार नाही, हा मुद्दा या संदर्भात सर्वाधिक महत्त्वाचा आहे. कारण लोकशिक्षणाचा हा कार्यक्रम मूलतः संमिश्र स्वरूपाचा असल्यामुळे तो तशा रीतीने कार्यवाहीत आला तरच या कार्यक्रमा-मागची उद्दिष्टे साध्य होणार आहेत. ही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील :

– कोट्यावधी निरक्षर प्रौढांना आणि युवकांना शिकायला आणि साक्षरता प्राप्त करायला प्रवृत्त करणे;

– शाळेत न जाणाऱ्या कोट्यावधी मुलांनी शाळेत यावे आणि शिक्षण पूर्ण होईपर्यंत तेथे रहावे यासाठी त्यांच्या पालकांच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणणे;

– शिक्षकांच्या सध्याच्या वृत्तींमध्ये बदल घडवून आणणे. सध्या त्यांच्यामध्ये शारीरिक कष्ट न करण्याची उच्चवर्गीय वा मध्यमवर्गीय प्रवृत्ती आढळून येते. त्यांनी या प्रवृत्तीचा विनाविलंब त्याग करून सामान्य माणसाच्या सेवेकडे वळावे, यासाठी श्रम आणि विकास यांच्याशी आपण जवळीक साधावयास हवी.

–हजारो अ-शिक्षकांना प्रशिक्षित करून त्यांना या कार्यक्रमात सहभागी व्हायला प्रवृत्त करणे; त्याचप्रमाणे या कार्यासाठी सर्व उपलब्ध सामाजिक यंत्रणांचा लाभ घेणे;



– शालेय शिक्षणपद्धतीबाहेर अनौपचारिक शिक्षणाचा व्यापक कार्यक्रम संघटित करणे;

– सध्याच्या औपचारिक शिक्षणपद्धतीमध्ये मूलगामी बदल घडवून आणण्या-साठी परिणामकारक उपाय योजणे आणि शालेय शिक्षणपद्धतीमध्ये नि बाहेर सातत्यपूर्ण आणि समर्पित भावनेने खडतर कष्ट करण्याचे वातावरण कायम राखणे.

गरीब लोकांना संघटित करून त्यांचे जीवनमान सुधारणे हे कार्य राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक असे त्रिविध स्वरूपाचे आहे. त्यापैकी केवळ शैक्षणिक स्वरूपाच्या कार्याचा विचार करावयाचे ठरले तरी तेदेखील व्यावसायिक शिक्षक, शालेय शिक्षणपद्धतीची साधनसामग्री आणि संपूर्ण नोकरशाही–यंत्रणेचे पराकाष्ठेचे प्रयत्न या सर्वांच्या कक्षेबाहेरचे आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. सर्व लोकांचा उत्कृष्ट सहभाग लाभलेल्या राष्ट्रव्यापी सामाजिक आंदोलनातूनच हे कार्य साकार होणार आहे. म्हणून अशा तऱ्हेचे सामाजिक आंदोलन संघटित करून येत्या दहा वर्षापर्यंत ते तीव्रतेने चालू राहील ही जबाबदारी लोकनेत्यांनी आणि विशेषतः राजकीय नेत्यांनी पार पाडली पाहिजे. तसेच या प्रयत्नांना शासकीय सेवकवर्ग, शिक्षक आणि सर्व शिक्षित व्यक्ती यांनी शक्य ते सर्व सहकार्य दिले पाहिजे.

## ड. माध्यमिक शिक्षण : उपलब्धी, शुल्क, निवडक प्रवेश आणि विस्तार.

४·२३ गेल्या तीस वर्षामध्ये माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा अतिशय जलद गतीने विस्तार करण्यात आला. परंतु तसे करण्यामागे कोणतेही नियोजन नव्हते. तशीच त्यामागे कोणतीही सुयोग्य अशी शैक्षणिक वा विकासविषयक कारणे नव्हती. ज्या नोकऱ्यांसाठी विद्यापीठीय पदवीची गरज नसते अशा नोकऱ्यांसाठीही विद्यापीठीय पदवीची अट घालण्याच्या चुकीच्या धोरणामुळे माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढत गेली. साधारणतः असे घडते की माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी मिळत नसल्यामुळे मुलगा महाविद्यालयात नाव दाखल करतो. ( त्यामुळे उच्च शिक्षण हा बेकारी दूर करण्याचा अतिशय खर्चिक मार्ग ठरतो. ) मुली साधारणतः महाविद्यालयात जातात त्या लग्न जुळेपर्यंत घरी बसायला नको म्हणून. ( त्यामुळे महाविद्यालयांना एक प्रकारे ' पाळणा घरा'चेच स्वरूप प्राप्त होते.) साहजिकच प्रतिष्ठा संपादन करायची साधने असेच माध्यमिक शाळांना आणि महाविद्यालयांना रूप आलेले आहे. या शिक्षणसंस्था सुरू करण्या-मुळे चालकांना राजकीय आणि आर्थिक फायदे होत असल्यामुळे ते अशा संस्था स्थापन करण्यात पुढाकार घेत असतात. हे संस्थाचालक स्थलनिश्चिती, शैक्षणिक स्वयंपूर्णता आणि प्रत्येक विद्यार्थ्यामागे करावा लागणारा खर्च यापैकी कोणत्याच

बाबीसंबंधी पूर्ण विचार करीत नाहीत. खरे म्हणजे सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्येच तिचा विस्तार अंतर्भूत झालेला आहे. सुशिक्षित बेकारांकडून येणाऱ्या दडपणांमुळे माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये यांची संख्या वाढविणे भाग पडते आणि त्याचा परिणाम पुन्हा बेकारी वाढण्यात आणि दडपणे अधिक तीव्र होण्यात होतो. या शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांची पात्रता पाहून प्रवेश देण्यात येत नाही, तर प्रवेशाची दारे सर्वांना खुली ठेवण्यात आलेली आहेत. आपल्यापाशी प्रशिक्षित शिक्षक आणि पैसा यांची उपलब्धता मर्यादित असल्यामुळे शिक्षणविस्ताराची मागणी पुरी करण्यासाठी आपण माध्यमिक आणि महाविद्यालयीन पातळ्यांवर द्विस्तरीय पद्धती निर्माण केली आहे. चांगल्या शैक्षणिक दर्जाबाबत ज्यांचा लौकिक आहे अशा प्रतिष्ठित संस्था केवळ बुद्धिमान मुलांनाच प्रवेश देतात. (अशा शिक्षणसंस्थांमधील शिक्षण साहजिकच चांगल्या नोकरीशी निगडित असते.) अशा शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांची ' गुणवत्ता ' पाहूनच प्रवेश देण्यात येत असतो याचा प्रत्यक्षात परिणाम काय होतो ? श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्माला आलेल्या मुलांसाठीच या शिक्षणसंस्था मर्यादित राहतात. या अशा ' निवडक ' शिक्षणसंस्थांच्याभोवती निकृष्ट दर्जाचे शिक्षण देणाऱ्या असंख्य संस्था पसरलेल्या असतात. तेथे सर्वसाधारण स्वरूपाचे शिक्षण देण्यात येते. त्यामुळे तेथे सर्व विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश असतो. सामान्य माणसाच्या मुलाला केवळ अशा शिक्षणसंस्थाच उपलब्ध होऊ शकतात. मग, तेथील शिक्षणाचा दर्जा कितीही निकृष्ट वा निरुपयोगी असो. मुक्त प्रवेशाचे धोरण गरिबांच्या हितासाठीच अवलंबिण्यात येत आहे असे सांगण्यात येत असते आणि आपल्याला वरच्या श्रेणीत जाता यावे यासाठी ते इष्टही आहे असे गरिबांना वाटत असले तरी या धोरणाचा प्रत्यक्ष फायदा वरिष्ठ आणि मध्यम वर्गानाच होत असतो. कारण माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये यांच्या परिसरात राहणाऱ्या लोकांनाच त्यांचा लाभ घेता येतो. दुर्बळ सामाजिक गटातील बहुसंख्य मुलांना खडतर आर्थिक परिस्थितीमुळे प्राथमिक शाळेनंतर शिक्षण सोडून द्यावे लागते. त्यामुळे वरिष्ठ आणि मध्यम वर्गातील कनिष्ठ प्रतीच्या मुलांनाच या मुक्तद्वार पद्धतीचा फायदा घेता येतो. शहरी भागात तर अशीच परिस्थिती आहे. गरीब कुटुंबातील बुद्धिमान मुलांनाही आर्थिक परिस्थितीमुळे या शाळांपासून दूर रहावे लागते ही मोठीच राष्ट्रीय हानी आहे.

या शिक्षणसंस्थांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात दिले जाणारे अनुदान वरिष्ठ आणि मध्यम वर्गीयांनाच लाभकारी ठरते. त्यामुळे सध्याच्या शिक्षणपद्धतीमुळे सर्वसामान्य जनतेची सेवा करणारे नागरिक निर्माण होण्याऐवजी शोषक वर्गाचीच संख्या वाढत जाते. म्हणून विद्यमान शिक्षणपद्धतीमधील या उणिवा, विषमता आणि दोषस्थळे नाहीशी करण्यावर किंवा कमी करण्यावर आपण भर



दिला पाहिजे.

४·२४ **सर्वसाधारण धोरण :** सद्यस्थितीत आपण जर सर्वांना प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देऊ शकत नसलो तर त्यानंतरचे शिक्षण घेणे हा आपला अधिकार आहे असा दावा कोणालाही करता येणार नाही. म्हणून प्राथमिक शिक्षणानंतरच्या शिक्षणाची तरतूद करताना पुढील तत्त्वे स्वीकारण्यात आली पाहिजेत :

(१) साधनसामग्रीची उपलब्धता आणि विशिष्ट दर्जाची ग्वाही या दोन गोष्टींशी माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा विस्तार निगडित केला पाहिजे.

(२) व्यक्तिमात्राचा आयुष्यभर शिक्षण घेण्याचा अधिकार आणि व्यक्तिमात्राच्या प्राथमिक शिक्षणोत्तर शिक्षणासाठी सरकारी तिजोरीतून दिले जाणारे अनुदान यामध्ये आपण फरक केला पाहिजे. कारण निरंतर शिक्षण घेण्याचा अधिकार हा मूलभूत मानवी अधिकार आहे आणि त्यामुळे एकाद्या व्यक्तीने कोठवर शिकावे आणि कोठे थांबावे हे सांगण्याचा कोणत्याही शासनाला अधिकार नसतो. परंतु आर्थिक साधनसामग्रीसंबंधीची मर्यादा लक्षात घेता, प्राथमिक शिक्षणोत्तर शिक्षणासाठी सरकारी तिजोरीतून पैसा खर्च होत असताना तो केवळ पात्र आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या व्यक्तींसाठीच खर्च होत आहे, हे शासनाने पाहिलेच पाहिजे.

(३) प्रौढशिक्षणाला आणि सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असल्यामुळे प्राथमिक शिक्षणोत्तर शिक्षणासाठी पैसा उपलब्ध होण्यावर मर्यादा पडणार हे उघडच आहे. म्हणून ही मर्यादित आर्थिक शक्ती अत्यंत काटकसरीने आणि परिणामकारक रीतीने वापरण्यात आली पाहिजे. विशेषतः सर्वसामान्य माणसासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी तिचा विनियोग व्हावयास हवा. (उदाहरणार्थ हुशार पण गरीब मुले शोधून काढून त्यांचा बौद्धिक विकास करणे.) तसेच शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठीही त्या पैशाचा विनियोग व्हायला हवा. (ही अत्यंत तातडीची गरज आहे. कारण आतापर्यंत शिक्षणाच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष झालेले आहे.)

(४) प्राथमिक शिक्षणोत्तर शिक्षणासाठी सध्या दिल्या जाणाऱ्या अनुदानाचा लाभ मुख्यतः वरिष्ठ आणि मध्यम वर्गानाच होत असल्यामुळे हे अनुदानाचे प्रमाण क्रमशः कमी करीत आणले पाहिजे. त्याचवेळी उपेक्षित समाजघटकांसाठी दिल्या जाणाऱ्या अनुदानात क्रमशः वाढ करावयास हवी.

(५) सध्या सुशिक्षित बेकारांची संख्या सतत द्रुतगतीने वाढत असल्यामुळे माध्यमिक शिक्षणासाठी मुक्त प्रवेश देण्याची पद्धत निर्बंधित करणे आवश्यक असले तरी दुर्बळ समाजघटकांमधील मुलांना हे शिक्षण घेण्याची संधी जास्तीत जास्त

व्यापक करण्याची जरुरी आहे. तसे झाले तर मर्यादित प्रवेशाचे नवे धोरण माध्यमिक आणि उच्च शिक्षणामध्ये प्रवेश करणारी वरिष्ठ आणि मध्यम वर्गाची सध्याची संख्या बऱ्याच प्रमाणामध्ये कमी करू शकेल.

४·२५ **प्रवेश-क्षमता :** माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी वंचित समाज-घटकांची प्रवेश-क्षमता वाढविण्यासाठी या शिक्षणसंस्थांमधील अनुसूचित जातींच्या आणि जमातींच्या विद्यार्थ्यांना सध्या जे साहाय्य देण्यात येते तशाच प्रकारचे साहाय्य ज्या कुटुंबांचे उत्पन्न विशिष्ट मर्यादेपेक्षा कमी आहे अशा कुटुंबांतील मुलांना आणि युवकांना देण्यात यावे. हे साहाय्य देताना जात, धर्म, लिंग असा कोणताही भेद करता कामा नये. विशेषतः खालील उपाय योजण्याची आवश्यकता आहे :

(१) या पातळीवरील ज्या शिक्षणसंस्थांमध्ये सध्या या ना त्या कारणाने प्रवेश मर्यादित करण्यात आलेला आहे अशा सर्व शिक्षणसंस्थांमध्ये एकूण जागांपैकी काही जागा आर्थिक दृष्ट्या दुर्बळ असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात आल्या पाहिजेत आणि त्या जागांसाठी गरीब कुटुंबातील मुले गुण-वत्तेच्या क्रमाने घेतली जावीत.

(२) आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या कुटुंबातील ज्या मुलांना आणि युवकांना या शिक्षणसंस्थामध्ये प्रवेश दिला जाईल त्यांना औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही प्रणालींनुसार देण्यात येणारे शिक्षण विनामूल्य मिळाले पाहिजे. तसेच त्यांना वैयक्तिक लक्ष आणि मार्गदर्शन (आणि अन्य संबंधित सुविधा) यांचा लाभ व्हावयास हवा. त्यायोगे त्यांना या शिक्षणसंस्थांमधील वातावरणामध्ये समरस होणे आणि तेथील शिक्षणाचा अधिकाधिक लाभ घेणे शक्य होईल.

(३) सध्याच्या शिक्षणपद्धतीमध्ये गरीब कुटुंबांतील बुद्धिमान मुलांची अत्यंत उपेक्षा केली जाते. ही मुले शाळेत जात नाहीत किंवा गेली तर लवकर शाळा सोडतात. त्यामुळे त्यांच्याकडे कोणाचेच लक्ष जात नाही. त्यांना अत्यंत निकृष्ट शाळांमध्ये प्रवेश दिला जातो आणि त्यामुळे त्यांच्या बुद्धिमत्तेचा विकास होत नाही. अशा मुलांच्या बाबतीत सामाजिक परिस्थितीने निर्माण केलेला अडसर दूर करण्यासाठी त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन आणि शिकवणी यांची गरज असते. पण ती त्यांना मिळत नसल्यामुळे, निवड–चाचण्यांमध्ये ती मागे पडतात. त्याहूनही वाईट गोष्ट ही आहे की शिक्षणाचा खर्च परवडत नसल्यामुळे त्यांना आपले शिक्षण चालू ठेवता येत नाही. गरीब कुटुंबातील बुद्धिमान मुले ही आपली राष्ट्रीय संपत्ती असल्यामुळे या मुलांची योग्य देखभाल करण्यासाठी सुनियोजित आणि व्यापक प्रयत्न होणे नितांत आवश्यक आहे. ही बुद्धिमान मुले शोधून काढण्या-साठी प्राथमिक शालेय पातळीवर राष्ट्रव्यापी मोहीम हाती घेतली पाहिजे. या



मुलांना माध्यमिक शिक्षण घेता यावे याकरिता, त्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार शिष्यवृत्तीच्या वा अन्य स्वरूपात साहाय्य दिले गेले पाहिजे. अशाच तऱ्हेचा कार्यक्रम माध्यमिक पातळीवरही हाती घ्यावयास हवा. गरीब कुटुंबातील बुद्धिमान मुलांना अडसर ठरणार नाहीत अशा रीतीने चाचण्या घेतल्या गेल्या पाहिजेत. तसेच या चाचण्यांना बसण्यापूर्वी त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन आणि शिकवणी यांचा लाभ मिळावयास हवा. खरे म्हणजे गरीब कुटुंबांमधील सर्व बुद्धिमान मुले ही शासनाची पाल्य आहेत आणि इच्छा नि क्षमता असेपर्यंत त्यांना उच्च शिक्षण घेता आले पाहिजे, हे आपल्या नव्या शैक्षणिक धोरणाचे मूलभूत तत्त्व झाले पाहिजे.

४·२६ अनुसूचित जाती–जमातींमध्ये शिक्षणप्रसार व्हावा या हेतूने सध्या जे कार्यक्रम अंगिकारण्यात आलेले आहेत, त्यात कपात करण्याचा आमचा मुळीच विचार नाही, हे येथे स्पष्ट केले पाहिजे. उलट, त्या कार्यक्रमांचा विस्तार होण्याचीच गरज आहे. अनुसूचित जाती–जमातींच्या मुलांना सध्या ज्या सवलती मिळतात त्या जात, धर्म किंवा लिंग या बाबतीत कोणताही भेद न करता दुर्बळ आर्थिक समाजगटातील सर्व मुलांना मिळायला हव्यात एवढेच आम्हाला सुचवायचे आहे.

४·२७ **शुल्क :** सध्या माध्यमिक शिक्षणावर आणि विशेषतः महाविद्यालयीन शिक्षणावर सरकारला बराच पैसा खर्च करावा लागतो. कारण शिक्षणावर करावा लागणारा खर्च सतत वाढत असताना शुल्कामध्ये त्या प्रमाणात वाढ झालेली नाही. या अनुदानाचा वरिष्ठ आणि मध्यम वर्गांना लाभ होत असल्यामुळे, शुल्कामध्ये वाढ करायला त्यांचा प्रखर विरोध असतो. इतकेच नव्हे तर शुल्क पूर्ण-पणे रद्द व्हावे किंवा ते कमी व्हावे यासाठी हे वर्ग सतत दडपण आणत असतात. ही विषमता चालू ठेवण्याचे काहीच कारण नाही. गरीब कुटुंबातील मुलांना मोफत शिक्षण देण्याची एकदा तरतूद झाली की माध्यमिक शाळांमधील आणि महाविद्यालयांतील शुल्क वाढवायला काहीच हरकत उरणार नाही. कारण ज्यांच्या-पाशी आर्थिक क्षमता आहे त्यांनाच हे वाढीव शुल्क द्यावे लागणार आहे. असा निर्णय करणे अवघड जाणार आहे हे खरे असले तरी तो केलाच पाहिजे. कारण त्यायोगे तीन गोष्टी सध्या होतील. एक ही की शिक्षणासाठी अधिक पैसा उपलब्ध होऊ शकेल. दुसरे असे की पूर्णवेळच्या शिक्षणसंस्थांच्या वाढीला आपोआपच मर्यादा बसेल. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हे आवश्यक आहे हा यामागील तिसरा विचार होय. वाजवी मर्यादेपर्यंत शुल्क वाढविण्यात आले की शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे वारंवार बंद पाडण्याबाबत विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांना गंभीरपणे विचार करावा लागेल.

४·२८ या संदर्भामध्ये शुल्कवाढीचा प्रश्न आणि आर्थिक बाबतीत स्वतंत्र असलेल्या विद्यानिकेतनांचा किंवा इंग्रजी माध्यमाच्या काही शाळांचा प्रश्न यांचा विचार करणे सयुक्तिक ठरेल. आपला खर्च भागविण्याइतके विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारणाऱ्या माध्यमिक शाळांच्या आणि महाविद्यालयांच्या स्थापनेला आर्थिक कारणावरून आक्षेप घेता येणार नाही, हे खरे आहे. परंतु अशा शिक्षणसंस्थांच्या बाबतीत शैक्षणिक आणि सामाजिक भूमिकेवरून आक्षेप घेता येतो. कारण अशा शाळांचे भरमसाट शुल्क देण्याची ज्यांच्यापाशी क्षमता आहे अशा श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गातील मुलांपुरताच या शाळांमधील प्रवेश मर्यादित राहाणार असल्यामुळे अशा शाळांमुळे सामाजिक विभक्तीकरणाला प्रोत्साहन मिळेल. म्हणून अशा तऱ्हेच्या शिक्षणसंस्था बंद करणेच अधिक श्रेयस्कर. परंतु तसे करणे ताबडतोब शक्य नसेल तर तात्पुरता उपाय म्हणून, अशा शिक्षणसंस्थांनी किमान पन्नास टक्के मुले तरी आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या कुटुंबां-तील घेतली पाहिजेत, एवढे त्यांच्यावर किमान बंधन घालणे आवश्यक आहे. शासन इतर शाळांना ज्या प्रमाणामध्ये अनुदान देते त्या प्रमाणात या मुलांबाबतचे अनुदान शासनाने आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण असलेल्या शिक्षणसंस्थांना देऊन त्यांना सोसाव्या लागणाऱ्या नुकसानीचा काही भार सहन करावा. असे करण्याने या शिक्षणसंस्थामधील सध्याच भरमसाट असणाऱ्या शुल्कामध्ये वाढ करावी लागेल हे खरे आहे. परंतु सामाजिक समतेच्या भूमिकेतून ही वाढ पूर्णपणे समर्थनीय ठरते.

४·२९ **निवडक प्रवेश :** माध्यमिक शाळांमधील आणि महाविद्यालयांमधील प्रवेश गुणवत्तेच्या आधारावर निर्बंधित असावा का ? या प्रस्तावाला सर्वच गटां-कडून जोरदार विरोध झालेला असून अद्यापपर्यंत त्याची मुळीच कार्यवाही झालेली नाही. निवडक प्रवेशाच्या समर्थनार्थ तीन प्रमुख मुद्दे मांडण्यात येतात. ते असे : सुशिक्षितांमधील बेकारी कमी करणे, शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि दुर्मिळ साधनसामग्रीची बचत करणे. उलटपक्षी, सध्याच्या मुक्त-प्रवेशाची पद्धत तशीच चालू ठेवावी यासाठी येत असलेली दडपणेही तेवढीच प्रखर आहेत. यामध्ये, मुक्तप्रवेशाच्या पद्धतीमुळे ज्यांचा मुख्यतः लाभ होतो त्या केवळ वरिष्ठ आणि मध्यम वर्गांचाच समावेश नाही; तर समाजातील दुर्बळ घटकही या विरोधात सहभागी आहेत. कारण उच्च शिक्षणामध्ये निवडक प्रवेशाचे तत्त्व अवलंबण्यात आले तर वरिष्ठ वर्गात प्रविष्ट होण्याची आपली संधी हिरावून घेतली जाईल, अशी त्यांना भीती वाटते. म्हणून या जटिल समस्येवर आपल्याला नेमका आणि सोपा उपाय शोधून काढता येणार नाही. या बाबतीत आपल्याला लवचिक आणि व्यवहार्य मार्गच शोधून काढायला हवा. त्याची दिशा स्थूलमानाने खालील-



प्रमाणे राहावी :

( १ ) मुले वयाने लहान असल्यामुळे माध्यमिक शिक्षणाच्या प्रारंभी ( इयत्ता आठवी किंवा नववी ) निवडक प्रवेशपद्धतीचा अवलंब करण्यात येऊ नये.

( २ ) शासकीय निधीतून मदत स्वीकारणाऱ्या आणि शालांत परीक्षेनंतरचे शिक्षण देणाऱ्या पूर्णवेळच्या सर्व संस्थांनी शिक्षणाचा विशिष्ट दर्जा सांभाळलाच पाहिजे. त्यासाठी त्या संस्थांमधील शैक्षणिक सुविधा लक्षात घेऊन त्यांना एकूण किती विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल याची मर्यादा ठरवून द्यायला हवी. या शिक्षणसंस्थांमध्ये उपलब्ध असणाऱ्या जागांच्या संख्येपेक्षा प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असेल तर तेथे निवडीचे निकष लावण्यात यावेत. ही निवडक प्रवेशाची पद्धत अवलंबताना दुर्बळ घटकांवर अन्याय होऊ नये यासाठी निवड करण्याच्या अधिक चांगल्या आणि अधिक न्याय्य पद्धती निश्चित केल्या पाहिजेत. तसेच या शिक्षणसंस्थांमध्ये दुर्बळ गटातील विद्यार्थ्यांसाठी पुरेशा जागा राखून ठेवायला हव्यात.

( ३ ) माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर अनौपचारिक शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. त्यासाठी अनौपचारिक शिक्षणामधील सध्याची मुक्त प्रवेशाची पद्धत तशीच चालू ठेवण्यात यावी. अनौपचारिक शिक्षणाला चालना मिळण्याच्या दृष्टीने माध्यमिक आणि विद्यापीठीय पातळ्यांवरील सर्व परीक्षांना बसण्याची खाजगी विद्यार्थ्यांना मुभा असली पाहिजे. तसेच सर्व भाषिक विभागांमध्ये टपालामार्फत ( ग्रंथालय आणि संपर्क कार्यक्रमांसह ) शिक्षण घेण्याची सोय पुरेशा प्रमाणामध्ये निर्माण करावयास हवी.

या धोरणामुळे अनेक गोष्टी साध्य होऊ शकतील. प्राथमिकनंतरच्या शिक्षणाचा प्रसार करताना त्या शिक्षणाची गुणवत्ता घसरणार नाही (सध्या तसे घडत आहे). ज्यांची इच्छा आहे त्यांना प्राथमिकनंतरचे शिक्षण अनौपचारिक पद्धतीने घेता येईल. निवडक प्रवेशाची पद्धत फक्त शासकीय अनुदान घेणाऱ्या पूर्णवेळेच्या शिक्षणसंस्थांमध्येच अवलंबली जाईल. शालांत परीक्षेनंतरचे शिक्षण घेऊ इच्छि-णाऱ्या दुर्बळ गटातील मुलांना अशा शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश मिळविणे अवघड जाणार नाही. ( कारण तेथील चाचणी पद्धत अधिक चांगली राहील. शिवाय अशा मुलांसाठी पुरेशा जागाही राखून ठेवण्यात येतील.) ज्या विद्यार्थ्यांना या शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश मिळणार नाही किंवा पुढचे शिक्षण घेण्याची ज्यांची इच्छा नाही, त्यांना रोजगार उपलब्ध झाले, आणि नोकरी देताना औपचारिक नि अनौपचारिक शिक्षणप्रणालींना समान लेखण्यात आले तर हा कार्यक्रम अधिक प्रमाणामध्ये यशस्वी होऊ शकेल. या कार्यक्रमाला यश लाभण्यासाठी आणखी एक गोष्टीची जरूर आहे. ती ही की जे विद्यार्थी पुनरावृत्त शिक्षणपद्धतीचा अवलंब

करतात ( म्हणजे गरजेनुसार शाळा सोडून रोजगार करतात किंवा रोजगार सोडून शाळेत दाखल होतात ) अशा विद्यार्थ्यांचा नोकरीसाठी विचार करताना त्यांना वयाच्या बाबतीत सवलत मिळाली पाहिजे. शिक्षण सलग पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना जसे लेखले जाते तसेच या विद्यार्थ्यांनाही लेखले गेले पाहिजे.

४·३० **विस्तार :** शैक्षणिक किंवा आर्थिक असा कोणताच विचार न करता, नव्या शिक्षणसंस्थांची भरमसाट स्थापना, नव्या शिक्षणक्रमांचा प्रारंभ किंवा सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्थांमध्ये विद्यार्थ्यांना वाढत्या संख्येने प्रवेश हीच मुख्यतः प्राथमिकनंतरच्या शिक्षणाचा दर्जा खालावण्याची, अवास्तव विस्तार होण्याची, विद्यार्थ्यांवरील खर्चात वाढ होण्याची आणि साधनसामग्री वाया जाण्याची कारणे आहेत. माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा विस्तार नियंत्रित करण्यासाठी नव्या माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांची स्थापना आणि जागा याबाबत नियंत्रण अंमलात आणणे हा एक प्रमुख उपाय ठरेल. नवे शिक्षणक्रम सुरू करण्याबाबत किंवा विद्यमान संस्थांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी घेण्याच्या प्रवृत्तीबाबतही नियम करावयास हवेत. म्हणून आपले धोरण खालील सूत्रांवर आधारलेले असावे :

( १ ) नव्या शिक्षणसंस्था सुरू करण्यापेक्षा विद्यमान शिक्षणसंस्थांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याला अग्रक्रम दिला पाहिजे.

( २ ) अध्यापक, उपकरणे आणि पैसा पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध असल्याशिवाय नव्या शिक्षणसंस्था सुरू करण्यात येऊ नयेत.

( ३ ) ज्या मागास विभागात शिक्षणसंस्था अपुऱ्या आहेत किंवा जेथे नव्या शिक्षणसंस्था स्थापन करणे आवश्यक आहे केवळ अशाच ठिकाणी नव्या माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये सुरू केली जावीत. एखाद्या नव्या विद्यापीठाची शैक्षणिक भूमिकेवरून आवश्यकता आहे असे सिद्ध करण्यात आले तरच नवे विद्यापीठ स्थापन करावे.

(४) नव्या शिक्षणसंस्था स्थापन करण्याबाबत सामान्यतः खाजगी व्यक्तींकडूनच दबाव येत असल्यामुळे, अशा संस्थांना मान्यता देण्याबाबतचे किंवा त्या संलग्न करून घेण्याबाबतचे नियम अधिक कडक करण्यात आले पाहिजेत. त्या नियमांचे शिक्षणसंस्थांकडून पालन होत आहे, इकडेही लक्ष द्यावयास हवे.

(५) सर्व माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण व्हावीत एवढी तरी तेथे किमान विद्यार्थी-संख्या असली पाहिजे, असा प्रयत्न व्हावयास हवा. विद्यमान शिक्षणसंस्थांमधील विद्यार्थीसंख्या वाढण्यासाठी नव्या शिक्षणसंस्थांच्या स्थापनेवर बंधने, त्या कोठे काढल्या जाव्यात यासंबंधी योग्य नियोजन, आणि जेथे शक्य असेल तेथे विद्यमान शिक्षणसंस्थांची पुनर्रचना हे



उपाय योजिले पाहिजेत.

(६) किमान विद्यार्थीसंख्येची निश्चिती होईपर्यंत, कोणत्याही शिक्षणसंस्थेला नवे अभ्यासक्रम सुरू करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच, सध्याच्या अभ्यासक्रमांची पुनर्रचनाही केली पाहिजे. जे अभ्यासक्रम कालबाह्य झालेले आहेत किंवा जे अभ्यासक्रम फारसे विद्यार्थी घेत नाहीत ते बंद करायला हवेत. उपलब्ध सुविधांचा परस्परांनी वापर करण्याचे आणि अध्यापन सहकारी पद्धतीने करण्याचे शिक्षणसंस्थांनी ठरविले तर त्यांच्या खर्चात बरीच बचत होऊन कार्यक्षमताही वाढेल.

(७) उपलब्ध सुविधांच्या प्रमाणाबाहेर अधिक विद्यार्थी घेण्याची कोणत्याही शिक्षणसंस्थेला मुभा असता कामा नये.

४·३१ या विषयावरील चर्चा संपविण्यापूर्वी, उच्च शिक्षणाच्या प्रसाराला चालना देणाऱ्या दोन प्रमुख समस्यांचा उल्लेख केला पाहिजे : (अ) लब्धप्रतिष्ठित समाजातील स्थान किंवा संघटित क्षेत्रामधील आणि विशेषतः सरकारी नोकरी आणि पदवी यांचा घनिष्ठ आणि दीर्घकालिन संबंध; आणि (ब) सुशिक्षित व्यक्तींसाठी आपण स्वीकारलेली वेतनश्रेणी.

(१) सरकारी नोकऱ्यांमध्ये शिक्षित व्यक्तींना नेमण्याची प्रथा एकशेतीस वर्षांपूर्वी सुरू झाली. आपण या देशामध्ये जी नवी शिक्षणपद्धती अमलात आणली आहे तिचा लोकांनी अधिकाधिक लाभ घ्यावा, असा ही प्रथा सुरू करण्यामागचा इंग्रज राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन होता. ही प्रथा १९२१ पर्यंत व्यवस्थित चालली. कारण तोपर्यंत, हे शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना लगेच सरकारी नोकऱ्या मिळत असत. या विद्यार्थ्यांना माध्यमिक आणि विद्यापीठीय शिक्षण देण्यामागे तोच उद्देश असायचा. परंतु १९२१ नंतर पदवी आणि सरकारी नोकरी यांच्या घनिष्ठ नात्याचे अनिष्ट परिणाम दिसून येऊ लागले. एक तर असे की या शिक्षणपद्धतीने रोजगार मिळविण्याचे साधन हाच माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा प्रमुख हेतू मानला आणि त्यामुळे या शिक्षणाला प्रतिष्ठित वर्गात प्रवेश करण्याचा सोयीस्कर मार्ग असे स्वरूप प्राप्त झाले. या प्रवृत्तीमुळे, ज्ञान आणि परिपूर्णता यांचा ध्यास लागलेले नागरिक निर्माण करणे हा शिक्षणाचा मूळ हेतू दुर्लक्षित राहिला. शिवाय माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेताच प्रतिष्ठित वर्गात स्थान मिळते किंवा संघटित क्षेत्रात चांगल्या पगाराची आणि सुरक्षित नोकरी मिळविता येते हे आढळून आल्यामुळे माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यावर वाढती दडपणे येऊ लागली. उपलब्ध नोकऱ्यांच्या प्रमाणामध्ये ही वाढ होण्याऐवजी या नोकऱ्या मिळविण्याची धडपड करणाऱ्या तरुणांच्या प्रमाणामध्ये शिक्षणसंस्था स्थापन झाल्या पाहिजेत अशी मागणी होऊ लागली. त्यामुळे साह-

जिकच माध्यमिक शिक्षण आणि नंतर महाविद्यालयीन पदवी घेतलेले तरुण फार मोठ्या संख्येने या शिक्षणसंस्थांमधून बाहेर पडू लागले. त्या प्रमाणामध्ये नोकऱ्या उपलब्ध नसल्यामुळे सुशिक्षित बेकारांची संख्या वाढत चालली. अशा वेळी शिक्षण संस्थांमधून तेथील शिक्षण पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सीमित करण्याऐवजी आपण भलतेच मार्ग अवलंबले. या शिक्षित विद्यार्थ्यांना शिक्षक म्हणून सामावून घेण्यात येऊ लागले. (त्यामुळे माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये यांची संख्या अधिकच वाढली आणि मूळचा प्रश्न अधिक जटिल झाला.) तसेच संघटित सार्वजनिक क्षेत्रामध्ये गरजेपेक्षा अधिक जागा निर्माण करण्यात आल्या. (असे करणे ही एक प्रकारची अर्धबेकारीच असते. त्यामुळे बेशिस्त आणि साधनसामग्रीची उधळपट्टी यांनाच चालना मिळते.) असे करूनही भागेना तेव्हा कोणतेही सयुक्तिक कारण नसतांनाही अर्जदारांसाठी शैक्षणिक पात्रता उंचावण्यात आली किंवा अधिक शैक्षणिक पात्रता संपादन केलेल्यांची नेमणूक करण्यात येऊ लागली. (त्यामुळे शिक्षणाचे अवमूल्यन झाले.) परंतु यापैकी एकही उपाय फलद्रुप होऊ शकला नाही. उलटपक्षी, त्यामुळे उच्च शिक्षणाच्या विस्तारा-बाबत अधिक दडपणे येऊ लागली. आपण शिक्षण कशासाठी घ्यायचे यामागची विद्यार्थ्यांची मूळ प्रेरणा नाहीशी झाली. साहजिकच शिक्षणसंस्थांच्या आवारा-मध्ये असंतोष आणि बेशिस्त यांचे पेव फुटले. परिणामी, शिक्षणाचा दर्जा आणखी घसरला. आता तर अशी परिस्थिती आलेली आहे की कोणतीही बरी नोकरी मिळविण्यासाठी विद्यापीठाची पदवी ही किमान शैक्षणिक पात्रता झालेली आहे, आणि त्याचवेळी पदवी नि नोकरी यांच्यातील अंतर इतके वाढले आहे की उच्च शिक्षण घेऊन नोकरी मिळविणे लॉटरीचे बक्षिस मिळविण्याइतके अनिश्चित झालेले आहे.

(२) त्याचप्रमाणे, आपण जी अवास्तव आणि ऐच्छिक वेतनश्रेणी स्वीकारली आहे तिचा सांभाळ करणे आपल्या देशाच्या आर्थिक कुवतीबाहेरचे आहे आणि त्यामुळे आणखी काही वेगळेच प्रश्न आणि विसंगती निर्माण झालेली आहे. एक तर या वेतनश्रेणीमुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या शिक्षणावर करावा लागणारा खर्च वाढत चालला आहे. अशा परिस्थितीत शिक्षणाचा आणखी विस्तार करणे कठीण होत चाललेले आहे. आणि त्याचबरोबर शिक्षणाच्या विस्ताराची मागणी तीव्र होत जात आहे. कारण कोणतीही नोकरी मिळविण्यासाठी शैक्षणिक पात्रता आवश्यक झालेली आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या वेतनश्रेणीमुळे नोकऱ्यांची संख्याही कमी होते. कारण अशा प्रत्येक नोकरीसाठी आर्थिक गुंतवणूक अधिक करावी लागते. विस्तारित शिक्षणप्रसारातून जास्तीत जास्त विद्यार्थी बाहेर पडत असल्यामुळे नोकरी मागणाऱ्या अर्जदारांची संख्या सतत भरमसाट वाढत आहे.



त्याहीपेक्षा अनिष्ट गोष्ट ही आहे की सध्याच्या वेतनश्रेणीमुळे शैक्षणिक जगतातील मूल्यरचनाच विस्कळीत होत आहे. खरे म्हणजे शिक्षणामुळे प्रत्येक व्यक्तींच्या मनात साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ही मूल्ये रुजायला हवीत. तसेच ती व्यक्ती लोकांच्या निकट जायला हवी; लोकांची सेवा करणे हे आपले कर्तव्य आहे अशी जाणीव तिच्यात जागृत व्हायला हवी. शिक्षित व्यक्तींसाठी आपण जी कृत्रिम वेतनश्रेणी स्वीकारली आहे तिच्यामुळे लोकसेवक निर्माण होण्याऐवजी खुषमस्करेच वाढत आहेत. लोकांची सेवा करण्याऐवजी ते लोकांचे शोषणच करीत आहेत. म्हणून उच्च शिक्षण आणि प्रतिष्ठित क्षेत्रांमधील नोकऱ्या यांचा संबंध तर तोडलाच पाहिजे आणि त्याचबरोबर सध्याच्या वेतनपद्धतीची समानतेच्या पायावर पुनर्रचना करावयास हवी.

हे मूलभूत प्रश्न समाधानकारक रीतीने सोडवायचे असतील तर खाली निर्देश केलेले काही महत्त्वाचे उपाय योजावयास हवेत :

(१) सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही क्षेत्रांमधील सध्याची लहरी, न परवडणारी आणि विषम वेतनरचना रद्द करण्यात यावी. वेतन, उत्पन्न आणि किमती यासंबंधी नवे समताधिष्ठित राष्ट्रीय धोरण आखून त्याची येत्या दहा वर्षामध्ये क्रमशः अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे.

(२) सार्वजनिक क्षेत्रांमधील नोकऱ्यांसाठी सध्या ठरविण्यात आलेल्या अर्हतेचा पुनर्विचार व्हावयास हवा. तसेच अधिक अर्हतेच्या व्यक्तींची भरती करण्याचे सध्याचे धोरणही अवलंबता कामा नये. बऱ्याचशा जागांकरिता दहावी (किंवा बारावी) उत्तीर्ण होणे पुरेसे ठरते, असे दिसून येते. म्हणून त्यापेक्षा अधिक शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना त्या जागांसाठी एक तर अपात्र ठरविण्यात आले पाहिजे, किंवा पदवीधरांना ती नोकरी मिळणार नाही अशा रीतीने वयाची अट जारी केली पाहिजे. खाजगी क्षेत्रालाही हे धोरण अमलात आणण्या-बद्दल तयार केले पाहिजे.

(३) ज्यांनी पूर्णवेळेच्या शिक्षणसंस्थांमध्ये शिक्षण घेतलेले आहे त्यांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचे सध्याचे धोरण टाकून दिले पाहिजे. त्याऐवजी नोकऱ्या देतांना ज्यांनी खाजगी रीतीने अभ्यास केला आहे किंवा अंशवेळेचे शिक्षण घेतलेले आहे अशांना जरी प्राधान्य मिळाले नाही तरी निदान पूर्णवेळेचे शिक्षण घेतलेल्या तरुणांइतका त्यांचाही विचार व्हावा.

(४) ज्यांनी केवळ औपचारिक शिक्षण घेतलेले आहे त्यांचीच निवड करण्याची सध्याची पद्धत, जेथे शक्य आहे तेथे, सोडून देऊन, नोकरीच्या विशिष्ट गरजांशी निगडित असणाऱ्या खास चाचण्या घेऊन भरती केली जावी. अनौपचारिक किंवा सहज प्रणालीनुसार शिक्षण घेतलेल्यांनाही या चाचण्यांना

बसण्याची मुभा मिळावी. या वाचण्यांना बसण्यासाठी पदवी ही सक्तीची अट नसावी. केंद्रीय लोकसेवा आयोगाने आय. ए. एस. सारख्या स्पर्धात्मक परीक्षा घेताना, पदवीची अट काढून टाकून याबाबतीत इतरांना उदाहरण घालून द्यावे.

(५) उच्च शिक्षणावर अवास्तव भर देणारी अतिव्यावसायीकरणाची प्रवृत्ती रोखली पाहिजे. त्याऐवजी काम आणि नोकरी याची अशी सांगड घालावी की ज्यायोगे मध्यम वा कनिष्ठ पातळीवरील अनेक कामे नियव्यावसायिकांना किंवा अव्यावसायिकांना देखील करता येतील.

## ई. माध्यमिक शिक्षण : दर्ज्यात सुधारणा आणि तांत्रिक शिक्षण

४·३२ **दर्ज्यात सुधारणा :** माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढणे संपूर्ण शिक्षणपद्धतीच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाचे आहे. कारण माध्यमिक शिक्षण घेतलेले लोक एक तर प्राथमिक शाळात शिक्षक म्हणून दाखल होतात किंवा महाविद्यालये आणि विद्यापीठ यात पुढील शिक्षणासाठी प्रविष्ट होतात. म्हणून, माध्यमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर देण्याऐवजी, त्या शिक्षणाची गुणवत्ता उंचावेल इकडे अधिक लक्ष देणे आवश्यक ठरते. त्यासाठी प्रत्येक माध्यमिक शाळेमधील विद्यार्थीसंख्या उचित मर्यादेपर्यंत वाढवावी लागेल. शैक्षणिकदृष्ट्या परिपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या परवडेल एवढ्या पातळीपर्यंत विद्यार्थीसंख्या वाढवायला प्रत्यवाय नसावा. तसेच या शाळांना अधिक जमीन, इमारती आणि उपकरणे उपलब्ध करून द्यावयास हवीत. कारण सध्या बऱ्याच माध्यमिक शाळांची या बाबतीतील परिस्थिती निकृष्ट आहे. त्याबरोबरच शिक्षणाच्या दर्ज्यात वाढ करण्याचाही प्रयत्न व्हावयास हवा. या सगळ्या गोष्टींसाठी बराच पैसा लागेल हे खरे आहे; या वाढीव खर्चापैकी काही भाग समाजाकडून गोळा करता येईल.

४·३३ माध्यमिक शिक्षणाच्या आशयामध्ये मूलभूत सुधारणा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. माध्यमिक शिक्षणाच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये कार्यानुभव आणि समाजसेवा यांचा अंतर्भाव केलाच पाहिजे. तसेच माध्यमिक शिक्षणातील अभ्यासक्रम अधिक विविधतापूर्ण करावयास हवा. त्याचा दर्जाही वाढविण्यात आला पाहिजे. त्याबाबतीत शिक्षण आयोगाने स्थूल स्वरूपाची सूत्रे सुचविली आहेत. दुर्दैवाने या सुधारणेच्या अनेकविध अंगांसंबंधी सध्या खूपच मतभिन्नता व्यक्त केली जाते.

(१) माध्यमिक शाळेतील अभ्यासक्रमात विज्ञान आणि गणित हे सक्तीचे असले पाहिजेत आणि त्यांच्या अध्यापनाच्या दर्ज्यात सुधारणा झाली पाहिजे, अशी शिक्षण आयोगाची शिफारस आहे. काही जणांचा या शिफारशीला विरोध आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की मुली आणि मागास विद्यार्थी या दोन



विषयात कच्चे असल्यामुळे या शिफारशीमुळे त्यांच्या शिक्षणामध्ये अडचण उत्पन्न होईल. परंतु शिक्षण आयोगाची सूचना खरोखरच अर्थपूर्ण आहे. कारण आधुनिक जगात विज्ञान आणि गणित यांच्या अध्ययनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शिवाय मुली आणि मागासवर्गीय यांच्या शिक्षणावर या शिफारशीमुळे अनिष्ट परिणाम होईल ह्या युक्तिवादाला शास्त्रीय आधार आहे असे आम्हांला वाटत नाही. जास्तीत जास्त इतकेच करावे लागेल की स्थित्यंतराच्या अवस्थेमध्ये मुली आणि मागासवर्गीय विद्यार्थी यांच्या अध्यापनाकडे अधिक लक्ष पुरविणे आवश्यक ठरेल. तेवढे जरूर करावे.

(२) शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि जगातील वाढत्या ज्ञानाबरोबरचा वेग अबाधित राखण्यासाठी माध्यमिक शिक्षणातील आशय अधिक सखोल करावा असे काहीजण सुचवितात; तर तसे करण्याने मुलांवरील अनावश्यक माहितीचा बोजा वाढेल किंवा पुस्तकांचा गठ्ठा वागविणाऱ्या छोट्या स्मरणयंत्रां-मध्ये मुलांचे रूपांतर होईल असे काही जणांचे म्हणणे आहे. याबाबतीत आमचे मत असे आहे की अभ्यासक्रमाचा आशय सखोल करणे अत्यावश्यक आणि अपरिहार्य आहे. मात्र त्यासाठी, आतापर्यंत ज्याप्रमाणे अभ्यासक्रमाचा बोजा वाढत गेला तसे न करता अध्यापन आणि मूल्यमापन यांच्या अधिक चांगल्या पद्धती वापरून हे साध्य करता येणे शक्य आहे आणि तसेच केले पाहिजे. त्यासाठी माध्यमिक शिक्षणाच्या प्रारंभिक पातळीवरील अभ्यासक्रमाची फेररचना आणि सुगमीकरण करण्याची गरज भासेल. मात्र उच्च माध्यमिक पातळीवर गुणवत्तेचा विचार व्हायलाच हवा. त्या पातळीवरील अभ्यासक्रमाचा आशय प्रत्येक विद्यार्थ्याला समजला पाहिजे हे कारण पुढे करून गुणवत्ता खाली आणण्यात आली तर ते अत्यंत घातक ठरणार आहे. म्हणून उच्च माध्यमिक शिक्षण घेण्याची ज्यांच्यापाशी क्षमता आहे त्यांचीच त्यासाठी निवड करणे श्रेयस्कर ठरेल. कारण येथूनच विशेषीकरणाला प्रारंभ होत असतो.

(३) निम्न माध्यमिक पातळीवरील (नववी-दहावी किंवा आठवी ते दहावी) अभ्यासक्रमाच्या आशयाचे स्वरूप कसे असावे, हा प्रश्न अद्याप अनिर्णीत राहिलेला आहे. माध्यमिक शिक्षण आयोगाने (१९५२) निश्चित विषय सुचविले होते तर शिक्षण आयोगाने (१९६४-६६) त्याच पद्धतीची शिफारस केलेली असली तरी कोणत्याही विषयात उत्तीर्ण झालेच पाहिजे ही अट काढून टाकावी असे म्हटले होते. प्रत्येक विद्यार्थ्याने काय साध्य केले आहे हे पाहून त्याला त्या विषयाचे उच्च शिक्षण घेण्याची मुभा असली पाहिजे, असे या सूचनेत अभिप्रेत होते. शिक्षण आयोगाची सूचना निश्चित पुरोगामी असल्यामुळे आपण क्रमशः त्या पद्धतीचा स्वीकार केला पाहिजे.

(४) माध्यमिक पातळीवरील अभ्यासक्रम देशाच्या सर्व भागांमध्ये किती प्रमाणामध्ये एकसारखा असला पाहिजे, याबाबतीत बरीच मतभिन्नता आढळते. त्यात संपूर्ण एकरूपता आणणे शक्यही नाही आणि आवश्यकही नाही. परंतु राज्यांनी परस्परांशी चर्चा आणि विचारविनिमय करून स्थूल मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली पाहिजेत. कारण (अ) राष्ट्रीय एकात्मतेला हानीकारक असे त्या अभ्याक्रमात काही नाही, हे पाहिलेच पाहिजे. तसेच (ब) दहावीच्या आणि बारावीच्या परीक्षेचा दर्जा सर्वत्र सारखा असावयाला हवा. त्याबाबतीत राष्ट्रीय पातळीवरून विचार झाला पाहिजे. याबाबतीत केंद्रीय शिक्षण संचालनालय आणि राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण मंडळ यांनी विचार करावयाचा आहे.

भारतासारख्या विशाल आणि विविधस्वरूपी देशाच्या सर्व भागांमध्ये शिक्षणाची एकस्वरूपी आणि साचेबंद पद्धती निर्माण करण्याचा अवास्तव प्रयत्न हा मतैक्य साधण्याच्या कार्यातील मोठा अडथळा आहे. शिक्षण एकस्वरूपी आणि साचेबंद करण्याचा प्रयत्न आपण सोडून दिला पाहिजे, असे आम्ही वर म्हटलेलेच आहे. स्थानिक परिस्थिती आणि गरजा यांच्याशी सुसंवादी ठरणारी माध्यमिक शिक्षणाची विविधात्मक, लवचिक आणि गतीशील पद्धती निर्माण करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्यासाठी 'प्रायोगिक शाळां'ची कल्पना स्वीकारून तिला चालना मिळावयास हवी. या प्रायोगिक शाळांना, काही विशिष्ट अटी वगळता, आपला अभ्यासक्रम तयार करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे.

४·३४ **तांत्रिक शिक्षण :** माध्यमिक शिक्षणामध्ये तांत्रिक शिक्षणाचा अंतर्भाव झाला पाहिजे असे आपण गेली शंभर वर्षे म्हणत आहोत. त्या दृष्टीने आतापर्यंत अनेक प्रयत्न झाल्यानंतरही, माध्यमिक शाळेतील दहा टक्के मुलेदेखील तांत्रिक शिक्षणाकडे वळत नाहीत, असे दिसून आले आहे. ही परिस्थिती अशीच चालू राहणे मुळीच हितावह नाही हे सगळ्यांना मान्य होईल. माध्यमिक शाळांमधील बहुसंख्य विद्यार्थी महाविद्यालयात किंवा विद्यापीठात जाण्याऐवजी व्यवसायांकडे वळावेत यासाठी तांत्रिक शिक्षणाबाबत नव्या दिशेने जोरदार प्रयत्न केले पाहिजेत. सध्याच्या परिस्थितीतदेखील अशा प्रयत्नांची आवश्यकता आहे. प्राथमिक शाळेत जाणाऱ्या शंभर मुलांपैकी अवघे पंचवीस जणच ते शिक्षण पूर्ण करतात अशी सध्याची परिस्थिती आहे. जेव्हा सर्वच्या सर्व म्हणजे शंभर मुले प्राथमिक शिक्षण पूर्ण करू लागतील तेव्हा त्यांच्यासाठी माध्यमिक शिक्षणामध्ये तांत्रिक शिक्षणाचे वर्ग उघडावेच लागतील. म्हणून यासंबंधामध्ये आपण काही मूलभूत प्रश्न विचारात घेतले पाहिजेत. ते असे : माध्यमिक शाळांमधील तांत्रिक अभ्याक्रमाकडे कोणते विद्यार्थी जातील आणि त्यांनी का जावे ? माध्यमिक शाळांमध्ये कोणते तांत्रिक शिक्षण दिले जाणार आहे आणि ते कसे देण्यात येईल ?



या अवघड प्रश्नांना आतापर्यंत समाधानकारक उत्तरे शोधून काढणे आपल्याला शक्य झालेले नाही.

४·३५ आपण प्रथम, प्राथमिक शिक्षण संपल्यानंतरच्या अवस्थेचा विचार करू आणि स्वतःलाच प्रश्न विचारू : प्रत्येकाने प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले असताना आणि विवाहाची वयोमर्यादा मुलींसाठी १८ नि मुलांसाठी २१ करण्यात आलेली असताना त्यांच्यापैकी कितीजण माध्यमिक शिक्षणाकडे वळतील ? माध्यमिक शाळांमधील अभ्यास अतिशय अवघड असतो अशी स्वतःची कल्पना करून घेऊन काही जण आपले शिक्षण तेथेच थांबवतील. आणखी काही जण असे निघतील की माध्यमिक शिक्षण आर्थिक दृष्ट्या परवडण्यासारखे नसल्यामुळे त्यांना प्राथमिक शिक्षण घेऊन थांबावे लागेल. ही परिस्थिती मान्य करताना, एक अपवाद ध्यानात घेतला पाहिजे. ज्या बुद्धिमान मुलांना आर्थिक परिस्थितीमुळे आपले शिक्षण चालू ठेवता येत नाही त्यांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना मदत करण्यात आली पाहिजे. माध्यमिक शिक्षण घेण्याचे जे विद्यार्थी ठरवतील त्यांच्यापैकी काहीजण असे निघतील की ते नेहमीच्या माध्यमिक शाळेत जाण्याऐवजी, निरनिराळ्या मुदतीचे तांत्रिक अभ्यासक्रम घेऊन विशिष्ट नोकरीसाठी स्वतःला पात्र करतील. म्हणून अशा विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक शिक्षणाचे पुरेसे अभ्यासक्रम उपलब्ध करून द्यावयास हवेत. तांत्रिक शिक्षणाच्या या अंगांकडे आतापर्यंत फारसे लक्ष पुरविण्यात आलेले नव्हते. म्हणून येत्या काही वर्षांमध्ये त्यावर भर दिला पाहिजे.

४·३६ उच्च माध्यमिक पातळीवर तर तांत्रिक शिक्षणाच्या विकासाचा निर्धारपूर्वक प्रयत्न करण्याची अधिकच गरज आहे. कारण निम्न माध्यमिक शिक्षण घेतलेल्यांपैकी बऱ्याचशा विद्यार्थ्यांचा, विद्यापीठप्रवेशाकडे नेणारे अभ्यासक्रम घेण्याऐवजी, स्वयंरोजगारासहित विविध रोजगारांना पात्र ठरविणाऱ्या तांत्रिक शिक्षणाच्या अभ्यासाकडे जाण्याचा कल असेल. निम्न माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्यांसाठी सध्या अशा प्रकारचे अनेक अभ्यासक्रम आहेत. ते अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांना संघटित औद्योगिक क्षेत्रांमध्ये नोकरी मिळू शकते. (तंत्रनिकेतने, आय. टी. आय. मधील बरेचसे अभ्यासक्रम, शिक्षण-प्रशिक्षण कार्यक्रम, शेतीशाळा, पत्रव्यवहार, टंकलेखन, लघुलिपी इत्यादी कार्यालयीन कामकाजाचे शिक्षण इत्यादींचा या अभ्यासक्रमात समावेश होतो.) या तांत्रिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमांच्या सोयींमध्ये वाढ होणे आवश्यक आहे. विशेषतः आरोग्य, शेती, उद्योग किंवा व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये स्वयंरोजगाराची प्रवृत्ती वाढविण्यासाठी तर असे अभ्यासक्रम अधिक संख्येमध्ये उपलब्ध व्हावयास हवेत. या अभ्यासक्रमांची रचना करताना बराच विचार करावा लागेल. स्थानिक परिस्थितीतील नोकऱ्यांची

शक्यता पाहूनच हा प्रश्न हाताळला पाहिजे. सर्व तांत्रिक अभ्यासक्रम आपापल्या परीने परिपूर्ण असावेत. याचा अर्थ असा की एखादा अभ्यासक्रम पुरा केल्यानंतर विद्यार्थ्याला पुढचे शिक्षण घ्यायची जरूर न पडता व्यवसायात पदार्पण करता यावे. मात्र त्यांच्यापैकी काही जणांना नंतर जर पुढचे शिक्षण घ्यायची इच्छा झाली तर तशी संधी आणि सोय उपलब्ध असली पाहिजे. सध्या तांत्रिक अभ्यासक्रमांसंबंधी जी अनास्था दिसते, तोही विचार करण्याजोगा आणखी एक प्रश्न आहे. त्या प्रश्नाचा विचार करताना हे लक्षात घेतले पाहिजे की अर्थकारणाचा कितपत विकास होतो यावर हे अभ्यासक्रम घेण्यासंबंधीची विद्यार्थ्यांची प्रवृत्ती अवलंबून राहणार आहे. त्याचप्रमाणे तंत्रविज्ञानाची निवड, नोकऱ्यांची उपलब्धी, कामगारांच्या निरनिराळया पातळयांवरील आणि विशेषतः श्रमजीची आणि बुद्धिजीवी यांच्या वेतनश्रेणीमधील तफावत कमी होणे इत्यादी गोष्टींशीही हा प्रश्न निगडित आहे. तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी शिक्षण घेण्याची संधी आपण किती प्रमाणात निर्माण करतो, विद्यापीठपूर्व अभ्यासक्रमांमध्ये आपण निवडीचे कितपत निकष लावतो, आणि मध्यम पातळीवरील नोकऱ्यांसाठी उच्चशिक्षितांची भरती करण्याचे केव्हा थांबवतो, यावर तांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ होणे अवलंबून राहणार आहे. उच्च माध्यमिक पातळीनंतर घेता येणाऱ्या अधिक वरच्या प्रतीच्या तांत्रिक अभ्यासक्रमांबाबतही हेच म्हणावे लागते. हे अभ्यासक्रम म्हणजे तांत्रिक शिक्षणाची तिसरी पायरी ठरेल.

४·३७ सध्या, बहुतेक तांत्रिक अभ्यासक्रम शालेय पातळीवरचे आहेत. त्यामुळे बरेचसे विद्यार्थी आपल्याला पुढे कोणते क्षेत्र निवडावयाचे आहे किंवा कोणत्या विशिष्ट नोकरीसाठी पात्र व्हावयाचे आहे याचा विचार न करता, केवळ प्रयोग म्हणूनच तांत्रिक शाळांमध्ये नाव दाखल करतात. ही पद्धती काही थोड्या जणांच्या बाबतीत आवश्यक असली तरी बऱ्याच जणांच्या बाबतीत वेळेचा अपव्यय करणारी आणि निरर्थक ठरते. म्हणून जेथे शक्य असेल तेथे आपण निर्णयोत्तर (म्हणजे आपल्याला कोणत्या क्षेत्रात प्रवेश करावयाचा आहे याचा विद्यार्थ्याने पक्का निर्णय केल्यानंतर) किंवा निवडीनंतरच्या (म्हणजे जेव्हा एखाद्या व्यक्तीची विशिष्ट नोकरीसाठी निवड झाल्यानंतर) तांत्रिक अभ्यासक्रमांची सोय केली पाहिजे. कारण अशा विद्यार्थ्यांना आपण हे शिक्षण घेतलेच पाहिजे याची जाणीव झालेली असते आणि त्यामुळे दुर्मिळ साधनसंपत्ती वाया जाण्याचे टळते. दुसरी गोष्ट अशी आहे की उद्योगव्यवसायावर आधारित तांत्रिक अभ्यासक्रमांची संख्या वाढली पाहिजे. त्यामुळे शिक्षणाचे तांत्रिकीकरण करण्याऐवजी उद्योगव्यसायांचे ' शिक्षणीकरण ' घडून येईल. अशा तऱ्हेचा कार्यक्रम कारखान्यांवर सक्तीचा करण्यासही काही हरकत नाही. त्यासाठी हवे असेल तर संबंधित



कारखान्यांना अनुदानही द्यावे. तिसरा मार्ग हा की नोकरी करीत असताना तांत्रिक शिक्षण घेण्याचे आणि नियमित उमेदवारी स्वरूपाचे अभ्यासक्रमही विकसित करावयास हवेत.

## फ. उच्च शिक्षण आणि संशोधन

**४·३८ सामर्थ्य आणि मर्यादा :** भारतातील उच्च शिक्षणाने यशापेक्षा अपयशच अधिक साध्य केले आहे. यशाचा विचार करताना, पहिली गोष्ट ध्यानात येते ती ही की या शिक्षणाने उच्च प्रतीचे प्रशिक्षण घेतलेली बरीच मनुष्यसंपत्ती निर्माण केली आहे आणि देशाची संशोधनक्षमता चांगल्या रीतीने उभारली आहे. विज्ञान आणि तंत्रशास्त्र या क्षेत्रातही आपण लक्षणीय प्रगती केली आहे. कृषी, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षणामुळे आधुनिक औद्योगिक क्षेत्राचा विकास झाला आहे, आधुनिक तंत्रविज्ञानाच्या साहाय्याने शेतीविकासाला चालना लाभली आहे आणि उच्च प्रतीच्या आधुनिक आरोग्यसेवांचे जाळे प्रस्थापित झालेले आहे. आपण विद्यापीठ शिक्षणाचाही बराच विस्तार केलेला आहे. तसेच, आपण विद्यापीठांमध्ये प्रगत अध्ययनाची काही केंद्रे आणि विद्यापीठांच्या बाहेरही उत्कृष्ट गुणवत्तेच्या प्रशिक्षण आणि संशोधन संस्था स्थापन केलेल्या आहेत. पण या जमेच्या बाजूच्या मानाने अपयशाची बाजू बरीच मोठी आहे. सर्वसाधारण स्वरूपाचे शिक्षण देणाऱ्या बहुसंख्य संलग्न महाविद्यालयांमधील अध्यापनाचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे. यापैकी बरीचशी महाविद्यालये इतकी लहान आहेत की ती शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊच शकत नाहीत. या महाविद्यालयांमधील विद्यार्थीसंख्या भरमसाट वाढलेली आहे. त्या प्रमाणामध्ये देशाचा आर्थिक विकास झालेला नसल्यामुळे, उच्च शिक्षणाने अशिक्षित अर्धबेकारांचे वा पूर्ण बेकारांचे ( हे लोक सोशिक, असंघटित आणि उपद्रवमूल्यविरहित असतात. ) शिक्षित नागरी बेकारांमध्ये ( हे लोक आपला आवाज उठवू शकतात, संघटित होतात आणि आपले उपद्रवमूल्य निर्माण करतात. ) फार मोठ्या प्रमाणामध्ये रूपांतर केलेले आहे. पूर्वी म्हटल्याप्रमाणे, या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाची आवड निर्माण होण्याऐवजी ते प्रक्षुब्ध होतात आणि त्याचा परिणाम शिक्षणाचा दर्जा आणखी घसरण्यात होतो. या महाविद्यालयांमधील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या गरजांशी सुसंवादी नसल्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा काहीच फायदा होऊ शकत नाही. कारण हे अभ्यासक्रम पुरेसे अद्ययावत करण्यात आलेले नाहीत. तसेच त्यांच्यात पुरेसे वैविध्यही नसते. महाविद्यालयातील अध्यापनपद्धतीचा भर केवळ व्याख्याने देण्यावर असतो. या विद्यार्थ्यांची परीक्षा दुसरीच यंत्रणा घेते आणि तीही अगदी पारंपरिक पद्धतीने.

अध्यापन आणि अध्ययन साहित्यही आवश्यक त्या गुणवत्तेचे नसते. बहुसंख्य विद्यार्थ्यांचे इंग्रजी कच्चे असतानाही तेच अध्यापनाचे माध्यम असल्यामुळे, अध्यापन, अध्ययन आणि शिक्षक-विद्यार्थी संवाद यांच्यात खूपच अडचणी येतात. त्यामुळे शिक्षणाचा दर्जा आणखी खालच्या पातळीवर येतो. शिवाय इंग्रजीच्या वापरामुळे सुशिक्षित लोक आणि जनता यांच्यातील अंतर वाढते.

४·३९ **निरंतरचा पेचप्रसंग :** उच्च शिक्षणामध्ये सतत पेचप्रसंगाची परिस्थिती राहणे ही या प्रश्नाची आणखी एक घातुक बाब आहे. गेल्या पंधरा-एक वर्षामध्ये, विद्यापीठ – शिक्षणाला सतत कोणत्या ना कोणत्या पेचप्रसंगाला तोंड द्यावे लागत आहे. या शिक्षणाचा द्रुतगतीने, पण कोणतेही नियोजन न करता झालेला विस्तार, अपुरा पैसा, दर्ज्यात घसरण, विद्यापीठ जीवन विस्कळीत करून टाकणारी विद्यार्थ्यांची, शिक्षकांची आणि कर्मचाऱ्यांची आंदोलने, सरकारी आणि राजकीय हस्तक्षेप, परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याबाबतचे विद्यापीठीय प्रशासनाचे दौर्बल्य, राजकीय व्यक्तींनी स्वतःच्या स्वार्थासाठी विद्यापीठाच्या आवारांमध्ये दंगली घडवून आणण्याचे तंत्र अनुसरल्यामुळे प्रशासनात आलेली अकार्यक्षमता, मूठभर बेशिस्त विद्यार्थी वा समाजद्रोही प्रवृत्ती यांनी निर्माण केलेली अशांतता अशा अनेक समस्यांनी विद्यापीठीय पातळीवरील शिक्षण बेजार झालेले आहे. आणीबाणीमुळे काही काळ शांतता निर्माण केली होती, हे खरे असले तरी हा प्रश्न सोडविण्याचा तो खराखुरा उपाय होऊ शकत नाही. शिवाय आणीबाणीमध्ये शिक्षणसंस्थांचे स्वातंत्र्य पूर्णपणे नाहीसे झाले होते. याचा अर्थ असा की शांततेसाठी भलतीच किंमत मोजावी लागली. आणीबाणी रद्द होताच, विद्यापीठांच्या आवारांमध्ये पुन्हा अशांतता आणि दंगली यांचे थैमान सुरू झालेले आहे. याचे कारण असे आहे की उच्च शिक्षणामधील पेचप्रसंगाची मूळ कारणे नाहीशी झालेली नाहीत. त्यामुळे साहजिकच उच्च शिक्षणाचा मूलभूत उद्देश हरवल्याबद्दल सर्वात अधिक चिंता वाटते. म्हणून हे शिक्षणक्षेत्र कसे सुधारेल यासंबंधीच्या विचारांना अग्रक्रम देणे क्रमप्राप्त झाले झाले आहे.

४·४० बिघडलेली परिस्थिती सावरण्यासाठी तेवढेच निर्धारी उपाय योजावे लागतात. विद्यापीठीय शिक्षणाच्या क्षेत्रातील सध्याची दुरावस्था नाहीशी करण्यासाठी खालील धाडसी उपाय योजावयास हवेत :

(१) माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयात प्रवेश करण्यापूर्वी एक वर्ष राष्ट्रीय सेवेत भाग घेतलाच पाहिजे, ही सी. डी. देशमुख समितीची शिफारस हा एक उपाय होऊ शकतो. तो आपल्या परीने निश्चितच चांगला आहे. परंतु उच्च शिक्षणक्षेत्रातील सध्याचा पेचप्रसंग सोडविण्याच्या दृष्टीने तो कितपत उपयुक्त ठरेल याची शंका वाटते. शिवाय या कार्य-



क्रमासाठी आर्थिक गुंतवणूकही बरीच करावी लागेल. तेवढा पैसा उपलब्ध होणे कठीण आहे. शिवाय या कार्यक्रमाच्या कार्यवाहीसाठी अवाढव्य संघटनात्मक व्यवस्था करावी लागेल. ती करणे जमण्यासारखे नाही. त्याऐवजी राष्ट्रीय सेवा कार्यक्रम पदवीपूर्व अभ्यासक्रमाशी निगडित करण्यात आला तर आर्थिक आणि संघटनात्मक प्रश्न सुलभतेने सोडविता येईल.

(२) सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठे एक वर्षभर बंद ठेवण्यात यावीत आणि या कालावधीत सर्व विद्यार्थ्यांनी नि शिक्षकांनी राष्ट्रीय आणि सामाजिक सेवेच्या कार्यक्रमात आणि विशेषतः शिक्षणपद्धतीच्या परिवर्तनाच्या कार्यात सहभागी व्हावे, असा एक दुसरा उपाय सुचविण्यात येतो. परंतु हा कार्यक्रम देशमुख समितीच्या सूचनेपेक्षाही कार्यवाहीत आणण्याच्या दृष्टीने अधिक अवघड आहे. त्याचप्रमाणे हेही लक्षात ठेवले पाहिजे की या कार्यक्रमाची व्यवस्थित अंमलबजावणी झाली आणि शिक्षकांचा नि विद्यार्थ्यांचा अर्थपूर्ण आणि आव्हानात्मक कार्यक्रमांमध्ये सहभाग मिळविता आला तरच तो परिणामकारक ठरू शकणार आहे. तसे झाले नाही तर या कार्यक्रमातून काहीच साध्य होणार नाही. उलट तो उद्दिष्टाला बाधक ठरण्याचाही संभव आहे.

हे सर्व लक्षात घेतल्यानंतर, शिक्षणपद्धतीमध्ये मूलगामी परिवर्तन घडवून आणणे सोपे आणि चुटकीसरशी साध्य होणे शक्य नाही, हे कळून येते. म्हणून या कार्यामध्ये आपल्याही कितीही अडचणी येणार असल्या तरी त्यासाठी सुनियोजित, सातत्यपूर्व आणि निर्धारी कार्यक्रम अंगिकारण्यावाचून गत्यंतरच उरत नाही.

४·४१ **कठोर निर्णय :** जनआंदोलन उभारल्याशिवाय प्रौढशिक्षणाचे आणि प्राथमिक शिक्षणाचे कार्यक्रम यशस्वी होणार नाहीत, हे या पूर्वीच्या विवेचनात आलेलेच आहे. माध्यमिक आणि उच्च शिक्षणाबाबतची परिस्थिती वेगळी आहे. राजकीय कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ यांनी काही कठोर निर्णय केल्याशिवाय, माध्यमिक आणि उच्च शिक्षणात लक्षणीय सुधारणा घडवून आणता येणार नाही.

(१) काही कठोर राजकीय निर्णय खालीलप्रमाणे अपेक्षित आहेत :

–उच्च शिक्षणाच्या सर्वांगीण विस्तारावर नियंत्रण; गरीब मुलांना मोफत शिक्षण मिळेल तर इतर विद्यार्थ्यांना आपल्या पालकांच्या क्षमतेनुसार शुल्क द्यावे लागेल अशा द्विस्तरीय पद्धतीची अंमलबजावणी; श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गातील मुलांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात मिळणाऱ्या अनुदानात कपात आणि त्याचवेळी गरीब मुलांना देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ;

–निवडक प्रवेशपद्धतीचा अवलंब; मात्र दुर्बळ गटातील मुलांसाठी काही जागा राखून ठेवण्याची तरतूद ;

—नोकरी आणि पदवी यांची फारकत करण्याचा क्रमशः प्रयत्न;

—शिस्तपालन; आणि

—विद्यापीठीय स्वायत्ततेचे जतन आणि विद्यापीठांना राजकीय हस्तक्षेपाविना राजकीय नेतृत्वाचा पाठिंबा.

(२) भाषाविषयक राष्ट्रीय धोरणाची अंमलबजावणी. हा निर्णय राजकीय तसाच शैक्षणिक आहे म्हणून राजकीय कार्यकर्ते आणि शिक्षणतज्ज्ञ यांनी परस्परांच्या विचारविनिमयातून हा निर्णय करावयास हवा.

(३) याशिवाय असे अनेक निर्णय आहेत की जे शिक्षक आणि विद्यार्थी यांनीच मुख्यतः कार्यवाहीत आणावयाचे आहेत. त्यात खालील बाबींचा समावेश होतो :

—शैक्षणिक स्वातंत्र्याचे जतन. हे कार्य करताना, समाजावर टीका करण्याची निर्भयताही हवी.

—प्रशासनात प्रामाणिकपणा आणि कार्यक्षमता राखून विद्यापीठीय स्वायत्ततेचे संपादन आणि सतत संरक्षण. त्यासाठी शिक्षणाचा दर्जा चांगला राखणे आणि स्थानिक परिसर नि देश यांना उपयुक्त ठरणे ही खबरदारीही घ्यावी लागेल.

--स्वायत्ततेचे वितरण. विद्यापीठांनी आपल्या विभागांना आणि संलग्न महाविद्यालयांना स्वायत्तता दिली पाहिजे. तसेच विभागांनी आणि महाविद्यालयांनी आपल्या शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना तीत सहभागी करून घेतले पाहिजे.

— विद्यापीठाच्या संपूर्ण कार्यामध्ये विद्यार्थ्यांना घनिष्ठ रीतीने निगडित करून घ्यावयास हवे.

— शिक्षणाचा आशय, अध्यापनाची पद्धती आणि मूल्यमापन यात मूलग्राही बदल घडून आणले पाहिजेत; आणि

— शैक्षणिक जीवनामध्ये सातत्यपूर्ण आणि समर्पित वृत्तीने परिश्रम करायला प्रोत्साहन देणारे वातावरण निर्माण करावयास हवे. खेदाची गोष्ट ही आहे की या प्रश्नाशी संबंधित अशा बाबींवर निर्णय करण्यात येत नाहीत आणि वेगवेगळे गट एकमेकांच्या कार्याला छेद जाईल अशा पद्धतीने वागत असतात. माध्यमिक आणि उच्च शिक्षणाला भेडसावणाऱ्या गुंतागुंतीच्या आणि कठीण समस्या या पद्धतीने सुटणे अशक्य आहे. शैक्षणिक प्रक्रियेत सहभागी झालेल्या सर्व यंत्रणांनी म्हणजे केंद्रशासन, राज्यशासने, शिक्षक, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक यांनी आपापली जबाबदारी कर्तव्यभावनेने आणि जबाबदारीने पार पाडली तरच माध्यमिक आणि उच्च शिक्षणाबाबत प्रगती होऊ शकेल.

४·४२ **पदवीपूर्व अवस्था :** हे प्रारंभिक निरीक्षण केल्यानंतर, उच्च शिक्षणाच्या सुधारणेसंबंधीच्या काही ठळक विशेषांकडे लक्ष वेधण्याचे आम्ही



ठरविले आहे :

(१) उच्च शिक्षणामध्ये पदवीपूर्व अवस्था अत्यंत महत्त्वाची आहे. परंतु सध्या नेमक्या या महत्त्वाच्या अवस्थेकडेच दुर्लक्ष होत आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. म्हणून पदवीपूर्व अवस्थेकडे तातडीने लक्ष पुरविले गेले पाहिजे. महाविद्यालयांतील चांगल्या शिक्षकांनी या वर्गांना शिकवून शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. पदवीपूर्व वर्गातील विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या चांगल्या अध्यापकांना चांगल्या संशोधकांइतका दर्जा मिळाला पाहिजे.

(२) पदवीपूर्व शिक्षण हे सामान्यतः महाविद्यालयांत दिले जाते. म्हणून महाविद्यालयांच्या विकासासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने जे कार्यक्रम आखले आहेत ते यापुढेही चालू ठेवावेत; इतकेच नव्हे तर त्यात वाढ केली जावी. मात्र अनुदानाच्या सध्याच्या पद्धतीमध्ये (महाविद्यालयांचा बराचसा खर्च या अनुदानातूनच भागविला जात असतो.) मूलभूत बदल केल्याशिवाय प्रश्न सुटणार नाही. महाविद्यालयांना द्यावयाच्या अनुदानांचे व्यवहार पाहण्यासाठी आणि शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता अनुदानपद्धतीचा उपयोग होत आहे यावर लक्ष ठेवण्यासाठी राज्यपातळीवर खास यंत्रणा उभारण्याची गरज आहे.

(३) सध्या पदवीपूर्व अभ्यासक्रमाचा सारा भर त्या त्या विषयाचा तात्त्विक भाग शिकविण्यावर आहे. सामाजिक परिवर्तनासाठी आणि राष्ट्रीय विकासासाठी अनुकूल ठरतील अशा वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये बिंबविण्यासाठी अभ्यासक्रमाचा उपयोग होऊ शकतो, ही गोष्ट आपण विसरून गेलेलो आहोत. विद्यार्थ्यांच्या विविध गरजा आणि नव्या समाजव्यवस्थेची निर्मिती या दोन गोष्टी डोळ्यांसमोर ठेवून महाविद्यालयीन अभ्यासक्रमांची पुनर्रचना केली पाहिजे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयीन विद्यार्थ्यासाठी पुढील चार प्रकारचे अभ्यासक्रम अनिवार्य केले पाहिजेत : (१) प्रारंभिक अभ्यासक्रम—या अभ्यासक्रमात भारताच्या आणि इतर देशांच्या स्वातंत्र्यसंग्रामांचा इतिहास, विकासाच्या संकल्पना आणि प्रक्रिया, भारतापुढील प्रश्न आणि ते सोडविण्याचे उपाय, विकासामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे स्थान, गांधीवादी विचार आणि विकासाचे पर्यायी मार्ग यांचा समावेश असावा; (२) सर्वंकष अभ्यासक्रम—या पातळीवर विद्यार्थ्याला त्याने निवडलेल्या विद्याशाखेतील विषयांची स्थूल ओळख व्हावी आणि त्यापैकी एक किंवा अधिक विषयांचा त्याने सखोल अभ्यास करावा, असे अपेक्षित आहे; (३) काही उपयोजित अभ्यास/प्रकल्प/प्रत्यक्ष कार्य—हा अभ्यासक्रम विद्यार्थ्याच्या एकूण शिक्षणाचा अविभाज्य घटक व्हावयास हवा आणि तो त्याने शेवटच्या वर्षात पार पाडावा; आणि (४) महाविद्यालयीन शिक्षणाच्या पहिल्या दोन वर्षांमध्ये राष्ट्रीय किंवा सामाजिक सेवेच्या कार्यक्रमामध्ये

विद्यार्थ्यांने सहभागी व्हावयास हवे. या सर्व घटकांचा महाविद्यालयीन अभ्यासक्रमात सुविहित समन्वय साधता आला तर विद्यार्थ्यांना अधिक व्यापक आणि समृद्ध शिक्षण मिळेल. तसेच सध्या विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रमांमुळे ज्या अनुचित प्रवृत्ती निर्माण होतात त्यांना आळा बसून लोकांची सेवा करण्याची प्रवृत्ती विद्यार्थ्यांच्या मनात रुजेल.

(४) महाविद्यालयीन शिक्षणाची पुनर्रचना आणि सुधारणा करण्याचा कार्यक्रम एकसमयावच्छेदेकरून हाती घेण्यात आला तर अभ्यासक्रमातील सुधारणेचे अपेक्षित परिणाम दिसून येतील. त्यासाठी सघन आणि सातत्यपूर्ण कार्यक्रम आखणे आवश्यक ठरते.

(५) अध्यापनाच्या आणि मूल्यमापनाच्या पद्धतीतही बरेच मूलगामी बदल घडवून आणण्याची गरज आहे. सध्याची पद्धत अध्यापकांनी व्याख्यान देण्याभोवतीच मुख्यत्वे केंद्रित झालेली आहे. व्याख्यान देणे वा ऐकणे हा अध्यापनाचा वा अध्ययनाचा एक भाग होऊ शकतो हे ओळखून विद्यार्थ्यांनी स्वतः अध्ययन करावे किंवा परिसंवाद आणि चर्चा यांच्याद्वारे विचारविनिमय व्हावा अशा पद्धतीने अध्यापनाची रचना व्हावयास हवी. त्यासाठी संशोधन किंवा संशोधनात्मक प्रवृत्ती आणि समूहभावना यांना चालना मिळाली पाहिजे.

४·४३ **पदव्युत्तर शिक्षण आणि संशोधन :** पदव्युत्तर शिक्षणामध्ये गुणवत्तेला सर्वाधिक महत्त्व प्राप्त होते. तसे पाहिले तर, संपूर्ण शिक्षणपद्धतीचा आणि जवळजवळ सर्व सामाजिक यंत्रणांचा दर्जा पदव्युत्तर शिक्षणाच्या गुणवत्तेवरच अवलंबून असतो. कारण पदव्युत्तर शिक्षण घेतलेले विद्यार्थीच नंतर विद्यापीठांमध्ये अध्यापकांचे काम करतात आणि तेच माध्यमिक आणि सामाजिक शाळांमधील शिक्षकांचेही अध्यापन करीत असतात. जीवनाच्या नानाविध क्षेत्रांमधील नेतृत्व याच लोकांकडे असते. म्हणून, पदव्युत्तर शिक्षण फक्त संशोधन संस्था, विद्यापीठांचे विभाग, विद्यापीठांची पदव्युत्तर अध्ययन केंद्रे आणि आवश्यक त्या सुविधा उपलब्ध असलेली महाविद्यालये येथेच देण्यात यावे. तात्त्विक आणि उपयोजित अशा दोन्ही आघाड्यांवर विस्तृत प्रमाणामध्ये संशोधन व्हावयास हवे. तात्त्विक संशोधनामुळे आत्मनिर्भरता आणि नैसर्गिक नि सामाजिक घटनांमागील निश्चित कार्यकारणभावाचे ज्ञान यांचा लाभ होतो. शिवाय तात्त्विक संशोधन झाले नाही तर उपयोजित संशोधन शक्य होणार नाही आणि शक्य झाले तरी त्याला काहीही अर्थ उरणार नाही. तात्त्विक संशोधनाइतकेच उपयोजित संशोधन व्हावयास पाहिजे. कारण ते दैनंदिन प्रश्नांसंबंधी धोरण निश्चित करताना आणि त्या प्रश्नांची सोडवणूक करताना उपयोगी पडते. पदव्युत्तर अध्यापन आणि संशोधन यांची जास्तीत जास्त एकात्मता व्हावी यासाठी विद्यापीठे आणि संशोधनसंस्था



यांच्यात घनिष्ठ सहकार्य निर्माण झाले पाहिजे. आतापर्यंत विद्यापीठे आणि संशोधन संस्था यांच्या कार्यासंबंधी आणि परस्पर–संबंधांबाबत चुकीच्या कल्पना बाळगण्यात आलेल्या आहेत. विद्यापीठे केवळ पदव्युत्तर शिक्षण देतात तर संशोधन करणे एवढेच आपले काम आहे, असे संशोधन संस्था मानतात. त्यामुळे शास्त्रज्ञ, अभियंते आणि संशोधन-सुविधा यांचा आढळ केवळ संशोधन संस्थांमध्येच होतो. परंतु या संशोधन संस्था शिक्षणपद्धतीला आणि तरुण शास्त्रज्ञांच्या प्रशिक्षणाला फारसा हातभार लावत नाहीत. या उलट, काही थोडे अपवाद वगळता, बऱ्याच विद्यापीठांपाशी संशोधन-प्रकल्प हाती घेण्याइतकी क्षमताच असत नाही. त्यामुळे त्या विद्यापीठांतील अध्यापनाचा दर्जा बेताचाच राहतो. त्याचप्रमाणे या विद्यापीठांमध्ये जे विशेषज्ञ शिक्षण घेत असतात त्यांना समस्या सोडविण्याची क्षमताही विद्यापीठांना पुरविता येत नाही. म्हणून शिक्षण, संशोधन आणि विकास यांच्यात सध्या जी दूरता आढळून येते ती ताबडतोब नाहीशी करायला हवी. त्यासाठी विद्यापीठे, संशोधन संस्था, उद्योगधंदे, राज्यकर्ते आणि जनता यांच्यात घनिष्ठ संबंध प्रस्थापित होणे आवश्यक आहे. त्यामुळे केवळ संशोधनाचीच गुणवत्ता वाढेल असे नव्हे, तर संशोधनाचा अधिक चांगला उपयोग करून घेता येईल.

४·३४ **विविधता :** शैक्षणिक संरचनेचे आणि तिच्या संबंधाचे जे नमुने आतापर्यंत आपण निर्माण केले आहेत त्यात विविधता येणे ही एक मूलभूत सुधारणा आवश्यक आहे. आपण पाश्चात्यांची विद्यापीठ शिक्षणाची संरचना स्वीकारली आहे. विद्यापीठांमध्ये अध्ययनप्रेमी विद्यार्थी आणि कुशल शिक्षक दिसत असले तरी ते समाजापासून अलग राहिले आहेत. कारण या विद्यापीठांमध्ये इंग्रजीच्या माध्यमातून पाश्चात्य विज्ञान आणि वाङ्मय यांचे अध्यापन–अध्ययन होत असते. म्हणून या शैक्षणिक संरचनेची उपयुक्तता केव्हाच संपून गेलेली आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे आणि त्यांच्यातील अध्ययनाची प्रेरणा कमी झालेली असल्यामुळे, विद्यापीठांचा प्रचलित सामाजिक वास्तवाशी संबंधच उरलेला नाही. विद्यार्थ्यांची संख्या जसजशी वाढत गेली तसतशी कमी पात्रतेच्या आणि अध्यापनाबाबत आस्था नसलेल्या शिक्षकांची भरती होत गेली. समाजासंबंधी अलिप्त राहण्याच्या वृत्तीमुळे विद्यापीठांना 'हस्तीदंती मनोरे' असे संबोधण्यात येते. परंतु आता त्यांचे ते स्वरूपही फारसे राहिलेले नाही. कारण विद्यापीठे आपल्या भोवतालच्या समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी फारसे कार्य करीत नसली तरी सामाजिक तणावांचे आणि संघर्षाचे हादरे त्यांनाही सहन करावे लागत आहेत. पाश्चिमात्त्य ज्ञानावर आणि इंग्रजीचा माध्यम म्हणून उपयोग करण्यावर अवास्तव भर न देणारी काही विद्यापीठे यापुढील काळातही आवश्यक ठरणार असली

तरी उच्च शिक्षणाचा सारा मक्ता केवळ विद्यापीठांकडे असता कामा नये. विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना आणि विविध स्तरांतील युवक उच्च शिक्षण घेऊ लागलेले असताना उच्च शिक्षणाच्या संस्थात्मक संरचनेमध्ये विविधता आणणे अपरिहार्य ठरले आहे. सध्याच्या बदलत्या परिस्थितीशी सुसंवादी ठरतील असे नवे आकृतिबंध शोधून काढायला हवेत. विद्यापीठे ही उच्च शिक्षणाची एक अत्यावश्यक संरचना असली तरी हे शिक्षण अन्यत्र उपलब्ध होईल एवढा व्यापक पाया देण्याच्या दृष्टीने आपली वाटचाल सुरू झाली पाहिजे.

४·४५ सध्या विद्यापीठे केवळ अध्यापन आणि संशोधन एवढ्यावरच आपले सारे लक्ष केंद्रित करतात. आपली तेवढीच जबाबदारी आहे, असे ती मानतात. विस्तार हे आपले तिसरे कार्य आहे हे ध्यानात घेऊन प्रत्येक विद्यापीठाने ते हाती घेतले पाहिजे; इतकेच नव्हे तर अध्यापन आणि संशोधन यांच्याइतका दर्जा विस्तारकार्याला दिला पाहिजे. विस्ताराची जबाबदारी महाविद्यालयांनीही उचलली पाहिजे. त्यासाठी त्यांनी या कार्याचा आपल्या अभ्यासक्रमात समावेश करावयास हवा.

४·४६ नवे अभ्यासक्रम सुरू करण्याचीही गरज आहे. नवी आणि आंतर-विद्याशाखीय क्षेत्रे यांचा त्यात अंतर्भाव केला पाहिजे. विद्यार्थ्याला आपल्या आवडीचा अभ्यासक्रम निवडता यावा यासाठी अभ्यासक्रमात जितकी विविधता येईल तितके चांगले. सत्रपद्धती अमलात आणल्याने विद्यार्थ्यांना ही सोय उपलब्ध होऊ शकेल.

४·४७ **विकेंद्रीकरण आणि स्वायत्तता :** शिक्षणाची गुणवत्ता वाढवायची असेल तर शैक्षणिक अधिकाराची आणि बहिस्थ परीक्षांची सध्याची केंद्रीभूत पद्धती सोडून दिली पाहिजे. सध्याच्या केंद्रीभूत पद्धतीचे कोणत्याही तऱ्हेने समर्थन करता येत नाही. शिवाय कारभारामध्ये दिरंगाई, जबाबदारी स्वीकारण्याबाबत टाळाटाळ, बदलाला विरोध, अकार्यक्षमतेवर पांघरुण आणि भ्रष्टाचाराला वाव हे दोष या पद्धतीत आहेत. तसेच या पद्धतीमुळे खऱ्या वा खोट्या सबबींना वाव मिळतो. त्यामुळे अपात्र शिक्षकांना आणि शिक्षणसंस्थांना आपल्यावरील जबाबदारी पूर्णतया झटकून देता येते. तसेच सर्जनशील, कल्पक शिक्षकांचे आणि विद्यार्थ्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते. म्हणून शैक्षणिक अधिकाराचे विकेंद्रीकरण करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाकडून विद्यापीठीय विभागांकडे आणि विद्यापीठांकडून महाविद्यालयांकडे स्वायत्तता संक्रमित होण्याची गरज आहे. दिरंगाई टळावी, साचेबंद एकरूपतेवरचा भर कमी व्हावा, शिक्षण-पद्धती लवचिक आणि गतिशील व्हावी आणि नवनवे उपक्रम आणि सुधारणा अंगिकारता याव्यात या दृष्टीने विद्यापीठांची सध्याची केंद्रीभूत आणि अधिकाऱ्यांच्या



वर्चस्वाखाली असलेली संरचना आमूलाग्र बदलली पाहिजे.

४·४८ या संदर्भामध्ये स्वायत्त महाविद्यालयांच्या संकल्पनेला विशेष महत्त्व प्राप्त होते. आपण देत असलेले शिक्षण, आपल्या अध्यापनाचा आशय आणि दर्जा, तसेच विद्यार्थ्यांसाठी आपण अवलंबत असलेली प्रवेशपद्धती आणि मूल्य-मापनपद्धती याबद्दलची सर्व जबाबदारी महाविद्यालयांनी आणि शिक्षकांनी पत्करली पाहिजे, हे स्वायत्ततेमध्ये अभिप्रेत आहे. ही मूलभूत अट पुरी केल्या-शिवाय, शिक्षणाच्या 'संदर्भा'चा प्रश्न समाधानकारक रीतीने सोडविता येणार नाही. तसेच अभ्यासक्रमात विविधता आणून तो स्थानिक गरजांशी आणि परि-स्थितीशी सुसंवादीही करता येणार नाही. मुख्य म्हणजे या मूलभूत बदलाशिवाय अभ्यासक्रम प्रत्येक विद्यार्थ्याच्या गरजांची दखल घेऊ शकणार नाही. स्वायत्ते-मुळेच उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना सत्य आणि परिपूर्णता यांच्या संपादनामध्ये परस्परपूरक घटक म्हणून कार्य करणारे शिक्षक आणि विद्यार्थी यांचे समूह असे रूप प्राप्त होऊ शकेल. अधिकाधिक महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान मंडळ आणि विद्यापीठे स्वायत्तता प्रदान करतील, अशी आशा आहे. कारण स्वायत्तता हे परिपूर्णतेचे पारितोषिक नसून ती अस्तित्वाचीच किमान अट आहे.

## ग. भाषाविषयक राष्ट्रीय धोरण

४·४९ उच्च शिक्षणातील गुणवत्तेचा विचार करीत असताना, शिक्षणाच्या माध्यमाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तसेच भाषाविषयक राष्ट्रीय धोरण आणि भारतीय भाषांचा विकास हे प्रश्नही शैक्षणिक गुणवत्तेशी निगडित आहेत. ब्रिटिश प्रशासकांनी माध्यमिक आणि उच्च शिक्षणासाठी इंग्रजी हे माध्यम स्वीकारले. हे माध्यम स्वीकारल्यामुळे शिक्षणाचा प्रसार होण्यात व्यत्यय आला हे खरे असले तरीदेखील ब्रिटिश राज्यकर्त्यांनी इंग्रजी हीच राज्यकारभाराची, न्यायालयांची, वरिष्ठ पातळीवरच्या उद्योग-व्यापाराची आणि प्रमुख राष्ट्रीय वृत्त-पत्रांची भाषा केल्यामुळे त्यावेळच्या परिस्थितीत हे धोरण धकून जाऊ शकले. माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजीऐवजी प्रादेशिक भाषा किंवा मातृभाषा शिक्षणाचे माध्यम करण्यासाठी आपल्याला पंचवीस वर्षे (१९२१–१९४७) खर्च करावी लागली. हे संक्रमणही टप्प्याटप्प्याने पार पडले. सुरुवातीला विद्यार्थ्यांना उत्तर-पत्रिका आपापल्या भाषेत लिहायची परवानगी मिळाली. नंतर सामाजिक शास्त्रे प्रादेशिक भाषेतून शिकविण्यात येऊ लागली आणि अखेरीस नैसर्गिक शास्त्रे नि तांत्रिक विषयही प्रादेशिक भाषेतून शिकवायला प्रारंभ झाला. या प्रक्रियेत प्रादेशिक भाषांमधील पाठ्यपुस्तके प्रथम निघाली की प्रथम प्रादेशिक भाषांमधून अध्यापन सुरू झाले, हे कधीच कळू शकले नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही महाविद्यालयीन

शिक्षणामधील माध्यमाचा प्रश्न पूर्वीसारखाच संथ गतीने हाताळण्यात येत आहे आणि हा मंद वेग कायम राहिला तर संपूर्ण महाविद्यालयीन शिक्षण प्रादेशिक भाषेमधून किंवा मातृभाषेतून मिळायला आणखी वीस-तीस वर्षे तरी सहज जावी लागतील. शिक्षणाचे माध्यम बदलताना बरेच बौद्धिक परिश्रम करावे लागत असल्यामुळे हा एवढा कालावधी घालवावा लागला. त्याहीपेक्षा दुर्दैवाची बाब ही आहे की अजूनही उद्योगधंद्यात, व्यापारउदिमात, वरिष्ठ न्यायालयात, राष्ट्रीय वृत्तपत्रात आणि सरकारी कामकाजाच्या उच्च पातळीवर इंग्रजीचाच वापर होत असल्यामुळे चांगली नोकरी मिळविण्यासाठी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळणे आवश्यक मानले जाते. त्यामुळे विद्यापीठीय पातळीवरील शिक्षणात इंग्रजीऐवजी प्रादेशिक भाषांचा माध्यम म्हणून वापर करणे अत्यंत कठीण झालेले आहे. इंग्रजीचा वरचष्मा अजूनही कायम असण्यामागे आणखीही एक कारण आहे. चांगली नोकरी मिळविण्यासाठी इंग्रजी येणे आवश्यक झालेले असल्यामुळे, श्रीमंत आणि सुखवस्तू वर्गातील पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शिशुशाळांमध्ये घालू लागले. साहजिकच गेल्या तीस वर्षांमध्ये इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या नागरी भागात भरमसाट वाढली. आता ही लाट ग्रामीण भागातही गेली आहे. प्रादेशिक भाषेतून किंवा मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळांना कनिष्ठ लेखण्यात येत असून त्या ' इतर लोकांच्या मुलांसाठी ' ठीक आहेत असे म्हटले जाते. या भाषिक भेदामुळे निर्माण झालेल्या सामाजिक विघटनाचा परिणाम असा होत आहे की सर्वसामान्य जनता आणि जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील वरिष्ठ पदांवर विराजमान झालेल्या प्रतिष्ठित व्यक्ती यांच्यातील अंतर कमी होण्याऐवजी वाढत चालले आहे.

४·५० म्हणून सर्वसामान्य लोकांच्या हिताचा विचार करून भाषाविषयक धोरण आखले पाहिजे आणि त्याची निर्धारपूर्वक अंमलबजावणी करायला हवी. भाषाविषयक धोरणाचे खालील विशेष असावेत :

(१) सर्व प्राथमिक शिक्षण मुलाच्या मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मातृभाषेला किंवा बोलीला लिपी नसेल तर प्रारंभी त्याला त्याच्या मायबोलीतून शिक्षण द्यावे आणि नंतर प्रादेशिक भाषेतून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी.

(२) माध्यमिक शाळांमध्ये त्रिभाषा सूत्र स्वीकारण्यात यावे. अहिंदी-भाषिक प्रदेशात मातृभाषा, इंग्रजी आणि हिंदी यांचा अवलंब करण्यात यावा. हिंदी-भाषिक प्रदेशाबाबत सरकारचे धोरण असे आहे की मातृभाषा (हिंदी), इंग्रजी आणि हिंदीव्यतिरिक्त आणखी एक भारतीय भाषा ( ती सामान्यतः दक्षिणेकडील असावी ) यांचा वापर व्हावयास हवा. यापैकी प्रत्येक भाषेच्या अध्य-



यनाचा कालावधी किंवा प्राप्त करायचे प्रावीण्य याबाबत बराच लवचिकपणा ठेवण्यात आलेला आहे. या त्रिभाषा सूत्राला चांगला पर्याय शोधून काढणे अशक्य असल्यामुळे या सूत्राच्या कार्यवाहीतील अडचणी ध्यानात घेऊनही त्याची कार्यवाही करायला हवी. त्यासंबंधी हिंदीभाषिक प्रदेशांवर विशेष जबाबदारी येऊन पडते.

(३) महाविद्यालयीन शिक्षणामध्ये इंग्रजीऐवजी प्रादेशिक भाषांचा वापर करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. तिची गती वाढविली पाहिजे. या शिक्षणाचा दर्जा वाढावा म्हणून प्रादेशिक भाषांमध्ये पाठ्यपुस्तके आणि अन्य अध्यापन/अध्ययन साहित्य यांच्या निर्मितीवर भर द्यावयास हवा. हे आव्हान अध्यापकांनी स्वीकारले पाहिजे.

(४) पदव्युत्तर शिक्षणात आणि संशोधनात स्वतः अध्ययन करण्यावर विशेष भर असल्यामुळे तेथे शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न फारसा उपस्थित होत नाही. मात्र संबंधित विषयासंबंधीचे जगात जे वाढते ज्ञान उपलब्ध होत आहे ते स्वतः जाणून घ्यायची सुविधा विद्यार्थ्याला प्राप्त झाली नाही तर पदव्युत्तर शिक्षणाला आणि संशोधनाला काहीच अर्थ उरणार नाही.

(५) भारतीय भाषा हा भारतीय जनतेचा आणि भूमीचा ठेवा असल्यामुळे त्यांचा विकास करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आला पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारांनी शिक्षणावर खर्च करताना या कार्यक्रमाला सर्वात अधिक प्राधान्य दिले पाहिजे.

(६) केंद्र सरकारच्या कामकाजाची भाषा म्हणून आणि सर्व देशाकरिता दुवाभाषा म्हणून हिंदीचा वापर करावा असे ठरले आहे. त्यादृष्टीने हिंदीचा स्वीकार आणि वापर याबाबतीत बरीच प्रगती झालेली आहे. तरीही इंग्रजी आणि हिंदी या दोन्ही भाषांचा वापर बराच काळपर्यंत करावा लागणार आहे. कारण कोणत्याही गटावर वा राज्यावर हिंदी भाषा लादायची नाही, हे सरकारी धोरण पूर्णपणे रास्त आहे. हिंदीचा प्रसार धीराने आणि सामंजस्याने करण्याची खबरदारी हिंदीभाषिकांनी घेतली पाहिजे.

(७) पूर्वी देशाच्या भाषिक व्यवहारामध्ये इंग्रजीला जो महाराणीचा दर्जा होता तो आता मुळीच मिळणार नाही हे खरे असले तरी एक आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून आपल्या जीवनामध्ये तिला महत्त्वाचे स्थान राहणार आहे, हे नाकारून चालणार नाही. कारण इंग्रजीमुळे जगातील वाढत्या ज्ञानाशी आपला संपर्क राहणार आहे. म्हणून आपल्या समाजजीवनामध्ये आणि शिक्षणामध्ये इंग्रजीचे स्थान काय राहील याचा फेरविचार करायला हवा. पूर्वी इंग्रजी येणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे आणि चांगली नोकरी मिळविण्याचे साधन झाले होते. शिक्षणा-

मध्ये इंग्रजीचा वरचष्मा असल्यामुळे बहुसंख्य लोकांना चांगले माध्यमिक आणि उच्च शिक्षण घेता आले नाही. यापुढे ही परिस्थिती राहता कामा नये. प्रतिष्ठा आणि नोकऱ्या यांच्याशी इंग्रजीचा संबंध ठेवून चालणार नाही. जागतिक ज्ञान संपादन करण्याचे माध्यम एवढेच इंग्रजीचे स्थान राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानात भर घालण्यासाठी एखाद्या व्यक्तीला आपण जितके इंग्रजी शिकावे असे वाटत असेल तितके शिकायला पूर्ण मुभा देत असतानाच इंग्रजी जाणणारे आणि इंग्रजी न येणारे यांच्यात कोणताही पक्षपात केला जाता कामा नये.

(८) प्रादेशिक भाषा शिक्षणाचे माध्यम केल्यामुळे इंग्रजी शिक्षणाची आवश्यकता कमी होणार नसून वाढणार आहे हे ध्यानात घ्यावयास हवे.

(९) सध्या शाळांमध्ये आणि शाळांबाहेर इंग्रजी शिकविण्याबाबत जे धोरण अवलंबण्यात येत आहे त्यात बराच बदल करायला हवा. प्राथमिक शाळेत इंग्रजी शिकविण्याची काहीच गरज नाही. परंतु माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजी शिकविली गेली पाहिजे. मात्र माध्यमिक शिक्षण पूर्ण करताना, इंग्रजीमध्ये उत्तीर्ण झालेच पाहिजे, अशी अट नसावी. अर्थात महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी इंग्रजी भाषा उत्तीर्ण होणे आवश्यक मानले जावे. मात्र महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षाच्या अखेरीपर्यंत ही भाषापरीक्षा उत्तीर्ण होण्याची सवलत असावी. या चाचणीला बसता यावे याद्दष्टीने विद्यार्थ्यांची पुरेशी तयारी करून घेण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने इंग्रजीचे खास सघन अभ्यासक्रम सुरू केले पाहिजेत. पदव्युत्तर शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला इंग्रजीचे समाधानकारक ज्ञान असले पाहिजे, असे अपेक्षित आहे. त्या विद्यार्थ्याचा विषय लक्षात घेऊन, त्याला दुसरी एखादी परकीय भाषाही येणे इष्ट ठरेल. याशिवाय प्रौढांसाठी आणि इतरांसाठीही अनौपचारिक पद्धतीने इंग्रजी शिकविण्याची पुरेशी सोय केली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या वा विद्यार्थी-गटाच्या गरजेनुसार त्याला आवश्यक वाटेल तेव्हा शिक्षणसंस्थेमध्ये वा बाहेर इंग्रजी शिकण्याची सोय असायला हवी, हा नव्या धोरणाचा गाभा राहील.

(१०) इंग्रजी व्यतिरिक्तच्या इतर परकीय भाषांच्या अध्ययनालाही प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यासाठी योग्य त्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

४·५१ येथे एक गोष्ट विशेषत्वाने लक्षात घेतली पाहिजे. सध्या भाषाविषयक प्रश्न अतिशय स्फोटक झालेला आहे. म्हणून हा प्रश्न हाताळताना बरीच काळजी घेतली पाहिजे. कोणाच्याही भावना दुखविल्या जाणार नाहीत, अशी दक्षता घ्यावयास हवी. त्या दृष्टीने शिक्षणपद्धतीमध्ये संथ गतीने आणि शांतपणाने प्रयत्न करीत असतानाच, सर्व स्पर्धात्मक परीक्षा प्रादेशिक भाषांमध्ये घेण्यासारख्या



प्रशासकीय सुधारणा अमलात आणून आपल्याला हा राष्ट्रीय प्रश्न सोडविता येणे शक्य आहे. कारण सध्या हा प्रश्न अदूरदृष्टीच्या आणि घाईघाईने केलेल्या राजकीय निर्णयांमुळे कमालीच्या गुंतागुंतीचा आणि वातावरण प्रक्षुब्ध करून टाकणारा झालेला आहे.

### ह. प्रशासन आणि आर्थिक साहाय्य

४·५२ वर निर्देशित केलेल्या शैक्षणिक पुनर्रचनेच्या प्रमुख कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्यासाठी शैक्षणिक प्रशासनात बदल होणे आवश्यक आहे. तसेच शिक्षणावर करावयाच्या खर्चाबाबतही नवा दृष्टिकोन अंगिकारावयास हवा.

४·५३ **नेतृत्व** : शैक्षणिक परिवर्तनाच्या या कार्यक्रमासाठी नेतृत्व कोण पुरविल ? कारण या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गतिशील नेतृत्व आवश्यक आहे, याविषयी कोणीच दुमत व्यक्त करीत नाही. मात्र या नेतृत्वाच्या संकल्पनेबाबत आणि अपेक्षित गुणवत्तेबाबत मतभेद आढळून येतात.

४·५४ सध्याची शिक्षणपद्धती अपेक्षित नेतृत्व पुरवू शकेल काय ?

(१) शिक्षण खात्याचे सचिव, शिक्षण संचालक, शाळा तपासनीस आणि शिक्षणखात्यातील इतर अधिकारी यांच्याकडून शैक्षणिक परिवर्तनाच्या कार्यक्रमाला नेतृत्व लाभेल, असा एक पारंपरिक दृष्टिकोन आढळतो. भारतीय प्रशासकीय सेवेप्रमाणे (आय. ए. एस.) भारतीय शिक्षण सेवा स्थापन करावी आणि राज्यांच्या शिक्षण खात्यांमध्ये या सेवेतील उमेदवारांची भरती करावी, अशी दुसरीही एक पारंपरिक सूचना पुढे आलेली आहे. या सूचनेमुळे जास्त पगाराच्या आणि अधिक प्रशिक्षित अधिकाऱ्यांची संख्या वाढणार आहे आणि सेवान्तर्गत प्रशिक्षणावर भर द्यावा लागणार आहे. परिवर्तनाच्या कार्यामध्ये सरकारी अधिकारी उपयुक्त भूमिका बजावू शकतात हे कोणीच अमान्य करणार नाही. परंतु त्यांच्या मर्यादाही ओळखल्या पाहिजेत. मुख्य म्हणजे येथे उल्लेखिलेला मूलगामी कार्यक्रम केवळ सरकारी अधिकारी कार्यवाहीत आणू शकणार नाहीत.

(२) विद्यापीठांनी नेतृत्व करावे असाही आणखी एक पारंपरिक दृष्टिकोन आहे. या सूचनेमध्ये असे अभिप्रेत आहे की विद्यापीठातील शिक्षण विभागाने प्रमुख भूमिका घेऊन शिक्षक-प्रशिक्षण संस्थांच्याः द्वारा प्रयोग, नवनिर्मिती, मूल्यमापन आणि पुनर्रचना या कार्यक्रमांना चालना द्यावी. शैक्षणिक विकासाच्या आणि विशेषतः शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने विद्यापीठांचे शिक्षण विभाग आणि प्रशिक्षण संस्था, तात्त्विक आणि प्रात्यक्षिक अशा दोन्ही पातळ्यांवर बरेच कार्य करू शकतील. परंतु आपल्या देशातील विद्यापीठांचे शिक्षण विभाग मुख्यतः माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या आणि शिक्षक-प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणाचे कार्य करीत

असतात, तर शिक्षक-प्रशिक्षण-संस्था माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षकांचे प्रशिक्षण करीत असतात. त्यामुळे त्यांनी शिक्षणशास्त्राच्या विकासामध्ये फारच थोडी भर घातलेली दिसून येते. मूलभूत शैक्षणिक सुधारणांच्या नियोजनाबाबत आणि कार्यवाहीबाबत तर त्यांच्याकडून त्याहीपेक्षा कमी कार्य झालेले आहे. म्हणून परिवर्तनाची साधने म्हणून विद्यापीठांचे शिक्षण विभाग आणि प्रशिक्षण संस्था उपयुक्त ठरावयाच्या असतील तर प्रथम त्यांना आपल्या दृष्टिकोनात मूलभूत बदल करावा लागेल.

(३) मूलगामी शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्यासाठी शिक्षकांनी आणि त्यांच्या संघटनांनी नेतृत्व करावे असे मानणारा एक गट आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही आहे की मूलगामी शैक्षणिक सुधारणांबाबत आतापर्यंत आपल्या देशातील शिक्षकांनी आणि त्यांच्या संघटनांनी कधी कळकळही दाखवली नाही आणि त्यांच्या नियोजनात नि कार्यवाहीत कधी पुढाकारही घेतला नाही. म्हणून या बाबतीत शिक्षकांनी आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता आहे.

(४) केवळ शिक्षणातच नव्हे तर समाजातही मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पुढाकार घेतला पाहिजे, असेही काही जणांकडून सुचविण्यात येते. परंतु या बाबतीतलीही आपला आजपर्यंतचा अनुभव निराशाजनकच आहे. एखाद्या शैक्षणिक किंवा सामाजिक प्रश्नावरून विद्यापीठातील विद्यार्थी खवळून उठतात, निदर्शने करतात हे खरे आहे. परंतु या निदर्शनांचा शिक्षणाच्या गुणवत्तेशी काहीच संबंध नसतो. मुख्य म्हणजे आपल्याला ज्या प्रकारचे मूलभूत शैक्षणिक किंवा सामाजिक परिवर्तन अभिप्रेत आहे त्या दृष्टीने पाहिले तर विद्यार्थ्यांच्या निदर्शनांनी फारसे काही साधलेलेच नाही. म्हणून याबाबतीत विद्यार्थ्यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे.

या सर्व गोष्टींचा विचार केल्यावर आपल्याला हे दिसून येते की मूलभूत सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेले चैतन्यदायी नेतृत्व देण्याची आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये क्षमताच नाही. कारण ही पद्धती विद्यमान सामाजिक परिस्थितीमधील प्रचलित आकृतिबंध आणि प्रक्रिया कायम ठेवण्यावरच भर देत असते. त्याचबरोबर हेही खरे आहे की, शैक्षणिक प्रशासक, विद्यापीठे, शिक्षक आणि विद्यार्थी यांचे प्रत्यक्ष सहकार्य लाभल्याशिवाय कोणतीही शैक्षणिक सुधारणा घडवून आणता येणार नाही. असे असल्यामुळे प्रथम मूलगामी शैक्षणिक सुधारणा निश्चित करून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यमान शिक्षणपद्धतीमध्येच नवे नेतृत्व निर्माण करण्याचा आपल्याला प्रयत्न करावयास हवा. त्यासाठी शिक्षणपद्धतीमधील वेगवेगळ्या गटांना व्यापक सामाजिक समस्या आणि शैक्षणिक नि सामाजिक परिवर्तनाचा घनिष्ठ अनुबंध यांची जाणीव करून दिली



पाहिजे. प्रशासक, शिक्षक-प्रशिक्षक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये कार्यक्षम आणि कर्तव्यभावनेने प्रेरित झालेल्या काही व्यक्ती आहेत, आणि त्या मूलगामी शैक्षणिक सुधारणांच्या नियोजनात आणि अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतील, हे कोणीच अमान्य करू शकणार नाही. परंतु अशा व्यक्तींची संख्या अत्यल्प आहे. आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये, बदलाला ज्यांचा विरोध आहे अशांचीच संख्या अधिक असल्यामुळे, परिवर्तनशील व्यक्तींची संख्या वाढेल आणि त्या अधिक परिणामकारक ठरतील या दृष्टीने आपण प्रयत्न करायला हवेत. त्यासाठी सध्याची साचेबंद आणि एकस्वरूपी शिक्षणपद्धती विकेंद्रित, लवचिक आणि गतिशील केली पाहिजे. त्यापेक्षाही महत्त्वाचे आहे ते हे की शिक्षणपद्धतीमधील परिवर्तनवादी कार्यकर्ते आणि शिक्षणपद्धतीबाहेरच्या पुरोगामी शक्ती आणि कार्यकर्ते यांच्यात जवळीक निर्माण करावयास हवी. त्या दोघांच्या संयुक्त कृतीतूनच अपेक्षित परिणाम दिसून येईल.

४.५५ मूलभूत शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्याकरिता शिक्षणपद्धतीबाहेरचे नेतृत्व कितपत उपयुक्त ठरू शकेल? मूलभूत शैक्षणिक प्रश्न मूलतः राजकीय असल्यामुळे आणि शैक्षणिक नि सामाजिक सुधारणा एकाच वेळी करायच्या असल्यामुळे, मूलभूत शैक्षणिक पुनर्घटनेच्या कार्यक्रमाचे नियोजन आणि कार्यवाही करण्याचे नेतृत्व स्वतः शासनच चांगल्या प्रकारे करू शकेल. शासनाने पुढाकार घेतला तर हे कार्य अत्यंत सुकर होईल. मात्र त्यासाठी शासनाने आपला मोहरा गरीब आणि उपेक्षित समाजघटकांकडे वळविला पाहिजे. त्याचप्रमाणे शासनाला शैक्षणिक परिवर्तनाबरोबर सामाजिक परिवर्तनासंबंधीही आस्था वाटली पाहिजे. पण अशा तऱ्हेची 'राजकीय इच्छा' फारशी दिसून येत नाही. अशा परिस्थितीत, गरीब आणि उपेक्षित समाजघटकांच्या शिक्षणात आणि संघटनेत पुढाकार घेणारे राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते आवश्यक नेतृत्व पुरवू शकतील. त्यांनी जर या कार्याला प्रारंभ केला तर केवळ शिक्षणपद्धतीमधीलच नव्हे तर इतर क्षेत्रातील सेवाभावी आणि जागरूक व्यक्तींना प्रेरणा लाभून त्याही हा कार्यक्रम यशस्वी करायला साहाय्य करतील. म्हणून शैक्षणिक परिवर्तनाचा विचार करीत असताना, शिक्षणपद्धतीबाहेरील राजकीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या भूमिकेला निर्णायक महत्त्व प्राप्त होते. सामाजिक सेवेची जाणीव असणाऱ्या व्यक्तींना आणि स्वयंसेवी संघटनांना याबाबतीत भरीव कामगिरी करून दाखविता येईल.

४.५६ भारताचा विचार केला तर असे दिसून येते की आपल्या शासनाने मुख्यतः वरिष्ठ आणि मध्यम वर्गाच्या शैक्षणिक मागण्या आणि हितसंबंध यांचीच दखल घेतली आहे. उपेक्षित समाजघटकांच्या शैक्षणिक हितसंबंधांना प्राधान्य

देण्याबाबत शासनाने औदासीन्यच दाखविले आहे. अशा परिस्थितीत, लोकांना आपल्या अधिकारांची जाणीव करून देण्यात गुंतलेले राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते नि मूलगामी सुधारणांसंबंधी अगत्य वाटणारे शिक्षणपद्धतीमधील गट यांच्यावरच सारी मदार येऊन पडते. हे लोक जनमत जागृत करू शकतात, शासनावर दबाव आणू शकतात, मूलगामी शैक्षणिक सुधारणांची कार्यवाही प्रत्यक्षात येईल असे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वातावरण निर्माण करू शकतात.

४·५७ **प्रशासकीय संरचना आणि प्रक्रिया :** सध्याची प्रशासकीय संरचना आणि प्रक्रिया या मुख्यतः एकस्वरूपी, साचेबंद आणि स्थितीशील ( किंवा मंदगतीने बदल पावणाऱ्या) संघटनेसाठी तयार करण्यात आल्या आहेत. त्यामुळे त्या केंद्रित स्वरूपाच्या आहेत. नव्या शैक्षणिक पद्धतीमध्ये अशा संरचनांना आणि प्रक्रियांना स्थान उरणार नाही. कारण नवी शिक्षणपद्धती जास्तीत जास्त विकेंद्रित, विविधस्वरूपी, लवचिक आणि गतिशील राहणार आहे. भारतासारख्या विशाल आणि वैविध्यपूर्ण देशातील झपाट्याने बदलत चाललेल्या समाजाच्या गरजांशी ही नवी पद्धतीच सुसंवादी ठरू शकेल. भारत १९४७ मध्ये स्वतंत्र झाला; परंतु अजूनही भारतीय शिक्षकाला अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, अध्यापनपद्धती आणि परीक्षा या बाबतीत शासकीय आदेश, निर्णय आणि हुकूम यांनीच बांधून टाकले आहे. आपण कशा पद्धतीने शिकवावे या बाबतीत त्याला काहीही स्वातंत्र्य मिळालेले नाही. गेल्या तीस वर्षांमध्ये त्याच्यावरील बंधने कमी होण्याऐवजी वाढतच चाललेली आहेत. त्यामुळे, आपण कसे शिकावे यासंबंधीचे स्वातंत्र्य तो आपल्या विद्यार्थ्यांना देऊ शकत नाही. साहजिकच, अध्यायपन-अध्ययन प्रक्रिया पूर्णतया कृत्रिम झालेली असून तिच्यात उत्स्फूर्तता किंवा सर्जनशीलता तीळमात्रही राहिलेली नाही. अशा परिस्थितीत शिक्षक आणि विद्यार्थी हे दोघेही शिक्षण-पद्धतीचे गुलाम झालेले आहेत. म्हणून शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना त्यांचे स्वातंत्र्य प्रदान करणे आणि शिक्षण हा सर्व संबंधितांच्या दृष्टीने सर्जनशील आणि आनंददायी अनुभव ठरणे हीच सध्या सर्वात आवश्यक अशी प्रशासकीय सुधारणा ठरते.

४·५८ प्रागतिक शिक्षणपद्धतीमध्ये लोकांचा परिणामकारक सहभाग अपेक्षित आहे. म्हणून अशा शिक्षणपद्धतीसाठी सध्याची कमालीची केंद्रित प्रशासकीय संरचना कुचकामी ठरते. शिक्षण हा राष्ट्रीय पातळीवरून हाताळायचा विषय असल्यामुळे शिक्षणासंबंधी राष्ट्रीय धोरण आखले पाहिजे, हे तर खरेच आहे. शिक्षण हा समाईक यादीतील विषय असला किंवा नसला तरी, प्रोत्साहक परंतु हस्तक्षेप न करणारे नेतृत्व पुरविणे एवढीच केवळ केंद्र सरकारची भूमिका



राहणार नाही शैक्षणिक धोरणाची प्रत्यक्ष कार्यवाही राज्य शासनांना सांभाळावी लागणार आहे, यात किंचितही शंका नाही. तरीही सर्व अधिकार राज्य शासनां-कडे सोपविणे अनुचित ठरेल. राज्यशासनांनी विद्यापीठांच्या स्वायत्ततेचा आदर करावा आणि विद्यापीठांनी या स्वायत्ततेत आपले विभाग, महाविद्यालये, अध्यापक, विद्यार्थी आणि सामान्य प्रतिनिधी यांना सहभागी करून घ्यावे, असे आम्ही यापूर्वी सूचित केलेलेच आहे. शालेय शिक्षणाचा विचार करता, जिल्हा (किंवा गट) पातळीवर योग्य त्या अधिकारयंत्रणा निर्माण करून त्यात स्थानिक लोकांना सहभागी करून घेतले पाहिजे. अधिकारांचे आणि जबाबदारीचे हे विकेंद्रीकरण करीत असताना, साधनसंपत्तीचेही विकेंद्रीकरण होत आहे, हे कटाक्षाने पाहिले पाहिजे.

४·५९ केंद्र शासनाकडून ग्रामपंचायतीकडे अधिकारांचे क्रमशः विकेंद्रीकरण होत असताना शाळा आणि शिक्षक यांनाही अधिकाधिक स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. आपला अभ्यासक्रम आखणे, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे, नवनवीन प्रयोग करणे याबाबतीत हे स्वातंत्र्य असावयास हवे. प्रायोगिक शाळा आणि स्वायत्त महाविद्यालये यांचा अधिकाधिक प्रयोग करून पाहिला पाहिजे. थोडक्यात सांगायचे तर, या पूर्वी म्हटल्याप्रमाणे, विकेंद्रित, विविधस्वरूपी, लवचिक आणि गतिशील शिक्षणपद्धती निर्माण करणे हे सर्व प्रशासकीय उद्दिष्टांचे ध्येय असले पाहिजे.

४·६० या प्रक्रियेला चालना देण्यासाठी शिक्षण आयोगाने (१९६४–६६) सुचविल्याप्रमाणे महाविद्यालय–विद्यालय समूहाची पद्धत अवलंबणे इष्ट ठरेल. शिक्षणसंस्थानी परस्परांशी स्पर्धा करण्याऐवजी आपापसात दृढ संबंध प्रस्थापित करावा हा या पद्धतीमागील उद्देश आहे. प्राथमिक शाळांच्या एका गटाने एका माध्यमिक शाळेशी निकट संपर्क ठेवून कार्य करावे, माध्यमिक शाळांच्या एका गटाने एका महाविद्यालयाशी निकट संपर्क ठेवून कार्य करावे, आणि महा-विद्यालयांच्या एका गटाने एका विद्यापीठाशी निकट संपर्क ठेवून कार्य करावे, असे या पद्धतीचे स्वरूप आहे. या सहकार्यामध्ये इतर अनेक गोष्टींसमवेत सुविधा, बुद्धिमान विद्यार्थ्यांचा शोध आणि विकास, संयुक्त अध्यापन आणि तत्सम अन्य कार्य, शिक्षकांच्या सेवान्तर्गत प्रशिक्षणाची चांगली सोय यांचाही समावेश असावा. असे केले तर शिक्षकांना आपल्या शैक्षणिक स्वातंत्र्याचा लाभ घेता येईल आणि स्वायत्ततेचाही सामुहिक उपयोग करून घेणे शक्य होईल. तसेच शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याच्या कार्यातही शिक्षकांना परिणामकारक भूमिका बजावता येईल.

४·६१ याच दिशेने आणखी एक पाऊल म्हणून समाजापासून अलिप्त

राहण्याची शाळांची प्रवृत्ती नाहीशी झाली पाहिजे. त्यासाठी आपण शाळा आणि समाज यांच्यात परस्पर-सहकार्याचे कार्यक्रम विकसित करायला हवेत. त्याच-प्रमाणे सर्वसाधारण आणि व्यावसायिक शिक्षणात योग्य ते दुवे निर्माण करून शिक्षणाचे आरोग्य, कृषी, उद्योग आदी जीवनक्षेत्रांशी अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित केले पाहिजेत.

४·६२ **आर्थिक साहाय्य :** येथे सूचित करण्यात आलेल्या शैक्षणिक कार्य-क्रमांच्या विकासासाठी बराच पैसा लागणार आहे. त्या दृष्टीने येत्या दहा वर्षा-मध्ये आपला शिक्षणावरील एकूण खर्च दुपटीने वाढेल असे गृहीत धरण्यात आले आहे. ही गुंतवणूक बरीच आहे हे खरे असले तरी किमान एवढे आपल्याला केलेच पाहिजे.

४·६३ या संदर्भामध्ये तीन महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. शैक्षणिक विकासासाठी पैसा अत्यावश्यक असला तरी केवळ पैशाने हे कार्य होणार नाही, ही पहिली गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. पैशापेक्षाही योग्य नियोजन, परिश्रम करावेसे वाटतील असे वातावरण, शिक्षकांमध्ये जबाबदारीची अधिक जाणीव आणि विद्यार्थ्यांमध्ये अध्ययन करण्याची प्रवृत्ती वाढविणे या गोष्टी किती तरी महत्त्वाच्या आहेत. खरे तर शिक्षणाच्या बऱ्याचशा क्षेत्रांमध्ये अशी परि-स्थिती आहे की यापुढे आपण त्यावर अधिक पैसा खर्च केला तर त्यामुळे चांगले परिणाम दिसून येण्याऐवजी उलटेच चित्र निर्माण होण्याचा संभव आहे. योग्य नियोजन आणि अधिक मानवी प्रयत्न यांचीच सध्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी नितांत गरज आहे. दुसरे असे की सध्या जो पैसा खर्च केला जात आहे त्याचा जास्तीत जास्त चांगला उपयोग कसा करून घेता येईल यासंबंधी विचार केला पाहिजे. कारण एक तर शिक्षणासाठी अधिक पैसा उपलब्ध होणे कठीण आहे. शिवाय सध्या जो पैसा वाया जात आहे तो चांगल्या कारणाकरिता वापरून शिक्षणपद्धतीची कार्यक्षमता वाढविता येईल. तिसरी आणि सर्वात मह-त्त्वाची गोष्ट ही आहे की शिक्षणाचा दर्जा घसरू न देता प्रत्येक विद्यार्थ्यामागे शिक्षणावर होणारा खर्च कमी करण्याचा आपण कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी वेतनश्रेणीची पुनर्रचना, शिक्षणसंस्थांचे सुयोग्य नियोजन, जेथे शक्य आहे तेथे विद्यार्थी-शिक्षक प्रमाणामध्ये वाढ, अनौपचारिक शिक्षण असे अनेक उपाय योजता येण्यासारखे आहेत. शिक्षणावर दरडोई होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणामध्ये आपण कपात केली नाही तर सर्व लोकांना चांगले शिक्षण देण्याइतका पैसा आपल्याला कधीच उपलब्ध होणार नाही.



**प्रकरण पाचवे**

# कार्यवाही

५·०१ मागील प्रकरणात आम्ही अनेक महत्त्वाच्या शिफारशी केलेल्या आहेत.यापैकी एकही शिफारस पूर्णपणे नवीन नाही हे तर खरेच आहे. जनतेच्या शिक्षणासंबंधी आतापर्यंत ज्या अनेक शिफारशी करण्यात आल्या आहेत त्यातील चांगल्या शिफारशींची निवड करून, काही किरकोळ बदलांसह, आम्ही त्यांची सुसूत्र मांडणी केली आहे, इतकेच आम्हाला म्हणायचे आहे. आता प्रश्न उपस्थित होतो तो हा की आतापर्यंत या शिफारशींची कार्यवाही का झाली नाही ? तसेच, या पुढील काळात त्यांची चांगली कार्यवाही करण्यासाठी कोणती पद्धती अवलंबली पाहिजे ? तसे पाहिले तर हे प्रश्नही नवीन नाहीत. हे प्रश्न यापूर्वी अनेक वेळा विचारण्यात आले आहेत आणि त्यांची वेळोवेळी उत्तरेही दिली गेली आहेत. हे असे का घडले यासंबंधीचे आमचे निदान आणि यापुढे करा यची कृती यामध्ये मात्र निश्चितच नाविन्य आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्या शिफारशींच्या कार्यवाहीसंबंधी आम्ही वेगळी आणि नवीन कार्यपद्धती सुचवित आहोत, हीच आमची प्रमुख भूमिका आहे.

५·०२ **काही चुकीची व अपुरी उत्तरे :** शैक्षणिक सुधारणांच्या कार्यवाही-मध्ये आतापर्यंत अपयश का आले यासंबंधीच्या निदानावरच कार्यवाहीची नवीन पद्धती अवलंबून राहील, हे उघड आहे. म्हणून आतापर्यंत जी चुकीची निदाने करण्यात आली किंवा चुकीची वा अपुरी उत्तरे देण्यात आली त्यांचा विचार करणे आवश्यक ठरते.

(१) नेहमी असे म्हटले जाते की चांगल्या योजना आखण्यात आपण जेवढे प्रवीण आहोत तेवढेच त्यांच्या अंमलबजावणीबाबत निष्काळजी आहोत. उदात्त ध्येयांचा उच्चार करण्याची आपल्याला भरपूर सवय झालेली आहे. तरीही आपल्या सर्व योजना निर्दोष वा चांगल्या आहेत, असे म्हणता येणार नाही. आपल्याला चांगली कार्यवाही करता येत नाही असे म्हणूनही काहीच निष्पन्न होत नाही. म्हणून आपण आणखी एक प्रश्न विचारला पाहिजे; कार्यवाहीत

आपल्याला का आणि कोणत्या प्रकारचे अपयश येते ? चुकीच्या कार्यवाहीचा सिद्धांत मानणारे असे धरून चालतात की कोणत्याही योजनेची अंमलबजावणी करण्याची मुख्य जबाबदारी शासकीय अधिकाऱ्यांची असते आणि म्हणून अपयशाचा सारा दोष त्यांच्याकडे येतो. नोकरशाहीवर असा आरोप करणे रास्तही नाही आणि बरोबरही नाही. शैक्षणिक सुधारणांच्या अंमलबजावणीतील अपयशाबाबत नोकरशाही बऱ्याच प्रमाणामध्ये जबाबदार आहे हे कोणीच नाकारत नसले तरी केवळ नोकरशाहीच या बाबतीत अपराधी नाही. शैक्षणिक योजनांची कार्यवाही करण्याची जबाबदारी संपूर्ण समाजाची आहे. म्हणून त्याबद्दल समाजाच्या एका घटकाला सर्वस्वी जबाबदार धरून चालणार नाही.

(२) शैक्षणिक सुधारणांच्या मूलगामी योजनांच्या अंलबजावणीतील अपयशाबाबत नोकरशाहीला जबाबदार धरून आपण नामानिराळे होण्याचा खेळ येथेच थांबत नाही· शैक्षणिक विकासाशी संबंधित असलेली प्रत्येक यंत्रणा हाच खेळ खेळत असते. उदाहरणार्थ, शिक्षकांना विद्येसंबंधी आणि विद्यार्थ्यांच्या हितासंबंधी आस्था उरलेली नाही असे लोक म्हणत असतात. शिक्षकही गप्प बसत नाहीत. आपण करीत असलेल्या कार्याचे मोल ( ! ) जाणून घेण्याबाबत शिक्षित समाज उदासीन आहे आणि निरक्षर समाजाला ते कळूच शकत नाही, असा युक्तिवाद शिक्षकांकडून केला जातो. राजकीय कार्यकर्ते आमच्या क्षेत्रात उगाचच हस्तक्षेप करीत असतात, विद्यार्थ्यांमध्ये शिस्त उरलेली नाही, त्यांच्यात अध्ययनाची उर्मी नाही, समाज आम्हाला चांगला दर्जा आणि त्यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे चांगला पगार देत नाही, अशी किती तरी कारणे ते पुढे करतात. विद्यार्थी शिक्षकांवर दोषारोप करतात. शिक्षक अकार्यक्षम, अप्रामाणिक, जातीय विचाराचे आणि वशिलेबाजी करणारे आहेत, हा विद्यार्थ्यांचा ठरीव आरोप असतो. सरकारी अधिकारी स्वार्थी आणि भ्रष्ट आहेत, असेही ते म्हणतात. राजकीय कार्यकर्ते, आपण सोडून इतर सगळ्यांना–शिक्षक, विद्यार्थी, समाज आणि सरकारी अधिकारी यांना–या दुरवस्थेबद्दल जबाबदार धरतात. केंद्र शासन राज्य शासनांकडे बोट दाखविते तर राज्य शासने केंद्र शासनावर ठपका ठेवत असतात. असा हा खेळ सतत चालत आलेला आहे. प्रत्येक जण आपल्याव्यतिरिक्त इतर सर्वजण कसे आणि किती जबाबदार आहेत याचे चर्वितचर्वण करीत असतो. आरोपप्रत्यारोपांच्या या नाटकात सर्वसामान्य नागरिकाकडे मुक्या प्रेक्षकाची भूमिका येते. शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचा सारा बोजा त्याला सहन करावा लागतो; मात्र या शिक्षणाचा त्याला काहीही लाभ होत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की शैक्षणिक अपयशाला केंद्र शासन, राज्य शासने, समाज, शिक्षक, विद्यार्थी, प्रशासन हा प्रत्येक घटक समप्रमाणात कारणीभूत आहे. कारण आपली विहित भूमिका पार न



पाडल्याचा गुन्हा या प्रत्येक घटकाकडून घडलेला आहे. म्हणून प्रत्येक घटकाने आपला गुन्हा कबूल करून यापुढे आपल्या वर्तनात आवश्यक ते बदल करायला हवेत. तसे केल्यानेच आपल्याला हा प्रश्न सोडविता येईल. इतरांवर जबाबदारी ढकलून काहीच साध्य होत नसते.

(३) आमच्या मते सैद्धान्तिक वा तांत्रिक उपाय फारसे उपयोगी पडणार नाहीत. कारण त्यातून मर्यादित वा अपुरी उत्तरे मिळण्याचा संभव आहे. सैद्धान्तिक आणि तांत्रिक उपायांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश केला जातो : चांगले शिक्षक ( म्हणजे चांगले सर्वसाधारण शिक्षण, चांगले व्यावसायिक प्रशिक्षण, चांगली निवड आणि चांगले वेतन); अभ्यासक्रमात चांगली सुधारणा, चांगले सर्वेक्षण, चांगले प्रशासन, जनसंपर्काच्या आधुनिक माध्यमांचा चांगला वापर; आणि या सर्वांसाठी अधिक पैसा. हे प्रश्न निश्चितच महत्त्वाचे आहेत आणि शैक्षणिक पुनर्रचनेच्या एकूण कार्यक्रमामध्ये त्यांना विशिष्ट स्थानही आहे. परंतु शिक्षण म्हणजे निव्वळ सिद्धांत नव्हेत. शिक्षणाचे मूलभूत प्रश्न तात्त्विक विचारांपेक्षा शिक्षण आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांमध्ये आणि अनेक वेळा खुद्द समाजामध्येच रुजलेले असतात. म्हणून या गुंतागुंतीच्या प्रश्नांना नुसती सैद्धान्तिक उत्तरे पुरी पडणार नाहीत.

(४) नेहमी आणखी एक तक्रार अशी केली जाते की शिक्षणाला पुरेसे प्राधान्य दिले जात नाही; आपल्या नियोजनाच्या मसुद्यांमध्ये शेती, वीज, उद्योगधंदे, पाटबंधारे आणि कुटुंबनियोजन यांच्यानंतर शिक्षणाचा क्रम लावण्यात येतो; शिक्षणाकडे अजूनही 'गुंतवणूक' म्हणून पाहण्याऐवजी 'समाजसेवा' म्हणूनच पाहिजे जाते. हे आक्षेप अंशतः खरे आहेत. पंचवार्षिक योजनेमध्ये शिक्षणासाठी फारच कमी रक्कम उपलब्ध करून दिली जाते आणि हळूहळू हे प्रमाणही घटत जात असते ! हे खरे असले तरी शिक्षणावर होणारा एकूण खर्च ( योजना–अंतर्गत आणि योजनाबाह्य) बराच असतो, याचा उल्लेख आम्ही पूर्वी केलेलाच आहे. संरक्षणाच्या खालोखाल शिक्षणावरच खर्च होत असतो. राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीच्या प्रमाणापेक्षा शिक्षणावर होणारा खर्च दुपटीने वाढत आहे. शिक्षणावर सध्या होत असलेला प्रचंड खर्च लक्षात घेतला तर शिक्षणाला आपण सर्वोच्च प्राधान्य दिलेले आहे, असा दावा करता येईल. शिक्षणावरील खर्चात आणखी वाढ करणे शक्य नाही आणि तशी वाढ करण्याचे ठरविले तर विकासाच्या इतर क्षेत्रांवर अनिष्ट परिणाम होईल, असेही या संदर्भात सांगता येण्यासारखे आहे. त्याचप्रमाणे शिक्षणावर होणारा खर्च हा मानवी विकासासाठी केलेली गुंतवणूक मानली पाहिजे हे मान्य केले तरीदेखील औपचारिक शिक्षणाच्या प्रसारासाठी खर्चात वाढ करणे समर्थनीय ठरणार नाही. कारण या पद्धतीत

बराच पैसा वाया जात असतो. तसेच ही शिक्षणपद्धती अकार्यक्षम असून ती श्रीमंत वर्गाच्या बाजूने झुकलेली आहे. म्हणून संपूर्ण शिक्षणपद्धतीचे मूलभूत परिवर्तन केले तरच शिक्षणावर केला जाणारा खर्च जनतेच्या विकासाची गुंतवणूक ठरणार आहे. म्हणून यापुढे असे परिवर्तन घडून आल्यावर किंवा ते घडवून आणण्यासाठी शिक्षणावर अधिक खर्च करणे समर्थनीय ठरेल.

(५) आपल्यापाशी पुरेशी साधनसामग्री नाही, असे आपल्या अपयशाचे आणखी एक ठरीव कारण सांगितले जाते. खरे म्हणजे गरीब देशातील कोणत्याही विकास – कार्यक्रमाच्या अपयशाबाबत हे कारण पुढे करता येण्यासारखे आहे. आपण प्रथम शैक्षणिक विकासासाठी अवाढव्य खर्चाच्या योजना आखतो आणि नंतर, तेवढा पैसा उपलब्ध झाला नाही, अशी सबब पुढे करून आपले अपयश झाकण्याचा प्रयत्न करतो. पैशाच्या सामर्थ्यावर आधारलेल्या या सर्व युक्तिवादामध्ये, पैसा मिळाला की सगळे प्रश्न सुटू शकतात, असे गृहीत धरलेले असते. परंतु तो भ्रम आहे. अनेक शैक्षणिक कार्यक्रम (उदाहरणार्थ चारित्र्यनिर्मिती) असे आहेत की त्यांना पैशाची मुळीच गरज लागत नाही. पैशामुळे जे साध्य करता येत नाही ते साध्य करण्यासाठी आपण पैशाचा वापर करीत असल्यामुळेच आपल्याला अपयश येते, अशी वस्तुस्थिती आहे. त्याचप्रमाणे, आपल्याला जास्त पैसा उपलब्ध झाला तर आपण काय करू शकू हा सध्याच्या परिस्थितीत महत्त्वाच्या प्रश्न नसून उपलब्ध साधनसामग्रीमध्ये आपण काय करू शकू हा विचार अधिक महत्त्वाचा आहे, हे आपण ध्यानात घेत नाही. आपला देश गरीब असतानाही आपण बराच पैसा वाया घालवीत असतो. या परिस्थितीत आणखी पैसा मागण्याचा आपल्याला नैतिक अधिकार उरत नाही. गरीब देशांना पैशाची नेहमीच चणचण जाणवणार आहे, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणून पैशाची उणीव भरून काढण्यासाठी या देशांना आपला ‘ विचार ’ खर्च करावा लागेल. तसेच मानवी प्रयत्नांचे भांडवल उभारावे लागेल. परंतु या गोष्टीकडे आपण सोयीस्कर दुर्लक्ष करतो. कारण ‘विचार’ खर्च करण्याऐवजी किंवा प्रयत्नांची कक्षा उंचावण्याऐवजी पैसा खर्च करणे सोपे असते. विशेषतः हा पैसा दुसऱ्याचा असेल तर तो खर्च करायला किंचितही संकोच वाटत नाही.

**५.०३ मूलभूत प्रश्न :** शिक्षणात मूलगामी परिवर्तन घडवून आणण्यात आपल्याला अपयश का आले या बाबतची खरी कारणपरंपरा कोणती आहे ? यापूर्वीच्या चर्चेमध्ये योग्य त्या ठिकाणी अपयशाच्या मूलभूत कारणांसंबंधीचे आमचे विचार आम्ही मांडलेलेच आहेत. पुनरावृत्तीचा धोका पत्करूनही ते येथे संक्षेपाने मांडणे आम्हाला आवश्यक वाटते. आपल्या अपयशाची कारणे खालीलप्रमाणे आहेत :



– औपचारिक शिक्षणाची सध्याची संरचना शाळांना, शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना प्रयोग नि नवनिर्मिती करायला अधिकाधिक स्वातंत्र्य देण्याइतकी लवचिक आणि गतिशील करण्यात आपल्याला अपयश आले.

– कोणत्याही पातळीवर अनौपचारिक शिक्षणाचे व्यापक आणि परिणामकारक कार्यक्रम विकसित करता आले नाहीत.

– सूक्ष्म पातळीवरील कार्यकारी शिक्षणकक्षांची (म्हणजे शिक्षण आणि विद्यार्थी यांच्यामध्ये किंवा खुद्द विद्यार्थ्यांमध्ये सतत क्रिया आणि प्रतिक्रिया होत राहील अशा लक्षावधी केंद्रांची ) उपेक्षा केल्यामुळे त्यांची कार्यक्षमता ओसरली किंवा ते बंद पडले. तसेच सर्वसामान्य माणसाच्या गरजा आणि हितसंबंध यांच्याशी शिक्षणपद्धती निगडित करण्यातही आपण यशस्वी झालेलो नाही. प्राथमिक आणि प्रौढशिक्षणाची उपेक्षा हेही आणखी एक कारण आहे. माध्यमिक नि उच्च शिक्षणावर आणि वरिष्ठ आणि मध्यम वर्गाच्या शैक्षणिक गरजा नि मागण्या यांवर अवास्तव भर दिला गेला. राजकीय आणि शैक्षणिक असे दोन्ही प्रकारचे कठोर निर्णय करण्याची आपल्याला हिंमत झाली नाही. तसे निर्णय केल्याखेरीज माध्यमिक आणि उच्च शिक्षणात मूलगामी सुधारणा घडवून आणता येणारच नाही.

– शैक्षणिक सुधारणांसाठी शिक्षणपद्धतीत आणि शिक्षणपद्धतीबाहेरही प्रखर राष्ट्रव्यापी आंदोलन संघटित करण्यात आणि ते सातत्याने चालून ठेवण्यात आपल्याला अपयश आले.

– लोकांना आपल्या अधिकारांची जाणीव होण्यासाठी साहाय्यभूत ठरणाऱ्या सामाजिक आणि राजकीय शक्ती आपण विकसित करू शकलो नाही.

– एकाच वेळी परस्परपूरक असे सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तन प्रवर्तित करण्यातही आपल्याला अपयश आले.

शैक्षणिक परिवर्तनाच्या अपयशामागील ही मूलभूत कारणे दूर केल्याशिवाय, आपल्याला अभिप्रेत असलेले मूलगामी शैक्षणिक बदल घडून येणार नाहीत.

**५.०४ नवा दृष्टिकोन :** आपल्या अपयशामागील या मूलभूत कारणांची दखल घेतल्यानंतर विकासासाठी योजावयाच्या नव्या कार्यपद्धतीचे काही मूलभूत विशेष ध्यानात घ्यावयास हवेत.

(१) **पुरेशी आणि व्यापक कृती :** पहिली गोष्ट अशी की शैक्षणिक सुधारणेसंबंधीचा आपला पारंपरिक दृष्टिकोन आपण सोडून द्यायला हवा. कारण तो नोकरशाहीवर भर देणारा आणि निवडक नि मर्यादित भूमिका स्वीकारणारा आहे. लोकांचा सहभाग अपेक्षिणारा आणि आपल्यापुढील आव्हानांना तोंड द्यायला समर्थ ठरेल एवढा व्यापक प्रयत्न करणारा असा नवा दृष्टिकोन हवा. मुख्य

म्हणजे प्रायोगिक प्रकल्पांसारखे काही तरी उपक्रम करीत बसून वेळ वाया घालविण्याऐवजी आपण अत्यावश्यक सुधारणांवर आपले प्रयत्न केंद्रित केले पाहिजेत. त्यादृष्टीने आपण योग्य नियोजन करून प्रत्यक्ष कार्यक्रमांनाच प्रारंभ करायला हवा. आपल्याला जे प्रश्न सोडवावयाचे आहेत, त्यांची व्याप्ती आणि गुंतागुंत लक्षात घेऊन या कार्यक्रमांचा आकार ठरवावा लागेल. संपूर्ण शिक्षण-पद्धती मुळापासून ढवळून काढण्यासाठी आपल्याला विराट राष्ट्रीय मोहीम सुरू करावी लागेल. तसेच काही कठोर आणि अपारंपरिक उपायही योजावे लागतील.

(२) **जनआंदोलनाची संघटना :** केवळ शासनयंत्रणेवर अवलंबून न राहता, आवश्यक अशा शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी देशव्यापी प्रखर जन-आंदोलन उभारणे हा आपल्या कार्यपद्धतीचा दुसरा महत्त्वाचा विशेष राहील. हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी, स्वातंत्र्यप्राप्तीपासून आपण केवळ शासनावर अवलंबून राहिलो आणि म्हणूनच आपले उद्दिष्ट साध्य होऊ शकले नाही. भारतातील शासन मुख्यतः वरिष्ठ आणि मध्यम वर्गांचेच प्रतिनिधित्व करते; दुर्बळ समाजघटकांच्या प्रतिनिधींना त्यात फारच थोडे स्थान आहे, असेच आपला गेल्या तीस वर्षांचा अनुभव सांगतो. त्यामुळे आपल्या समाजजीवनामध्ये अनेक अपप्रवृत्ती शिरल्या आहेत. त्यापैकी काही अशा : बदलाचा प्रमुख घटक म्हणून लोकांवर भर देण्याऐवजी, उच्च प्रतीचे शिक्षण घेतलेल्या व्यक्ती आणि शासकीय अधिकारी यांच्यावरच आपण सारा भार ठेवला; आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असलेल्या तळच्या तीस टक्के लोकसंख्येच्या गरजा आणि मागण्या यांचा विचार करण्या-ऐवजी सर्वात वरच्या पातळीवरील तीस टक्के लोकसंख्येच्या गरजा आणि मागण्या पुरविल्या. त्यामुळे ज्यांना अजिबात शिक्षण घेता आलेले नाही त्यांना थोडेतरी शिक्षण देण्याऐवजी ज्यांना आतापावेतो बऱ्याच प्रमाणात शिक्षण घेता येत होते त्यांच्यासाठी अधिक आणि चांगल्या शिक्षणाची सोय केली.

प्रौढशिक्षण आणि प्राथमिक शिक्षण यांच्या प्रसाराऐवजी माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा विस्तार केला.

वरिष्ठ आणि मध्यम वर्गांच्या प्रतिष्ठित स्थानाला धक्का बसेल अशा प्रकारच्या कोणत्याही बदलाला विरोध करण्यात आला (उदाहरणार्थ, समान शाळा स्थापन करण्यात आल्या नाहीत). तसेच या वर्गांच्या शिक्षणासाठी जे अनुदान देण्यात येते तेही कमी करण्यात आले नाही. (या वर्गातील विद्यार्थ्यांचे शुल्क वाढविता आले असते.)

सध्याची शिक्षणपद्धती ज्या मध्यमवर्गीय मूल्यांवर आधारलेली आहे त्या



मूल्यांवर परिणाम होईल अशा कोणत्याही सुधारणेला विरोध करण्यात आला. * भारतासारख्या विषमताधिष्ठित समाजामध्ये, शासनाने गरिबांच्या बाजूने उभे राहिले पाहिजे. गरिबांना आपले दारिद्र्य काही प्रमाणात तरी कमी करता यावे यासाठी शासनाने त्यांना साहाय्य आणि संरक्षण दिले पाहिजे.

'अंत्योदया'मध्ये गांधीजींना हेच अभिप्रेत होते. गरिबांना दारिद्र्यावर मात करता यावी यासाठी मूलगामी शैक्षणिक परिवर्तनाचा प्रश्न संपूर्णपणे राज्यकर्त्यांच्या इच्छेवर सोपवून आपल्याला चालणार नाही हे ओळखले पाहिजे. हे बदल घडवून आणण्यासाठी आपण देशभर जनआंदोलन उभारून त्याच्या आधारे शैक्षणिक परिवर्तन घडवून आणणे शासनाला भाग पाडले पाहिजे. यापूर्वी आपण नेमके हेच केलेले नाही आणि म्हणून प्रथम आपण हा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जर आपल्याला आपल्या जनतेच्या शिक्षणासंबंधी आस्था असेल तर त्यासाठी लढण्याकरिता लोकांना संघटित करण्यावाचून अन्य पर्यायच नाही. खराखुरा विकास साधावयाचा असेल तर राजकीय जागृती अपरिहार्य ठरते. लोकांमध्ये तशी जागृती झाल्याशिवाय मूलभूत शैक्षणिक वा सामाजिक परिवर्तन घडून येणे अशक्य आहे. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये राजकीय दृष्ट्या जागृत असलेली जनसंघटना उभी राहिली. त्यामुळे शिक्षणपद्धतीने आणि समाजपद्धतीने चांगले कार्य करावे असे वातावरण निर्माण होऊ शकले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात तशी जनसंघटना अस्तित्वात येऊ न शकल्यामुळे शैक्षणिक आणि सामाजिक परिस्थिती बिघडत गेली.

(३) **एकाच वेळी शिक्षणपद्धतीत आणि पद्धतीबाहेर लढा :** आपल्याला जे शैक्षणिक परिवर्तन घडवून आणायचे आहे त्यासाठी शिक्षणपद्धतीत आणि या पद्धतीबाहेर एकाच वेळी लढा देणे हा आपल्या विकासविषयक नव्या कार्य-पद्धतीचा आणखी एक विशेष होणार आहे. शिक्षणपद्धतीमध्ये तसा लढा देणे शक्य होणार नाही असे काही जणांना वाटते. त्यासाठी ते अनेक कारणे देतात. त्यापैकी काही अशी : शिक्षणपद्धतीचा प्रचंड व्याप आणि तिची स्थितीशीलता; जनतेच्या अंतिम हिताचा विचार करण्याऐवजी आपल्या तात्कालिक हितसंबंधांना प्राधान्य देण्याचा बहुसंख्य प्रशासक, शिक्षक, विद्यार्थी यांचा वर्गीय दृष्टिकोन;

---

* उदाहरणार्थ मूलभूत शिक्षण रद्द करण्यात आले. त्यामुळे शिक्षण आयोगाने कार्यानुभवाची संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न केला तेव्हाच श्री. जी. रामचंद्रन म्हणाले होते, "ज्यांनी मूलभूत शिक्षणाला फाटा दिला तेच अजून सत्तेवर आहेत आणि त्यामुळे ते कार्यानुभवाची संकल्पनाही गुंडाळून ठेवतील;" आणि झालेही तसेच.

नवनिर्मितीला वाव न देणारी साचेबंदता, परिणामकारक लढा देण्याची जिद्द बाळगणाऱ्या व्यक्तींचा अभाव, आणि इतर अनेक. संपूर्ण औपचारिक शिक्षणपद्धती बाद ठरविणारा आणि आपल्या सर्वांगीण निष्क्रियतेचा दोष त्या पद्धतीवर ठेवणारा हा युक्तिवाद आम्हाला मान्य नाही. प्रभावी आंदोलन उभारण्याची आवड आणि क्षमता असलेल्या अनेक चांगल्या आणि सेवाभावी व्यक्ती शिक्षणपद्धतीत आहेत, असे आमचे मत आहे. परंतु शिक्षणपद्धतीबाहेर हे आंदोलन संघटित केल्याशिवाय शिक्षणपद्धतीमधील आंदोलनाला जोर चढणार नाही, हेही तितकेच खरे आहे. गेल्या तीस वर्षांमध्ये आपण केवळ शिक्षणपद्धतीच्या अंतर्गत तिच्या सुधारणेचा प्रयत्न केला. त्यामुळे तो प्रयत्न फसणे क्रमप्राप्तच होते. म्हणून यापुढे आपण शैक्षणिक सुधारणेचा प्रश्न केवळ शिक्षणसंस्था, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्याकडे सोपवून चालणार नाही. मात्र या सुधारणेची त्यांच्यावरही काही प्रमाणामध्ये जबाबदारी आहे. शिक्षणपद्धतीत सुधारणा करण्यासाठीदेखील शिक्षणपद्धतीबाहेर कार्य करायला हवे असे महात्मा गांधी म्हणत असत. शिक्षणपद्धतीमध्ये समाविष्ट न झालेल्या कार्यक्षम आणि समर्पित वृत्तीच्या लोकांना एकत्र आणून आपण त्यांच्यामार्फत शिक्षणपद्धतीबाहेर विराट शैक्षणिक आंदोलन संघटित केले पाहिजे. या कार्यासाठी अनौपचारिक शिक्षणाचे कार्यक्रम निश्चित उपयोगी पडू शकतील. शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर आणि विशेषतः प्रौढशिक्षणाच्या आणि प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारामध्ये अनौपचारिक शिक्षणाचे कार्यक्रम किती उपयुक्त ठरू शकतील, यासंबंधीचे विवेचन अगोदरच आलेले आहे. शिक्षणपद्धतीबाहेरील हे प्रयत्न ज्या प्रमाणात वाढतील आणि यशस्वी होतील, त्या प्रमाणामध्ये शिक्षणपद्धतीमधील परिस्थितीही बदलू लागेल आणि अशा रीतीने जर एकाच वेळी शिक्षणपद्धतीत आणि तिच्या बाहेर कृती सुरू झाली तर अत्यावश्यक शैक्षणिक परिवर्तन घडवून आणून आपण आपल्या सर्व लोकांना चांगले शिक्षण देऊ शकू.

(४) **तळपातळीवरील कार्याला प्राधान्य :** विकासाच्या आपल्या नव्या कार्यपद्धतीमध्ये स्थानिक समूहांमध्ये कार्यशील शैक्षणिक घटक निर्माण करण्यावर विशेष भर द्यावयास हवा. ग्रामीण भागाच्या दृष्टीने तर हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. आपले जीवनकार्य म्हणून हा कार्यक्रम स्वीकारणाऱ्या तरुण आणि सेवाभावी कार्यकर्त्यांना सर्वतोपरी साहाय्य केले पाहिजे. हे कार्य पुरेशा प्रमाणामध्ये विकसित झाले तर या कार्याच्या प्रसारासाठी अनेक नवनव्या कल्पना सुचतील आणि त्या या कार्याला नवी दिशा देऊ शकतील. दिल्लीत शैक्षणिक क्रांतीला प्रारंभ करावयाचा आणि नंतर ती खेडोगावांपर्यंत पोहोचवायची अशी या कार्यक्रमाची कल्पना नाही, हे नीट ध्यानात ठेवले पाहिजे. खेडेगावात या क्रांतीची मुहूर्तमेढ



रोवून शेवटी ती दिल्लीला पोहोचेल, अशीच शक्यता अधिक आहे.

(५) **सामाजिक परिवर्तनासाठी एकाच वेळी लढा :** शैक्षणिक परिवर्तनाच्या लढ्याला साहाय्यभूत होण्यासाठी एकाच वेळी परस्परपूरक असा सामाजिक परिवर्तनाचा कार्यक्रमही हाती घेणे आवश्यक आहे, यासंबंधी यापूर्वी विवेचन केलेलेच आहे. नव्या कार्यपद्धतीचा हा आणखी एक महत्त्वपूर्ण विशेष असून, एकाच वेळीही दोन्ही कार्ये सुरू झाल्याशिवाय ती यशस्वी होणार नाहीत.

५·०५ **बदलाचे घटक :** ही नवी कार्यपद्धती विकसित आणि यशस्वी होण्यासाठी शिक्षण, समाजसुधारणा आणि राजकारण यांचा अन्योन्यसंबंध आपल्याला दृष्टिआड करून चालणार नाही. म्हणून आपल्याला तीन आघाड्यांवर प्रयत्न करायला हवेत :

– शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाशी निगडित असलेले मूलभूत राजकीय प्रश्न शिक्षणपद्धतीमधील कार्यकर्त्यांना समजावून सांगितले पाहिजेत. तसेच त्यांची संघटना करून शैक्षणिक परिवर्तन घडवून आणण्याबाबत त्यांना मदत केली पाहिजे.

– सामाजिक आणि विधायक कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्याचे राजकीय परिणाम समजावून सांगितले पाहिजेत. लोकांमध्ये जाणीवजागृती करण्याचे अंतिम उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या कार्यक्रमांचा उपयोग कसा करता येईल याचे त्याना प्रशिक्षण द्यायला हवे. कारण लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि आपल्या हक्कांची त्यांना जाणीव होणे हाच या परिवर्तनाचा मूलभूत हेतू आहे.

– राजकीय संघटनेला कोणती सांस्कृतिक आणि शैक्षणिक परिमाणे असतात याची बऱ्याच राजकीय कार्यकर्त्यांना माहिती नसते. म्हणून त्यांना त्या परिमाणांची माहिती करून देऊन आपल्या राजकीय कार्यक्रमात या परिमाणांना योग्य ते स्थान द्यावे यासाठी त्यांना साहाय्य केले पाहिजे.

हा असा तिहेरी, एकात्म आणि सुसूत्र प्रयत्न करण्यात आला तरच आपल्याला अभिप्रेत असलेला शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचा लक्षणीय कार्यक्रम साकार करण्यासाठी व्यापक, प्रभावी आणि गतिशील आंदोलन उभारणे शक्य होणार आहे.

५·०६ **यशसिद्धीसाठी आवश्यक परिस्थिती :** हे विवेचन संपविण्यापूर्वी आम्हांला काही महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. जनतेमध्ये आता बरीच जागृती झालेली असून ती चिरडता येणार नाही. उलट ती वृद्धिंगत होणेच आपल्या राष्ट्रीय हिताचे आहे. हे जनजागरण विकसित होण्यासाठी येथे सुचविलेले शैक्षणिक परिवर्तन फार मोठ्या प्रमाणावर साहाय्यभूत होणार आहे. तसेच हे जनजागरण जनतेच्या शिक्षणाचे आणि मुक्ततेचे प्रभावी साधन ठरणार आहे.

५.०७ येथे विशद केलेली विकासाची नवी कार्यपद्धती खालील गृहीत तत्त्वांवर आधारलेली आहे :

– लोकांचे सार्वभौमत्व आम्ही मान्य करतो ;

– लोकशाहीनिष्ठ, सर्वधर्मसमभावी आणि समाजवादी समाजावर आमची श्रद्धा आहे. कारण अशा समाजातच दारिद्र्य आणि शोषण यांचे निर्मूलन करता येते. त्यासाठी सामाजिक संरचनेमध्ये सुधारणा, समताधिष्ठित वेतन-धोरण, सुखवस्तु वर्गाच्या खर्चावर नियंत्रण, सर्वांना किमान जीवनमानाची ग्वाही, धर्म वा सामाजिक दर्जा यावरून भेद न करता सर्व नागरिकांना निर्णय करण्यात आणि उत्पादनात सहभागी होण्याची आणि ज्ञान नि संस्कृती संपादन करण्याची अत्यंत व्यापक संधी आदी उपाय योजायला हवेत.

– सामाजिक परिवर्तन शक्य तितक्या लवकर साध्य व्हावे यासाठी शिक्षण आणि प्रत्यक्ष राजकीय आणि नैतिक कृती यांचा परस्परसंबंध निर्माण केल्यास ती परिवर्तनाची प्रभावी साधने होतील, या विश्वासातून आम्ही शिक्षणाकडे पहात आहोत.

ही श्रद्धा आपल्या मनीमानसी जपणाऱ्या आणि कोणतीही किंमत द्यावी लागली तरी ही तिच्यासाठी झुंजायला सिद्ध असणाऱ्या सेवाभावी व्यक्तींच्या संख्येवर आणि गुणवत्तेवरच अखेरीस या उपायांची यशसिद्धी अवलंबून राहणार आहे.

| | |
|---|---|
| **आदिशेषय्या, डॉ. माल्कम एस.** | कुलगुरू, मद्रास विद्यापीठ, मद्रास. |
| **अविनाशलिंगम, टी. एस.** | श्रीरामकृष्ण मिशन विद्यालय, कोईमतूर. |
| **बोरडिया, के. एल.** | विद्याभवन सोसायटी, उदयपूर. |
| **चक्रवर्ती, प्रा एस.** | दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, दिल्ली विद्यापीठ, दिल्ली. |
| **दाभोलकर, प्रा. दे. अ.** | कुलगुरु, पुणे विद्यापीठ, पुणे. |
| **दामोदरन, जी. आर.** | डीन, पोस्टग्रॅज्युएट स्टडीज, पीएसजी कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी, कोईमतूर. |
| **दत्त, प्रा. अम्लान** | संचालक,गांधीयन इन्स्टिट्यूट ऑफ स्टडीज, वाराणसी. |
| **देसाई, प्रा. आय. पी.** | सेंटर फॉर सोशल स्टडीज, सुरत. |
| **दत्त, प्रा. भवतोष** | सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल सायन्सेस, कलकत्ता. |



| | |
|---|---|
| **दुबे, प्रा. एस. सी.** | संचालक, गोविंद वल्लभ पंत इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, अलाहाबाद. |
| **दत्त, एस. सी.** | इंडियन अडल्ट एज्युकेशन असोसिएशन, नवी दिल्ली. |
| **गोरे, प्रा. एम. एस.** | टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई. |
| **जॉन, व्ही. व्ही.** | निवृत्त शिक्षण संचालक, राजस्थान राज्य. |
| **जोशी, प्रा. पी. सी.** | इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ्, दिल्ली. |
| **कोशी, डॉ. टी. ए.** | कौन्सिल फॉर सोशल डेव्हलपमेंट, नवी दिल्ली. |
| **कोठारी, प्रा. रजनी** | इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, नवी दिल्ली. |
| **मथिआस, रेव्ह. टी. ए.** | ऑल इंडिया असोसिएशन ऑफ खिश्चन हायर एज्युकेशन, नवी दिल्ली. |
| **मथाई, प्रा. रवि. जे.** | इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबाद. |
| **माथूर प्रा. पी. एन.** | वनस्थली विद्यापीठ, वनस्थली, राज्यस्थान. |
| **मेहता, मोहनसिंग** | सेवामंदिर, उदयपूर |
| **मूर्ती, प्रा. के. सच्चिदानंद** | कुलगुरु, एस्. व्ही. विद्यापीठ, तिरुपती. |
| **नाईक, डॉ. (श्रीमती) चित्रा** | इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे. |
| **नाईक, जे. पी.** | इंडियन कौन्सिल ऑफ सोशल्स-सायन्स रिसर्च, नवी दिल्ली. |
| **पारिख, श्री. रामलाल** | सदस्य, राज्यसभा, नवी दिल्ली. |
| **प्रसाद, प्रा. विमल** | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली. |
| **राधाकृष्ण, एच्.** | गांधी पीस फौंडेशन, नवी दिल्ली. |
| **रामरेड्डी, प्रा. जी.** | कुलगुरु, उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद. |
| **रॉय, प्रा. प्रदिप्त** | कौन्सिल फॉर सोशल डेव्हलपमेंट, नवी दिल्ली. |

| | |
|---|---|
| **सैंत, किशोर** | सेवामंदिर, उदयपूर. |
| **सलामतुल्ला, प्रा.** | नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अ‍ॅंड ट्रेनिंग, नवी दिल्ली. |
| **सेन, मोहित** | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया, नवी दिल्ली. |
| **शाह, प्रा. अ. भि.** | इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे. |
| **शोरी, प्रा. अरुण** | इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च, नवी दिल्ली. |
| **शुक्ल, प्रा. एस.** | जमिया मिलिया इस्लामिया, दिल्ली. |
| **सिंग, प्रा. अमरिक** | कुलगुरु, पंजाबी विद्यापीठ, पतियाळा. |
| **सिंग, श्री. रामजी** | सदस्य, लोकसभा, नवी दिल्ली. |
| **सिंग, प्रा. रणधीर** | दिल्ली विद्यापीठ, दिल्ली. |
| **श्रीनिवास, प्रा. एम. एन.** | इन्स्टिटयूट ऑफ सोशल अँड इकॉनॉमिक चेंज, बंगलोर. |
| **तारकुंडे, न्या. व्ही. एम.** | जनतंत्र समाज, नवी दिल्ली. |
| **थापर, रोमेश** | संपादक ‘ सेमिनार ’, नवी दिल्ली. |
| **तिलक, रघुकुल** | राज्यपाल, राज्यस्थान, जयपूर. |
| **त्रिपाठी, प्रा. पी. के.** | दिल्ली विद्यापीठ, दिल्ली. |
| **उदगावकर प्रा. बी. एम.** | टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई. |